CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, २८ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २९८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## ▶▶ महत्त्वाचे...

### जय शाह आयसीसी अध्यक्षपदी बिनविरोध



**दुबई :** भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) सचिव जय शाह यांची आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे (आयसीसी) पुढील अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. ऑक्टोबर २०१९ पासून बीसीसीआयचे कामकाज सांभाळणारे जय शाह १ डिसेंबर २०२४ पासून आयसीसी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारतील. जय शाह हे आयसीसीमध्ये सर्वांत प्रभावशाली चेहरा आहेत. आयसीसीनुसार, जय शाह हे एकमेव उमेदवार होते,

### माजी पोलिस महासंचालक पांडेंविरोधात खंडणीचा गुन्हा

**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी पोलिस महासंचालक संजय पांडे आणि अन्य सहा जणांविरुद्ध जबरदस्ती आणि बेकायदेशीर कृत्यांच्या आरोपावरून ठाणे नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मुंबईतील व्यावसायिक संजय पुनामिया यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अल्पवयीन मुलीवर बापाकडून बलात्कार

**मुंबई :** महाराष्ट्रातील बदलापूर येथे १६ वर्षीय मुलीवर तिच्या वडिलांनी बलात्कार करून मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. ५४ वर्षीय आरोपी फरार असून, पोलिस त्याचा शोध घेत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी वारंवार तिच्यावर बलात्कार करून मारहाण करायचा. त्यानंतर मुलीने पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी या प्रकरणी लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचे निधन



**पुणे :** मराठी कलाविश्वातील ज्येष्ठ अभिनेत्री सुहासिनी देशपांडे यांचे पुण्यात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी अंत्यसंस्कार केला जाणार आहे. मराठीसोबत त्यांनी हिंदीतही बरेच काम केले आहे. अनेक नाटकांमधूनही त्यांनी काम केले. कथा अकलेल्या कांद्याची, राजकारण गेलं चुलीत, सासूबाईंचं असंच असतं या नाट्यात त्यांनी भूमिका साकारल्या. रंगभूमीवरील कार्यासाठी त्यांना २०१५ मध्ये अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेतर्फे टिळक स्मृती जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## वडार समाज दहीहंडी जल्लोषात



**सोलापूर :** मंगळवारी सायंकाळी वडार समाजाच्या वतीने गोपाळकालानिमित्त चाटी गल्ली मंगळवार पेठ पोलीस चौकी परिसरात दहीहंडीचा कार्यक्रम झाला. हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष या दहीहंडीत सहभागी झाल्याचा क्षण. (छायाचित्र : केवल तिवारी)

# नबन्ना आंदोलनाने हादरले बंगाल सरकार

- आंदोलक-पोलिसांत संघर्ष; कित्येक जखमी
- पाण्याचा मारा, फोडल्या अश्रुधुराच्या नळकांड्या
- ममता बॅनर्जींच्या राजीनाम्याची मागणी

◆ **कोलकाता, २७ ऑगस्ट**

येथील आरजी कार वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणाची जबाबदारी स्वीकारत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी राज्याच्या सचिवालयापर्यंत मंगळवारी काढण्यात आलेल्या 'नबन्ना अभिजन' मार्चमुळे बंगाल सरकार हादरले. सरकारच्या विरोधातील प्रचंड रोष या आंदोलनात दिसला. ठिकठिकाणी पोलिस-आंदोलकांमध्ये हिंसाचार झाला. यात कित्येक आंदोलक व पोलिस जखमी झाले. पोलिसांनी आंदोलकांवर लाठीहल्ला तसेच पाण्याचा मारा करीत अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या.

हा मार्च चिरडण्यासाठी बंगाल सरकारने सर्वतोपरी प्रयत्न केले होते. तब्बल सहा हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात केला होता. मात्र, सरकारच्या विरोधात मोठ्या प्रमाणात नागरिक हाती तिरंगा घेऊन उतरले होते. आंदोलन चिरडण्यासाठी बंगाल सरकारने १०० लोकांना ताब्यात घेतले असून, दहा प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल केले आहेत. पोलिस आणि नागरिकांमध्ये ठिकठिकाणी झालेल्या संघर्षात २५ पोलिस कर्मचारी जखमी झाल्याचे वृत्त आहे. महिला आंदोलकांनाही त्यांनी मारहाण केली.



कोलकात्यात प्रशिक्षणार्थी डॉक्टरवरील अत्याचार आणि हत्या प्रकरणाचा निषेध करण्यासाठी मंगळवारी छात्र संघटनांच्या सदस्यांनी हावडा येथे तीव्र आंदोलन केले. आंदोलकांना पांगविण्यासाठी पोलिसांनी लाठीमार, पाण्याचा मारा आणि अश्रुधुराच्या नळकांड्याही फोडल्या

**एएसआयची होणार पॉलिग्राफी चाचणी**

पंजाब पोलिस दलातील सहायक पोलिस उपनिरीक्षक अनुप दत्ता याची पॉलिग्राफी चाचणी करण्याची परवानगी सीबीआयला मंगळवारी मिळाली. या प्रकरणात अनुप दत्ताची भूमिका संशयास्पद असल्याचे सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्याची पॉलिग्राफी चाचणी लवकरच घेतली जाईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

**रॉयच्या दुचाकीची आयुक्ताच्या नावावर नोंदणी**

या प्रकरणातील मुख्य आरोपी संजय रॉय याची दुचाकीची कोलकाताच्या पोलिस आयुक्तांच्या नावावर नोंदणी होती, अशी माहिती मंगळवारी समोर आली. त्यानंतर, पोलिस दलासाठी घेतलेली वाहनांची नोंदणी आयुक्तांच्या नावावर होते. आम्ही जप्त केलेली ही दुचाकी सीबीआयकडे सोपवली असल्याचे बंगाल पोलिसांनी सांगितले. ◀(वृत्तसंस्था)

# मालवणमध्येच उभारणार छत्रपतींचा भव्य पुतळा

### देवेंद्र फडणवीसांचा संकल्प जाहीर

◆ **मुंबई, २७ ऑगस्ट**

मालवणमधील सिंधुदुर्ग किल्ल्याजवळ असलेल्या राजकोट येथे उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्याची घटना समोर आली. या प्रकरणी राज्यभरातील शिवप्रेमींकडून संताप व्यक्त करण्यात आला आहे. यावर राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मालवणमध्येच छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारण्याचा सरकारचा संकल्प जाहीर केला.



या प्रकरणावरून विरोधी पक्षांनी राज्य सरकारवर आरोप केले आहेत. त्यावर फडणवीस म्हणाले, हा पुतळा महाराष्ट्र सरकारने तयार केला नव्हता. नौदलाने चांगल्या हेतूने हा पुतळा तयार केला होता. मात्र, त्यांनी ज्यांना काम दिले, त्यांना या ठिकाणाचे भौगोलिकदृष्ट्या आकलन झाले नसावे. इतक्या सोसाट्याचा वारा त्या ठिकाणी असतो, याचे योग्य आकलन करता आले नाही. त्या हिशेबाने त्यांना पुतळ्याचे प्रारूप करता आले नाही. अशा ठिकाणी जेव्हा आपण पुतळा लावतो, तेव्हा समुद्राच्या वाऱ्यामुळे लोखंड गंजते का, याचे आकलन नव्हते का, याची चौकशी सुरू आहे.

आमचा संकल्प आहे की, त्याच ठिकाणी छत्रपती शिवरायांचा एक अतिशय भव्य पुतळा तयार करायचा आहे. नौदलाच्या मदतीने पुन्हा त्याहीपेक्षा भव्य पुतळा तिथे उभा करू, कोणीही यावरून राजकारण करू नये, असे फडणवीस म्हणाले. ◀(वृत्तसंस्था)

# मंकीपॉक्ससाठी आरटी-पीसीआर किटला मान्यता

◆ **नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

मंकीपॉक्सचे निदान करण्यासाठी भारतात आरटी-पीसीआर किट विकसित करण्यात आली आहे. या कीटच्या उत्पादनाला सेंट्रल ड्रग्ज स्टँडर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशनकडून मंजुरी मिळाली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने मंकीपॉक्समुळे आंतरराष्ट्रीय चिंतेची दुसरी सार्वजनिक आरोग्य आणिबाणी जाहीर केली आहे. या विषाणूचा नवीन स्ट्रेन अधिक संक्रमणक्षम मानला जातो आणि त्याचा मृत्यू दर जास्त आहे. दरम्यान, भारताने मंकीपॉक्सविरुद्ध लढण्यासाठी स्वतःचे आरटी-पीसीआर चाचणी किट विकसित केले आहे, ज्याला केंद्रीय औषध नियमन संस्थेने मान्यता दिली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# सर्व १२ उमेदवार अविरोध

- राज्यसभा पोटनिवडणूक
- महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील

◆ **नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

राज्यसभेच्या १२ जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीतील मतदानाआधीच सर्व १२ उमेदवार अविरोध विजयी झाले आहेत. यात भाजपाने ९ जागा जिंकत आपले वर्चस्व कायम ठेवले आहे. महाराष्ट्रातून धैर्यशील पाटील अविरोध विजयी झाले.

भाजपाचे रंजन दास आणि रामेश्वर तेली आसाममधून, माननकुमार मिश्रा बिहारमधून, किरण चौधरी हरयाणातून, जॉर्ज कुरीयन मध्यप्रदेशातून, धैर्यशील पाटील महाराष्ट्रातून, ममता मोहंता ओडिशातून, रवनीतसिंग बिट्टू राजस्थान आणि राजीव भट्टाचार्जी त्रिपुरातून अविरोध निवडून आले.

काँग्रेसचे अभिषेक मनू सिंघवी तेलंगणातून, राष्ट्रवादी काँग्रेसचे नितीन पाटील महाराष्ट्रातून आणि आरएलएमचे उपेंद्र कुशवाह बिहारमधून अविरोध निवडून आले आहेत. राजस्थान आणि बिहारमध्ये भाजपाचा दोन जागांचा फायदा झाला आहे. बिहारमधील राजदच्या मिसा भारतीची तर राजस्थानमधील के. सी. वेणुगोपाल यांच्या जागेवर भाजपाचे उमेदवार विजयी झाले. परिणामी राजद आणि काँग्रेसचे प्रत्येकी एका जागेचे नुकसान झाले.

आसाममधून सर्वानंद सोनोवाल, कामाख्याप्रसाद ताशा, बिहारमधून मिसा भारती आणि विवेक ठाकूर, महाराष्ट्रातून केंद्रीय मंत्री पीयूष गोयल आणि छत्रपती उदयनराजे भोसले, राजस्थानमधून के. सी. वेणुगोपाल, हरयाणातून दीपेंद्र हुडा, त्रिपुरातून बिप्लबकुमार देव, तेलंगणातून के. केशवराव आणि ओडिशातून ममता मोहंता लोकसभेवर निवडून आल्यामुळे त्यांनी राज्यसभेच्या जागेचा राजीनामा दिल्यामुळे ही पोटनिवडणूक घेण्यात येणार होती. निवडून आलेल्या सदस्यांचा कार्यकाळ २०२५ ते २०२८ पर्यंत राहणार आहे. रवनीतसिंह बिट्टू नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत पंजाबमध्ये पराभूत झाले होते. मात्र, तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. त्यामुळे त्यांना सहा महिन्यांच्या आत राज्यसभेवर निवडून येणे आवश्यक होते. ◀(तभा वृत्तसेवा)

# शिवाजी महाराजांच्या पुतळा प्रकरणात कंत्राटदाराच्या विरोधात एफआयआर

**मुंबई, २७ ऑगस्ट -**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळण्याच्या प्रकरणात सिंधुदुर्ग पोलिसांनी कंत्राटदार आणि बांधकाम सल्लागाराच्या विरोधात एफआयआर दाखल केला.

मागील वर्षी नौदल दिनाला म्हणजे ४ डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सिंधुदुर्गातील मालवण तहसीलमध्ये या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले होते. तो सोमवारी दुपारी एक वाजता पडला. या प्रकारामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार अडचणीत आले असून, विरोधकांना सरकारवर हल्ला करण्याची संधी मिळाली आहे. या पुतळ्याचे आरेखन आणि बांधकाम भारतीय नौदलाद्वारे करण्यात आले होते, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या प्रकरणात मालवण पोलिस ठाण्यात सोमवारी सायंकाळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहायक अभियंत्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. पुतळा कोसळण्यामागे कलावंत आणि सल्लागार जबाबदार असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. या आधारे कंत्राटदार जयदीप आपटे आणि बांधकाम सल्लागार चेतन पाटील यांच्या विरोधात एफआयआर दाखल करण्यात आली, असे अधिकाऱ्याने सांगितले. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम ३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यात सदोष मनुष्यवधाचा प्रयत्न, इतरांचे जीवन किंवा वैयक्तिक सुरक्षितता धोक्यात आणणारे कृत्य, खुनाचा प्रयत्न आणि फसवणूक गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भाजपाचे देशव्यापी सदस्यता अभियान २ सप्टेंबरपासून

- विनोद तावडे यांची माहिती

**नवी दिल्ली, २७ ऑगस्ट -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते २ सप्टेंबरला भाजपाच्या राष्ट्रीय सदस्यता अभियानाचा शुभारंभ होणार असल्याची माहिती पक्षाचे राष्ट्रीय महासचिव आणि सदस्यता अभियानाचे प्रभारी विनोद तावडे यांनी आज दिली.

भाजपा मुख्यालयात आयोजित पत्रपरिषदेत तावडे म्हणाले की, देशभरात महासंपर्क अभियानाच्या नावावर दोन टप्प्यात सदस्यता अभियान राबवण्यात येणार आहे. यात प्राथमिक सदस्य नोंदणी केली जाणार आहे. सदस्यता अभियानाचा पहिला टप्पा २ ते २५ सप्टेंबर तर, दुसरा टप्पा १ ते १५ ऑक्टोबरपर्यंत राहणार आहे. १६ ते ३१ ऑक्टोबरपर्यंत सक्रिय सदस्य नोंदवले जाणार आहेत. सदस्यता अभियानासाठी राष्ट्रीय स्तरावर ९ सदस्यांची, प्रदेश पातळीवर चार ते सहा सदस्यांची तर जिल्हा आणि मंडल स्तरावर ३ ते ४ सदस्यांची समिती गठित केली जाणार असल्याचे तावडे यांनी सांगितले.



सदस्यता अभियानासाठी भाजपाने ८८०००२०२४ हा भ्रमणध्वनी क्रमांक जाहीर केला असून या क्रमांकावर मिस्डकॉल देत पंतप्रधान नरेंद्र मोदी, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह सर्व प्रमुख नेते पक्षाचे सदस्यत्व घेणार आहे. देशातील जनतेपर्यंत भाजपाची राष्ट्रनिर्माणाची भावना तसेच विचारधारा आणि २०४७ पर्यंत देशाला विकसित करण्याचा संकल्प पोहोचवण्यासाठी हे सदस्यता अभियान राबवण्यात येत आहे, असे तावडे म्हणाले.

२०१४-१५ मध्ये भाजपाने विक्रमी म्हणजे ११ कोटी सदस्यांची नोंदणी केली होती. २०१९ मध्ये भाजपाच्या ७ कोटी सदस्यांची नोंदणी झाली होती. याचाच अर्थ देशातील १८ कोटी लोकांनी या दोन वर्षांत भाजपाची सदस्यता घेतली होती. यावेळीही भाजपा अशीच विक्रमी सदस्यता नोंदणी करणार आहे. सदस्यता नोंदणीसाठी पक्षाच्या स्तरावर सर्व तयारी झाली आहे. जिल्हा, मंडल आणि प्रदेश स्तरावर कार्यशाळांचे आयोजनही करण्यात आले होते, असे तावडे म्हणाले.

# गोपाळकृष्ण मंदिरासमोर अश्लील गाण्यांवर डान्स

- ▸ पंढरपुरात तीव्र नाराजी
- ▸ दहीहंडीच्या नावाखाली पारंपरिक प्रदक्षिणा अडवली

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, २७ ऑगस्ट -**

दहीहंडी निमित्त राज्यभरात उत्साहाचे वातावरण आहे, अनेक तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी हा उत्सव भक्तीमय वातावरण संपन्न होत आहे. मात्र पंढरपुरात विठुरायाच्या दारात दहीहंडीच्या नावाखाली धुडगूस घातला गेला आहे. शहरातील प्रसिध्द गोपाळकृष्ण मंदिरासमोर नगरप्रदक्षिणेचा रस्ता अडवून दहीहंडीच्या कार्यक्रमात डीजेच्या तालावर चक्क महिलांच्या डान्सचे आयोजन करीत हा उत्सव साजरा करण्यात आला आहे.

त्यामुळे शहरातील सूज्ञ नागरिक तसेच वारकरी भाविकांमधून या प्रकाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. कृष्ण जन्माष्टमीनिमित्त होत असलेल्या दहीहंडी उत्सवासाठी



पंढरपुरात अश्लिल गाण्यांवर नृत्य करण्यात आले. पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे, अशावेळी पंढरपुरातील एकमेव गोपाळकृष्ण मंदिरासमोर अश्लिल गाणी वाजवून केलेल्या नृत्यामुळे वारकरी, भाविकांमधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. दहीहंडीच्या कार्यक्रमामुळे गोकुळ अष्टमीनिमित्त पंढरपुरात परंपरेप्रमाणे होणारी नगर प्रदक्षिणाही झाली नाही. दहीहंडी उत्सवात सामाजिक बांधिलकी सोडून सुरू असलेल्या थिल्लरपणाबाबत संताप व्यक्त होत आहे. दहीहंडीसारखे उत्सव कार्यक्रम सामाजिक संदेशासाठी व्हावेत, अशी भावना नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

**आयोजकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी**

गोकुळ अष्टमी निमित्त नगर प्रदक्षिणा घालणाऱ्या वारकरी आणि नागरिकांचा मार्ग अडवून महिला, मुलींकडून अश्लिल गाण्यांवर चाळे करीत डान्सचे आयोजन करण्यात आलेले होते. विठ्ठलाच्या नगरीत तरुणांनी धुडगूस घातला आहे. त्यामुळे दहीहंडी उत्सव आयोजकांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी पंढरपूरकरांकडून केली जात आहे.

# 'त्या' स्थितीत अटकपूर्व जामिनावर तातडीने निर्णय घ्या

### मुंबई उच्च न्यायालयाचे निरीक्षण

**मुंबई, २७ ऑगस्ट -**

ज्यावेळी नागरिकांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न गुंतलेला असतो, त्यावेळी कनिष्ठ न्यायालयांनी अटकपूर्व जामिनावर लवकर निर्णय घ्यावा किंवा किमान तातडीने अंतरिम दिलासा द्यावा, असे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी नोंदवले.

कनिष्ठ न्यायालयांनी त्यावर निर्णय घेतला नाही, तर उच्च न्यायालयांवर दबाव येतो, असे न्यायालयाने म्हटले आहे. शिवसेनेचे स्थानिक नेते वामन म्हात्रे यांच्या अटकपूर्व जामिनावर ठाणे जिल्ह्यातील कल्याण न्यायालयाने लवकर निर्णय न घेतल्याबद्दल न्या. संदीप मारणे यांच्या एकलपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली. बदलापुरात दोन लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधातील आंदोलनात एका महिला पत्रकाराबाबत म्हात्रे यांनी अपमानजनक वक्तव्य केले होते. अटकपूर्व जामिनासाठी कल्याण सत्र न्यायालयात २२ ऑगस्ट रोजी याचिका दाखल केली. त्यावर अद्याप सुनावणी झालेली नाही आणि अंतरिम संरक्षणासाठी दाखल केलेल्या अर्जावरही विचार केलेला नाही, असे म्हात्रे यांनी उच्च न्यायालयात दाखल याचिकेत म्हटले आहे. सत्र न्यायालय प्रत्येकवेळी आपल्या याचिकेवरील सुनावणी तहकूब करते आणि आता ही सुनावणी २९ ऑगस्टला ठेवली आहे, असे त्यात नमूद आहे.

म्हात्रे यांच्या याचिकेवर २९ ऑगस्ट रोजी निर्णय घ्या, असा निर्देश न्या. मारणे यांनी सत्र न्यायाधीशांना दिला. अटकपूर्व जामीन अर्जाच्या स्थितीबाबतचा अहवाल सत्र न्यायाधीश २९ ऑगस्ट रोजीच उच्च न्यायालयाच्या नोंदणी विभागासमोर ठेवतील, असे न्या. मारणे यांनी म्हटले आहे.

# पंतप्रधान मोदींनी दिलेल्या शांतता संदेशाचे जो बायडेन यांनी केले कौतुक

**वृत्तसंस्था,**
**वॉशिंग्टन, २७ ऑगस्ट -**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युक्रेन दौऱ्यादरम्यान दिलेल्या शांततेच्या संदेशाचे आणि युक्रेनला केलेल्या मानवी मदतीचे अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांनी कौतुक केले आहे. या दौऱ्यात त्यांनी चर्चा आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून शांतता प्रस्थापित करण्याच्या शक्यतांवर चर्चा केली.

नरेंद्र मोदी आणि ज्यो बायडेन यांच्यात सोमवारी चर्चा झाली. बायडेन यांनी मोदींना दूरध्वनी केला. मोदींच्या युक्रेन दौऱ्यानंतर तीन दिवसांनी दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. युद्ध संपुष्टात आणण्यासाठी पुतिन आणि झेलेन्स्की यांनी चर्चा करायला पाहिजे. शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारत सक्रिय भूमिका पार पाडण्यास तयार आहे, असे मोदी यांनी झेलेन्स्की यांना सांगितले होते.

पंतप्रधान मोदींनी अलिकडेच केलेल्या पोलंड आणि युक्रेन दौऱ्याबाबत मी चर्चा केली. त्यांनी दिलेल्या शांततेच्या संदेशाबद्दल तसेच युक्रेनसाठी केलेल्या मानवतावादी मदतीबद्दल मी त्यांचे कौतुक



केले, असे बायडेन यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. भारत-प्रशांतमध्ये शांतता आणि भरभराटीसाठी एकत्रित योगदान देण्याबाबत आमच्या वचनबद्धतेवर सहमती दाखवली, असेही बायडेन यांनी म्हटले आहे. नरेंद्र मोदी यांनी रशिया, पोलंड आणि युक्रेन दौरा केल्यानंतर तसेच बांगलादेशातील घडलेल्या राजकीय घडामोडीनंतर या दोन्ही नेत्यांमध्ये पहिल्यांदाच चर्चा झाली आहे. नरेंद्र मोदी यांच्या एक्सवरील पोस्टमध्ये उल्लेख असलेल्या बांगलादेशाच्या संदर्भात चर्चा झाली नाही, असे व्हाईट हाऊसने स्पष्ट केले.

## संक्षिप्त वृत्त



### श्रीवास्तव नाभिक समाजाच्यावतीने शैक्षणिक साहित्य वाटप

**सोलापूर, दि.२७ ऑगस्ट-**

येथील श्रीवास्तव नाभिक समाज संस्थेच्या वतीने शैक्षणिक सहित्य वाटप व जेष्ठ नागरिकांचा सत्कार समारंभ उपलप मंगल कार्यालय पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजअध्यक्ष सायबण्णा शेडम होते. सुरुवातीस बदलापूर येथील घटनेचा संस्थेच्या वतीने निषेध करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे विष्णू राठोड, पवन दुबे, यासिन शेख सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष हिंदुराव गोरे, सोलापूर शहर दुकानदार संघटनेचे ट्रस्टी अध्यक्ष आनंद सिंगराला, विदयमान अध्यक्ष अभयकुमार कांती, बालाजी समाज अध्यक्ष शेखर कोंडापूर, श्रीवास्तव नाभिक समाज सचिव राजकुमार मालतुमकर, संचालक प्रकाश सदगुरे, सुधीर वड्डेपल्ली, नंदकिशोर सदगुरे, सहसचिव सिद्राम रुद्रार, खजिनदार महेश श्रीमंगले, संचालक गोवर्धन कोडपाक, राजू शुकलवार, मनोज मॅकलवार, भाग्यवान मॅकलवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी राहूल शेडम, ज्ञानेश्वर सर्जनकर, श्रीकांत शेडम, समर्थ कोत्तामिदे, विठ्ठल मालतुमकर आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन सिद्राम रुद्रार यांनी केले. गोवर्धन कोडपाक यांनी आभार मानले.

### हबीबा बालकाश्रमात कृष्णजन्माष्टमी उत्साहात

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

आस्था रोटी बँकेतर्फे सोरेगावच्या हबीबा बालकाश्रमात श्री कृष्णजन्माष्टमी साजरी करण्यात आली. कृष्णजन्माष्टमीच्या हांडीवर ही समाज प्रबोधन चित्रफित लावून जनजागृतीक करण्यात आली. हबीबा आश्रमातील मुलांनी दहीहांडी भोवती फेरधरुन गाणी नृत्य सादर केले नंतर मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. दहीहांडी फोडणाऱ्या गोविंदाला ५०१ रुपायांचे बक्षीस देऊन त्याचा उत्साह वाढवला. पहिल्यांदाच आश्रमात दहीहांडी कृष्णजन्माष्टमी साजरी करत असल्याचा आनंद यावेळी बालकाश्रमातील मुलांच्या चेहऱ्यावर पाहण्यास मिळाला. कार्यक्रमासाठी निलिमा हिरेमठ, कंचना हिरेमठ, छाया गंगणे, नीता अकुर्डे, संगिता छंचुरे, विदया माने, ज्योत्सना सोलापूरकर, सुर्वणा पाटील, मोनिका, कविता कोडवेल, सत्यम सोलापूरकर, धर्मा कोडवेल व आस्था रोटी बँकेचे सदस्य उपस्थित होते.

### जांबमुनी मोची समाज सेवा मंडळ अध्यक्षपदी करेप्पा जंगम

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

लष्कर येथील जांबमुनी मोची समाज सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी करेप्पा जंगम यांची निवड झाली. मंडळाची वार्षिक सर्वसासाधारण सभा नरसिंग आसादे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी २०२४-२५ या वर्षांसाठी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. **अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष दत्तू आसादे, जनरल सेक्रेटरी सागर शिंगे, सहसेक्रेटरी श्रीधर आसादे, खजिनदार राजू म्हेत्रे, ऑडीटर जगन्नाथ सजन्न, न्यायअध्यक्ष वाबय्या म्हेत्रे, दत्तात्ररु म्हेत्रे, विवाहध्यक्ष श्रीनिवास म्हेत्रे, उपाध्यक्ष अंजन मिसालोलु, सांस्कृतिक क्रीडा अध्यक्ष सिद्राम म्हेत्रे, उपाध्यक्ष लक्ष्मण गोन्याल, जांबमुनी प्रशाला चेअरमन नागेश म्हेत्रे, सेक्रेटरी मल्लिकार्जुन पिलगेरी, संचालक राजू पेद्दी, अर्जुन नामदासलू, जांबमुनी प्राथ. शाळा चेअरमन भारत कंदकुरे, व्हा.चेअरमन अंबादास चन्नेपागोलु, प्राथ. शाळा सेक्रेटरी व्यंकटेश चन्नेपागोलु, संचालक रवी बोलेद्दुल, नामदेव आरगोलु.

## लोकमंगल बँकेचा जुळे सोलापुरात ग्राहक स्नेहसंवाद मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

लोकमंगल बँकेच्या वतीने जुळे सोलापुरातील गोविंदश्री मंगल कार्यालय येथे बँकेचा ग्राहक स्नेहसंवाद मेळावा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत व्यावसायिक वाहन कर्ज तसेच पर्यटन विभागाच्या आई कर्ज योजनेअंतर्गत वाहन कर्ज वितरण प्रसंगी ग्राहकांना चावी प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे उदघाटन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन सर्व मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बँकेचे संचालक नरेंद्र काटीकर यांनी केले प्रास्ताविक मध्ये बँकेची सध्याची आर्थिक स्थिती,ग्राहकांच्या सेवा सुविधा तसेच बँकेच्या माध्यमातून विविध शासकीय महामंडळ अंतर्गत व्याज परताव्याचे सर्व स्कीम तसेच वैशिष्ट्ये यांची माहिती सांगितले. याप्रसंगी बँकेच्या उत्कृष्ट ग्राहकाचा सन्मान करण्यात आला तसेच बँकेच्या माध्यमातून जगदज्योती महात्मा बसेश्वर आर्थिक विकास महामंडळ व पर्यटन विभाग आई कर्ज योजनांच्या पहिल्या ग्राहकांना कर्जाचे चेक




वितरण करण्यात आले तसेच अण्णासाहेब पाटील महामंडळ अंतर्गत कर्जाचे विविध ग्राहकांना चेक वितरण करण्यात आले. याप्रसंगी ग्राहकांनी आपले मनोगत व्यक्त करून बँकेने दिलेल्या आर्थिक पाठबळामुळे आम्ही व आमचा व्यवसाय उत्तम रित्या चालऊन आम्ही आर्थिक सक्षम होत आहोत असे प्रतिपादन केले. बँकेचे अध्यक्ष आमदार सुभाष बापू देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगत मध्ये सोलापूर जिल्हा आर्थिक सक्षम करण्याकरिता लोकमंगल बँक सदैव्य आपल्या सर्वांच्या पाठीशी भक्कम पणे उभे राहणार असल्याचे प्रतिपादन केले तसेच येणाऱ्या काळात सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक युवकाला व्यवसाय वाढविण्यासाठी आर्थिक पाठबळ देऊन स्वतःच्या पायावर उभे करण्याकरिता १००० कोटीच्या कर्ज वितरणाची तरतूद करून सोलापूर जिल्हा वैभवशाली बनऊन या जिल्ह्याचे चित्र बदलायचं आहे या करिता प्रयत्न करणार असे सांगितले.

सदर कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून रविंद्र मणियार,गुरणा तेली,गजानन भाकरे,योगेश वाघ,मन्सूर पठाण,बँकेचे संचालक देवानंद चिलवंत,नरेंद्र काटीकर ,अशोक सापटणेकर,सिद्धार्थ सर्जे,अभिजित टाकळीकर,प्रल्हाद कांबळे,सतीश लामकाने,बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निवेदिका ऐश्वर्या हिबारे यांनी केले,कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बँकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनीं परिश्रम घेतले.

## शासकीय योजनांचा लाभ देऊन दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणणार

**जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा विश्वास**

**दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरात ४ हजार ८५९ लाभार्थ्यांची तपासणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

जिल्ह्यात दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान अंतर्गत दिव्यांग प्रमाणपत्र शिबिराचा सहावा दिवस संपला असून, आज रोजी पर्यंत पंढरपूर, अक्कलकोट व बार्शी तालुक्यातील ४ हजार ८५९ लाभार्थ्यांनी शिबिरात तपासणी करून घेतलेली आहे. दिव्यांग व्यक्तीकडून जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित केलेल्या शिबिराला चांगला प्रतिसाद मिळत आहे.



शिबिराच्या ठिकाणी शासनाच्या अन्य योजना चा लाभ दिव्यांगाना देण्यासाठी संबंधित विभागाचे माहिती स्टॉल लावण्यात आलेले आहेत. अन्य शासकीय योजनातून दिव्यांगांना लाभ देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

**२२ शिबिरातून १५ हजार ६६६ दिव्यांग लाभार्थ्यांची तपासणी होणार**

जिल्ह्याच्या अकरा तालुक्यात प्रत्येकी दोन याप्रमाणे एकूण २२ शिबिराचे आयोजन करण्यात येत असून, यासाठी १५ हजार ६६ दिव्यांग लाभार्थ्यांनी नोंदणी केलेली आहे. जिल्ह्यातील दिव्यांगांची संख्या १ लाख १५ हजार ७५५ इतकी असून यातील ६८% ग्रामीण भागातील तर शहरी भागातील ३२ टक्के दिव्यांग संख्या आहे. आशाताई आणि यंत्रणेतील तालुका स्तरावरील संबंधित घटकांसाठी २७ कार्यशाळा घेण्यात आले असून त्यातून ३७४२ प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती मित्राचे संचालक अभिजीत राऊत यांनी दिली.

## तामलवाडी औद्योगिक वसाहत शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच होणार

**आ. राणाजगजितसिंह पाटील यांची शेतकऱ्यांना ग्वाही**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी येथे ३६७ एकर क्षेत्रावर एमआयडीसी मंजूर झाली असून, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन, त्यांना जमिनीचा योग्य मोबदला देऊन त्यांच्या सहमतीनेच भूसंपादन करण्यात येणार असल्याची ग्वाही आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी शेतकऱ्यांना दिली.

सोमवार, दि. २६ ऑगस्ट रोजी तामलवाडी येथील शेतकऱ्यांनी आ. राणाजगजितसिंह पाटील यांची भेट घेऊन एमआयडीसी संदर्भातील त्यांच्या अडचणी व शंका मांडल्या होत्या. या सर्व बाबींचे निरसन आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी केले. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना आ. पाटील म्हणाले की, आपण पूर्णतः शेतकऱ्यांच्या बाजूने आहोत. कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी यामध्ये जाणार आहेत, त्यांना त्याचा योग्य मोबदला मिळवून देण्यात येईल. येथे एमआयडीसी झाल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसह स्थानिकांना मोठा फायदा होईल. या ठिकाणी औद्योगिक हब उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील असून येथे टेक्स्टाईल व गारमेंट उद्योग उभारण्यास अनेक उद्योजक इच्छुक आहेत.

प्रस्तावित जागेच्या शेजारी आणखी जमीन असून, ती देखील संपादित करावी अशी मागणी उपस्थित शेतकऱ्यांनी केली. त्याअनुषंगाने आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी एमआयडीसीचे क्षेत्रीय अधिकारी श्री.भांबरे यांच्याशी चर्चा केली असून, ते उद्या दि.२८ ऑगस्ट रोजी जागेची पाहणी करण्यासाठी तामलवाडी येथे येणार आहेत. महसूल विभागाने सदरील जमिनीचा दर रु.९ लक्ष निर्धारीत केला असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांनी सांगितले. हा दर जरी गृहीत धरला तरी प्रचलित नियमाप्रमाणे चार पटीने एकरी रु.३६ लक्ष मोबदला शेतकऱ्यांना मिळणार आहे. यावेळी सचिन शिंदे, ज्ञानेश्वर जगताप, पोपट बेगडे, बादशहा बेगडे, मारुती घोटकर, दत्तात्रय घोटकर, महादेव घोटकर, नागनाथ भाकरे, बादशहा बेगडे, इस्माईल बेगडे, सचिन भोसले, निखिल सावंत, जोशी, चंद्रकांत सगर या शेतकऱ्यांसह माजी पंचायत समिती उपसभापती दत्ता शिंदे उपस्थित होते.

## श्रावणमास प्रवचनमाला-२२

### संताचा अवतार हा आनंदाचा अवतार

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ ऑगस्ट-**

_संताचा अवतार हा आनंदाचा अवतार' असल्याने नाथांचे अंत:करण आनंदाने युक्त आहे. त्यांनी कर्माचा उपदेश केला, ज्ञानाचा उपदेश केला तसेच भक्तीचा उपदेश केला, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले. प्रवचनाचा कालचा २२ वा दिवस होता. संत एकनाथ महाराजांच्या जीवन चरित्राचे निरुपण करताना नाथांच्या एका कुट अभंगाचा विचार मांडला आहे.

**माये आधी लेक जन्मली।**
**दोघींच्या लग्नाची आयती केली।**
**यात कोण नोवरा कोण नोवरी।**
**अर्थ पाहता न कळे निर्धारी।।**

'माये' म्हणजे 'आई' च्या आधी 'लेक' म्हणजे 'मुलगी' जन्माला आली. म्हणजे ही आई ही 'भक्ती' आहे. तर, 'लेक' (मुलगी) ही 'ज्ञान' आहे. 'कारण' हे अगोदर असते तर 'कार्य' हे नंतर असते.

कर्मपर श्रृती, ज्ञानपर श्रृती आणि भक्तीपर श्रृती या तीन प्रकारच्या श्रृती सांगितल्या जातात. कर्मपर श्रृतीमध्ये 'सून' असून ज्ञानपर श्रृतीमध्ये 'लेक' आहे. तर, भक्तीपर श्रृतीमध्ये 'सासू' किंवा 'आई' सांगितली जाते.

कर्मपर श्रृतीमध्ये कायम बंधने असतात. म्हणजे 'सून' ही घरातल्या सगळ्यांच्या बंधनात असते. ज्ञानपर श्रृतीमध्ये 'लेक' ही काही काळ बंधनात तर काही काळ स्वतंत्र (मुक्त) असते. म्हणजे, सासरी असणारी मुलगी बंधनात असते ; पण ती माहेरी आली की स्वतंत्र (मुक्त) असते. भक्तीपर श्रृतीमध्ये जी 'सासू' आहे, ती कायम स्वतंत्र आहे.

भक्तीच्या अगोदर ज्ञान जन्माला आले, असे या अभंगात म्हटले आहे. भक्ती आणि ज्ञान या सामग्रीद्वारे जीवनमुक्तीच्या विलक्षण सुखाचा भोग भोगण्यासाठी 'भजन' करावे लागते.

एके दिवशी नाथांना स्वप्नदृष्टांत झाला.

**श्रीज्ञानदेवें येउनी स्वप्नांत।**
**सांगितली मात मजलागीं।।१।।**
**दिव्य तेजःपुंज मदनाचा पुतळा ।**
**परब्रह्म केवळ बोलतसे ।।२।।**
**अजानवृक्षाची मुळी कंठास लागली।**
**येऊनि आनंद स्थळीं काढ वेगीं।।३।।**
**ऐसें स्वप्न होतां आलों अलंकापुरी ।**
**तंव नदीमाझारी देखिलें द्वार ।।४।।**
**एका जनार्दनीं पूर्वपुण्य फळलें।**
**श्रीगुरु भेटले ज्ञानेश्वर।।५।।**

ज्ञानोबारायांनी स्वप्नदृष्टांत सांगितले, अजानवृक्षाचे मूळ माझ्या कंठाला लागले आहे. तेव्हा, तू लवकर आळंदीला ये! डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज निरुपण करतात, नाथबाबा ताबडतोब सकाळी गिरिजाबाई आणि उध्दवाला घेऊन आळंदीला निघाले. पैठणवासीही त्यांच्यासोबत आळंदीला निघाले.

इंद्रायणी नदीच्या काठावर येऊन सर्वजण थांबले. समोरच सिध्देश्वराचं मंदीर होते. नाथांनी सर्वांना सांगितले, मी अगोदर मंदिरात जाऊन येतो. अजानवृक्ष पाहिला. त्याच्या खालच्या शिळा काढल्याबरोबर नाथांना वज्रासनात बसलेले संत ज्ञानेश्वरांचे दर्शन झाले. नाथांचा आणि ज्ञानोबारायांचा ३ दिवस संवाद चालू होता. इकडे इंद्रायणी नदी तीरावर बसलेल्या सर्व पैठणकरांना खाण्यासाठी काहीच शिल्लक नव्हते. तेव्हा, अचानक एका कानडी व्यापाऱ्याने त्याच्या दुकानातील सर्व शिधा लोकांना दिला. तो साक्षात पांडुरंगच होता. नाथबाबा सर्वांना समाधी दर्शनास मंदिरात घेऊन जातात. आता संत एकनाथ महाराज 'जगन्नाथ' झाले आहेत.

आज गोकुळाष्टमी म्हणजेच भगवान श्रीकृष्णाचा जन्मदिवस आणि आजच संत ज्ञानेश्वर महाराजांचा जन्म दिवस हा किती योगायोग म्हणावा लागेल.

## हमाल-मापाडी माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीचे आज धरणे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अडत व्यापाऱ्यांनी पुकारलेला बंद मागे घेताच, आता हमाल मापडी कामगारांनी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. बाजार समितीत कार्यरत असणाऱ्या सोलापूर जिल्हा हमाल-मापाडी माथाडी श्रमजीवी कामगार समन्वय समितीकडून विविध मागण्यासाठी जिल्हा बेमुदत धरणे आंदोलन पुकारण्यात आले आहे.

हे आंदोलन बाजार समितीच्या प्रमुख प्रवेशद्वारासमोर बुधवारी सकाळी ११.वा करण्यात येईल.

यावेळी समितीचे अध्यक्ष शिवाजी शिंदे, संचालक शिवानंद पुजारी, उपाध्यक्ष भिमा सिताफळे, अध्यक्ष सिध्दाराम हिप्परगी, सचिव दत्ता मुरुमकर, संघटक गफ्फार चांदा, राजशेखर काळगी, किरण मस्के, महेंद्र चंदनशिवे, गुरुशांतय्या पुराणिक, सुनिता रोटे, यशोदा गायकवाड, राजू दणाने, विशाल मस्के, हब्बू जमादार, शिवलिंग शिवपुरे, दत्ता बसवेश्वर, नागनाथ खंडागळे, इरफान पिरजादे, शिवानंद जमादार आदींची उपस्थिती होती.

**कामगारांच्या प्रमुख मागण्या**

१) भुसार बाजाराकरीता लागू करण्यात आलेला टप्पा दुरुस्तीचा ठराव रद्द झाला पाहिजे. २) संपूर्ण माथाडी कामगाराच्या हमाली तोलाई चा भरणा माथाडी बोर्डात झाला पाहिजे. ३) माथाडी कामगाराकरीता घरकुल व प्राथमिक उपचार केंद्र झालेच पाहिजे. ४) कांदा विभागामधील माल राखणे बंधनकारक करु नये.

## कल्लावती पाटील यांचे निधन



**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

हित्तलशिरूर येथील श्रीमती कल्लावती बसवेश्वर पाटील यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांचे वय ८१ त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे आहेत. सेवानिवृत्त क्रिडाशिक्षक सोमशेखर भोगडे यांच्या त्या मावशी आहेत. सराफ व्यापारी सिध्दाराम शिंगारे यांच्या आत्या आहेत.

**जाहीर समन्स/नोटीस**

आर.टी.एस. अपील क्र. २६/२०२२
पुढील नेमलेली तारीख : ११/०९/२०२४

**बार्शी येथील मे. उपविभागीय अधिकारी सो. यांचे कोर्टात**

**उत्तम माधव पाडुळे,** वय ७० वर्षे, धंदा- शेती, रा. मालवंडी, ता. बार्शी, जि. सोलापूर — अपेलंट

- विरुद्ध -

**भिमराव माधव पाडुळे,** वय ६५ वर्षे, धंदा- शेती, रा. मालवंडी, ता. बार्शी, जि. सोलापूर वगैरे — रिस्पॉन्डन्ट

ज्याअर्थी यातील अपेलंट याने अपील रिस्पॉन्डन्ट विरुद्ध दाखल केलेले आहे. सदर केस मधील रेस्पॉन्डन्ट नं. ३ हरीदास बाळू पाडुळे, वय- सज्ञान, धंदा- शेती, रा. मालवंडी, ता. बार्शी, जि. सोलापूर, रेस्पॉन्डन्ट नं. ४ धनाजी बाळू पांडुळे, वय- सज्ञान, धंदा- शेती, रा. मालवंडी, ता. बार्शी, जि. सोलापूर, रेस्पॉन्डन्ट नं. ५ सोजर भास्कर चव्हाण, वय- सज्ञान, धंदा- शेती, रा. मालवंडी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांना नोटीस काढूनही सदर रेस्पॉन्डन्ट नं. ३ ते ५ यास नोटीसची बजावणी होत नाही.

त्याअर्थी वरील रेस्पॉन्डन्ट नं. ३ ते ५ यास सदर जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, आपण सदर अपीलकामी सदर जाहीर समन्स प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत अथवा सदर अपीलाची पुढील नेमलेली तारीख ११/०९/२०२४ रोजी स्वतः अथवा अगर माहितीगार वकिलामार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे न्यायालयास द्यावे. मुदतीत आपण हजर होवून आपले म्हणणे दिले नाही तर आपणास सदर समन्सची बजावणी होऊनही आपणास काही सांगायचे नाही असे समजून मा. न्यायालय सदरकामी योग्य पुढील हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स/नोटीस आमचे सही शिक्क्यानिशी मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीख : २४/०८/२०२४

(कोर्टाचा गोल शिक्का)

सही/-
**मा. उपविभागीय अधिकारी क्र. १ सोलापूर विभाग, सोलापूर**

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३१२/२०२४

१) **जिजाबाई ज्ञानदेव वाघ,** रा. वाणी प्लॉट, बार्शी, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील पी.व्ही. सावंत) — अर्जदार

- विरुद्ध -

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,** ग्रामपंचायत, नारी/नारीवाडी, ता. बार्शी, जि. सोलापूर — गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. वाणी प्लॉट, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ जून १९५९ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ जून १९५९ रोजी मौजे नारी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. ३०९/२०२४

१) **प्रज्ञा रमेश भोसले,** रा. बी ३०१, श्री गंगा गॅलेक्स, सदाशिव दांगटनगर, पुणे (असल्यास, तर्फे वकील प्रकाश शिं. साखरे) — अर्जदार

- विरुद्ध -

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,** ग्रामपंचायत, तावडी, ता. बार्शी, जि. सोलापूर — गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. बी ३०१, श्री गंगा गॅलेक्स सदाशिव दांगट नगर, पुणे यांचा मौजे तावडी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १२ जुलै १९८७ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक १२ जुलै १९८७ रोजी मौजे तावडी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**खरेदीपर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रीक्ट व सब डिस्ट्रीक्ट सोलापूर पैकी, तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे मजरेवाडी पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील डी. आय. सी. ऑफिससमोर, होटगी रोड, सोलापूर येथील भुमापन क्र./गट क्र.१५०/१/अ/९/२ यांसी एकूण क्षेत्र १७३२.२३ चौ.मी. यांसी **आकार १०५७ रुपये ० पैसे,** यांसी चतु:सिमा :-

पुर्वस - भुमापन क्र.७४५/२अ व ७४५/१क, पश्चिमेस - भुमापन क्र.१५०/१/अ/२, दक्षिणेस - भुमापन क्र.१५०/१/अ/१/१, उत्तरेस - रस्ता, त्यामध्ये असलेल्या तदंगभूत वस्तुसह.

येणेप्रमाणे चतु:सीमेतील बिगरशेती जागा ही स्वाती रघुनंदन दहिहंडे, रा. सोलापूर यांच्या मालकीची व कब्जे वहिवाटीची असून सदर जागा ही आमचे अशिलांनी खूषखरेदीने विक्री करण्याचे ठरविले आहे.

सदर जागा ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री आमचे अशिलांनी दिलेली आहे. तरी सदर जागेबाबत कोणाचाही व कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास किंवा पोटगी, लिज, दान, टाच, हक्कसोडपत्र, साठेखत, खरेदीखत, गहाणखत इसारापावती व अन्य कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदरची जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत योग्य कागदपत्रांसह खालील पत्त्यावर लेखी कळवावे. या मुदतीच्या आत कोणाचीहि व कसलीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणत्याही स्वरुपाची हरकत आल्यास ती आमचे अशिलांवर व सदरहू मिळकतीवर मुळीचबंधनकारक राहणार नाही, यांची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहिर नोटीस दिली ता. २८/०८/२०२४.

**जागा विकत घेणार**
**सही/-**

**सही/-**
**अशिला तर्फे ॲडव्होकेट**
**ॲड. विरसेन लक्ष्मण फुलझळके**
बी.एल.,एलएल.एम
पत्ता- द्वरा चेंबर नं. ४१, जिल्हा न्यायालय आवार,
सोलापूर मोबा.नं. - ९५७९६९५५३७

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २८०/२०२४

१) **सचिन यशवंत आजबे,** रा. सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी) — अर्जदार

- विरुद्ध -

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी,** नगरपरिषद, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर — गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा, यशवर्धन सचिन आजबे, रा. सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक १२ नोव्हेंबर २०१५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा यशवर्धन सचिन आजबे यांचा दिनांक १२ नोव्हेंबर २०१५ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

**जाहीर नोटीस**

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २५२/२०२४

१) **वत्सला सोपान लोहोकरे,** रा. शेंद्री, ता. बार्शी, सोलापूर (असल्यास, तर्फे वकील उषा पवार) — अर्जदार

- विरुद्ध -

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,** ग्रामपंचायत, शेंद्री, ता. बार्शी, जि. सोलापूर — गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. शेंद्री, ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे शेंद्री, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ मे १९७५ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०१ मे १९७५ रोजी मौजे शेंद्री, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सोलापूरचा कारभारी होण्यासाठी हौश्यांची जत्रा!

**तभा वृत्तसेवा । प्रशांत माने**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

**विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर सोलापूर शहर व जिल्ह्यातील विविध मतदारासंघातून निवडणूक लढवून आमदार होण्यासाठीची सध्या चाललेली राजकीय स्पर्धा पाहता सोलापूरचा कारभारी होण्यासाठी नवख्या हौश्यांची जत्रा केवळ सोलापूरकरांचे मनोरंजन करणारी ठरू नये. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी नवखे ठीक पण राज्य आणि देशाचा कारभार चालविणाऱ्या विधानसभा व लोकसभेत जाण्यासाठी इच्छुकांची सर्वच अनुषंगाने उत्कृष्ठ इमेज देखील तितकीच महत्वाची आहे. प्रदीर्घ सामाजिक कामांचा अनुभव आणि सोलापूर शहर-जिल्ह्याबाबत विकासाची दूरदृष्टी याबाबत अनुभवासह गांभीर्य अत्यावश्यक नव्हे तर किंबहुना बंधनकारकच असण्याची गरज व्यक्त होत आहे.**

## ● प्रदीर्घ सामाजिक कामाचा ठसा गरजेचाच
## ● सोलापूर विकासाबाबत दूरदृष्टीसह गांभीर्यही महत्वाचेच

आता जनसामान्यांना राजकारण कळू लागले असून लोक राजकारणावर अभ्यासपूर्ण बोलतात व कृती देखील करू लागलेले आहेत. त्यामुळे विद्यमानांसह जुन्या लोकप्रतिनिधी व राजकारणी आणि नवख्यांनी राजकारण म्हणजे यशाचा सर्वात सोपा धंदा अशा भ्रमात न राहिलेलेच बरे. लोकसभा आणि विधानसभा तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेची सर्वच सभागृहं पवित्र असून घटनेनुसार उच्चस्थानी आहेत. देशातील प्रत्येक घटकांचे भवितव्य ठरविणाऱ्या या महत्वाच्या सभागृहांमध्ये जाण्यासाठी इच्छुकांनी संपूर्ण तयारी करणे खूपच गरजेचे आहे. असे नाही की, नवख्यांनी राजकारणात येवू नये आणि खासदार, आमदार होण्याचे स्वप्न पाहूच नये. ही स्वप्न प्रत्येकाने निश्चितच पहावीत पण आजकालच्या राजकारणाचा स्तर पाहता अपवाद वगळता हेच का ते ज्यांना आपण मतदान करून निवडून दिले, असा प्रश्न अनेकांना नक्कीच पडत असणार आहे. याउलट नवख्या, सुशिक्षित, चांगल्या चारित्र्याच्या तसेच समाजभान आणि संवेदनशीलता असणाऱ्यांची आज राजकारणाला खूपच गरज आहे. नवख्यांनी राजकारणात जरून यावे पण त्यासाठी समाजकारणासह राजकारणाचाही पाया मजबूत करून नैतिकतेच्या मूल्यांसह मैदानात उतरल्यास त्यांना यश तर नक्कीच मिळेल पण देशाला देखील चांगले राजकारणी मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.






भारतीय राजकारणात हे दिसून आले आहे की, अनेक सुशिक्षित, उच्चशिक्षित, निवृत्त उच्चपदस्थ, सरळमार्गींना राजकारणाच्या आखाड्यात यश आलेले नाही. अपवाद वगळता अशी अनेक उदाहरणे समोर आहेत. राजकारणात यशस्वी व्हायचे म्हणजे साम-दाम-दंड-भेद हा निकष बंधनकारकच असतो का? हे वाटावे असे चित्र नक्कीच आहे.

घराणेशाहीची परंपरा हा आजच्या राजकारणाचा बहुतांश भाग झालेला आहे. यासाठी केवळ राजकीय परंपरा जोपासणाऱ्यांनाच दोष देवून चालणार नाही तर मतदान करणाऱ्यांनी देखील याबाबत विचार करणे महत्वाचे आहे. वारसा असणाऱ्या सक्षम वारसदारांनी राजकारणात आलेही पाहिजे. तर मतदानाचा हक्क बजावून राजकारण आणि राजकारणाला नावे ठेवण्याचा अधिकार नक्की येतो, पण मतदानाकडे पाठ फिरवून पाच वर्षे राजकारण आणि राजकारणी यांच्या विषयी बोट मोडणाऱ्यांना याचा यत्किंतही अधिकार नाही.

'जैसी प्रजा वैसा राजा' ही म्हण तशी बोलकीच आहे.

राजकारणात नव्याने येणाऱ्या युवकांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. परंतु जुन्यांसह अशा नवख्यांसाठी समाजाने काही तरी आचारसंहिता घालून देण्याची गरज आहे. कारण कोणत्याही घटनात्मक संस्थेपेक्षा मतदारांनी जर का राजकीय वातावरण पारदर्शी होण्यासाठी काही पथ्ये पाळली आणि नियमावली केली तर मात्र नक्कीच नवीन काही तरी चांगले घडण्याची अपेक्षा बाळगण्यास हरकत नाही. केवळ मुबलक पैशाच्या जोरावर मिरवण्यासाठी आणि पैशातून सत्ता व सत्तेतून पैसा यासाठी राजकारणात येणाऱ्यांना व असणाऱ्यांना मतदारांनी वेळीच घरचा रस्ता दाखविण्याची गरज आहे. खरोखरच तळमळीने राजकारणात येणाऱ्यांचे स्वागत देखील होणे तितकेच गरजेच आहे. नवख्यांना नियम व अटी घालताना मतदारांनी विद्यमान तसेच जुन्यांच्या राजकारणाचा लेखा-जोखा करणे काळाची गरज आहे. आपले गाव, तालुका, शहर आणि जिल्ह्यांची विकासात्मक अवस्था होती आणि काय आहे हे देखील काय प्रत्येकाने डोळसपणे पाहणे अनिवार्यच आहे. केवळ रस्ते करणे म्हणजे विकास नव्हे तर शहर व जिल्ह्याचा सर्वांगिण विकास होणे महत्वाचेच आहे. विद्यमानांचे दुर्लक्ष होणार नाही याचीही दक्षता महत्वाचीच आहे. केवळ निवडणुकीचा एक ते दोन महिन्यांच्या कालावधीतील घटना घडामोडींचा विचार न करता अथवा परिणाम होवू न देता. समाजाने, मतदारांनी पाच वर्षात झालेल्या आणि न झालेल्या विकासाचा ताळेबंद पारदर्शीपणे मांडण्याची अपरिहार्यता आहे. अन्यथा रोजगारासह विविध कारणांसाठी आपले गाव व शहर सोडणारी आपली पुढची पिढी आपल्याला कधीच माफ करणार नाही. राजकारणी आपली राजकीय पोळी भाजून घेतील, अंतर्गत राजकीय वैमनस्याचे उट्टे काढले जातील. पण हे होत असताना आपल्या शहर व जिल्ह्याच्या विकासाचे काय? याचा देखील गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे. हौश्यांचे राजकारणात नक्कीच स्वागत करा पण ते गांभीर्यपूर्वक झाले पाहिजे हे देखील महत्वाचे आहे.

### निवडणूक पूर्व अन् निकालानंतरही आघाडी धर्माचे पालन बंधनकारकच हवे

निवडणूक लागण्यापूर्वी अनेक राजकीय पक्ष सोयीनुसार युती आणि आघाड्या करतात पण निवडणुकीचा निकाल लागताच सत्ता आणि राजकीय स्वार्थासाठी युती-आघाड्यांचा धर्म मोडून नवीन राजकीय नाती जोडतात. हा प्रकार म्हणजे मतदारांची फसवणूकच मानला जाणे काळाची गरज आहे. पक्षांतर्गत बंदीबाबत कायदा आणला तसा याबाबत देखील कायदा होणे गरजेचे आहे. कारण निवडणुकीपूर्वी राजकीय पक्षांनी मतदारांसमोर जाताना विश्वासाने दर्शवलेल्या राजकीय चित्राचे निकालानंतर युती-आघाडी धर्माचे पालन नाही करणे हा मतदारांशी धोकाच आहे. राजकीय नैतिकता ही लुप्त पावलेली स्पष्ट जाणवते आहे. निवडणुकीच्या पूर्वी राजकीय पक्षांनी युती व आघाड्या केल्यास त्या निकालानंतरही बंधनकारक असतील याबाबत घटनेच्या चौकटीत काही ठोस पळवाटा नसलेला कायदा करणे आजची काळाची गरज बनले आहे. घटनेच्या पदसिध्द पदांवर बसलेल्या मान्यवरांनी याबाबत गांभीर्याने विचार करणे अत्यावश्यक आहे.

# मुंबई, ठाण्यात ढाकुमढूकमचा जल्लोष!

## ● मेणबत्त्याऐवजी बलात्काऱ्यांना जाळा, गोविंदा पथकाची मागणी

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.२७ ऑगस्ट:**

श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने मंगळवारी महानगर मुंबई व ठाणे ठिकठिकाणी दहीहंडीचा सोहळा अलोट उत्साहात साजरा करण्यात आला. भर पावसातील गोविंदा पथकांनी उंच उंच मानवी मनोरे उभे करीत प्रतिष्ठेच्या दहीहंडी फोडत लाखोंचे बक्षीस मिळविले. मराठी व हिंदी चित्रपटातील अनेक सेलिब्रिटींनी दहीहंडीच्या सोहळ्याला हजेरी लावीत आपल्या कला सादर केल्या. ढाकूमढुकूमचा गजरात त्यांनी केलेल्या मोहक नृत्यांला उपस्थित आणि भरभरून दाद दिली.




विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध लोकप्रतिनिधीं, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी लाखोचे बक्षीस लावले होते.त्यांच्या मानाच्या दहीहंडी सोहळ्याला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हजेरी लावली. रात्री उशिरापर्यंत हा जल्लोष सुरू होता.ठाण्याच्या जय जवान क्रीडा मंडळाने सर्वाधिक उंच मनोरे उभारले. सर्वात जास्त दहीहंडी फोडण्याचे आपले वैशिष्ट्य कायम ठेवले.महिला गोविंदां पथकांनीही आपले नैपुण्य दाखवित उपस्थितांची वाहवा मिळविली. दरम्यान बदलापुरातील बालिकेवरील लैंगिक अत्याचारांच्या घटनांच्या निषेधार्थ एका गोविंदा पथकांने एक फलक झळकावला होता, त्यावर किती दिवस मेणबत्ती जाळणार? एकदा बलात्काऱ्याला जाळून बघा. परत कधी मेणबत्ती जाळावी लागणार नाही. असे लिहिले होते.त्याला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईसह मेगाठाणे, बोरिवली, ठाण्यातील विविध दहीहंडी मंडळांना भेट दिली. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जांबोरी मैदान, वरळी, भोईवाडा, , घाटकोपर पश्चिम, टागोर नगर, विक्रोळी पूर्व, रघुनाथनगर, , वर्तकनगर, ठाणे अशोकवन, दहीसर पूर्व, बोरीवली व पोयसर, कांदिवली पश्चिम, मुंबई येथील दहीहंडी सार्वजनिक मंडळांना उपस्थिती लावली.

### १००हून अधिक गोविंदा जखमी

दहीहंडी सोहळ्यानिमित्त मुंबई व ठाण्यात विविध ठिकाणी आलेल्या सोहळ्याला गोविंदा पथक उत्साहाने सहभागी होते त्यामध्ये जवळपास १००वर गोविंदा मनोरे रस्ता खाली पडून जखमी झाले. त्यातील बहुतांश जणांना किरकोळ दुखापती झाल्या प्राथमिक उपचार करून त्यांना सोडण्यात आले तर दहा ते पंधरा जणांना रुग्णालयात दाखल करून उपचार करण्यात आले.



**जुळे सोलापूर :** संभाजी ब्रिगेडच्या वतीने मंगळवारी महिला दहीहंडी उत्साहात पार पडली. पायल कदम यावर्षीची विजेती ठरली. तिला संभाजी ब्रिगेडच्या वतीने ट्रॉफी व नेकलेस हार बक्षीस म्हणून देण्यात आले.

# धार्मिक अधिष्ठान असलेल्या व्यक्तींमुळे धर्माचा विजय : उमाकांत मिटकर

## श्री श्री श्री बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे उमाकांत मिटकरी आणि ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांचा सन्मान



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

धार्मिक अधिष्ठान असलेल्या व्यक्तींमुळे धर्माचा विजय होतो, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर यांनी केले. श्री श्री श्री बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे महाराष्ट्र राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाचे न्यायिक सदस्य उमाकांत मिटकर आणि जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंह राजपूत यांचा सन्मान करण्यात आला.

मठातर्फे सुरू असलेल्या अतिरुद्र स्वाहाकाराचे दर्शन श्री. मिटकर आणि ॲड. राजपूत यांनी मंगळवारी घेतले. यावेळी रुद्रयंत्र, नेपाळहून आलेली रुद्राक्षाची माळ, शाल आणि पुष्पहार घालून दोघांचा मठाधिपती श्रो. ब्र. श्री. शिवपुत्र महास्वामीजी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर स्वागताध्यक्ष विशाल बन्सल, मुंबई येथील उद्योजक आणि स्वागत उपाध्यक्ष सतीश कुलकर्णी, कृष्णात पाटील उपस्थित होते.

श्री. मिटकर म्हणाले, समाजातील सज्जनशक्ती एकत्र करण्याचे काम श्री श्री श्री बसवारूढ महास्वामीजी मठ ट्रस्टतर्फे करण्यात येत आहे. हिंदू धर्म उत्थानाच्या आणि देशसेवेच्या कार्यात भक्त म्हणून मी कायम सहभागी राहीन. ॲड. राजपूत म्हणाले, देव, देश, धर्माचे काम मठातर्फे अत्यंत उत्तम पद्धतीने सुरू आहे. या कार्यात सहभागी होणे आणि आपली सेवा रुजू करणे हे प्रत्येक नागरिकाचे परमकर्तव्य आहे. मठाच्या सेवेसाठी माझे संपूर्ण सहकार्य राहील, असेही जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदीपसिंग राजपूत यांनी सांगितले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन गिरीश गोसकी यांनी केले. कृष्णात पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

# शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या अपमानाविरोधात राष्ट्रवादीचे आज गडावर आंदोलन

**मुंबई, दि.२७ ऑगस्ट-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळ्याचे घाईगडबडीत केलेले अनावरण हे स्वराज्याच्या स्वाभिमानाला ठेच पोहचणारे ठरले. काल सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्यावरील शिवरायांचा पुर्णाकृती पुतळा कोसळला. या घटनेचा निषेध नोंदविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी थेट घटनास्थळी जाऊन याविरोधी आंदोलनाचा पुकारा दिला आहे. बुधवारी (दि. २८) सकाळी ११.०० वाजता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील राजकोट किल्ल्याजवळ हे आंदोलन करण्यात येईल.

महाराष्ट्राच्या आराध्य दैवताच्या पुतळ्याची पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटनाची एवढी घाई का करण्यात आली?. तसेच या घटनेशी संबंधित सर्व अधिकारी, कंत्राटदार व इतर यंत्रणेच्या बेजबाबदारीचा जाब या आंदोलनाच्या माध्यमातून सत्ताधाऱ्यांना विचारण्यात येणार आहे. यासह पक्षाच्यावतीने सर्व राज्यभरात या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी स्थानिक पातळीवर आंदोलन करण्याचे आवाहनदेखील करण्यात आले आहे.

# अशोक चौक परिसरातील काढले अतिक्रमण

## टपरी, बाकडे, पलंग व इतर साहित्य जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज अशोक चौक परिसरातील रस्त्यालगतचे अतिक्रमण हटविण्यात आले.

पोलीस बंदोबस्तात जेसीबीच्या साह्याने ही कारवाई करण्यात आली. मनपा आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली रहदारीस अडथळा ठरणारे तसेच फुटपाथवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू आहे. या मोहिमेअंतर्गत मंगळवारी शहरातील अशोक चौक परिसरातील फुटपाथ वरील अतिक्रमण काढण्यात आले. या कारवाईत एक टपरी, तीन बाकडे, एक लोखंडी पलंग व इतर साहित्य जप्त करण्यात आले. तसेच रस्त्यालगतचे अतिक्रमित कट्टे जेसीबीच्या साह्याने निष्काषित करण्यात आले. शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक मुर्तुजा शहापुरे यांनी आहे.



# यंदाही त्याच गट शिक्षणाधिकाऱ्यांच्या नियुक्तीने शिक्षकांमधून नाराजी

## आदर्श शिक्षक पुरस्कारासाठीची पडताळणी पारदर्शी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा । बसवराज बिराजदार**
**अक्कलकोट दि.२६ ऑगस्ट**

गतवर्षी वादग्रस्त ठरलेले गट शिक्षण अधिकारी विठ्ठल निंबर्गी यांनाच यंदाही आदर्श शिक्षक पुरस्कार पडताळणीसाठी नियुक्त केले असल्याने शिक्षकांमधून नाराजी व्यक्त होत असल्याची चर्चा आहे.

याप्रकाराबद्दल काही संघटनांकडून जिल्हा शिक्षण अधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. तर काही संघटनांनी निषेध देखील नोंदवला होता. असे असतानाही पुन्हा निंबर्गी यांनाच पडताळणीसाठी नियुक्त केल्याने उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. शासनाने चांगल्या योजना राबविल्या आणि योजना राबविणारे अधिकारी जर मनमानी करीत असतील तर शासनाचा उद्देश सफल होत नाही. आदर्श शिक्षक पुरस्कारसारखी वशिला, घोडे बाजार सुरू असल्याची चर्चा आहे. अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी वरिष्ठांनी याची दखल घ्यावी, अशी मागणी शिक्षक वर्गातून होत आहे. राज्य सरकारकडून उत्कृष्ट शिक्षकांना शिक्षकदिनी पुरस्कार देण्यात येतो. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून आदर्श शिक्षक निवडीची प्रक्रिया राबविली जाते. विद्यार्थ्यांना घडवितांना सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या शिक्षकांकडून ५ ऑगस्टपर्यंत अर्ज मागविले होते. अक्कलकोट पंचायत समिती येथे दि. ५ ऑगस्टपर्यंत प्रस्ताव सादर करण्यचे निर्देश जि.प.शिक्षण विभागाकडून देण्यात आले होते. त्या अनुषंगाने अंतिम मुददतीत, शासकीय वेळेनुसार चार प्रस्ताव दाखल झाले आहेत. दोन प्रस्ताव मुदतीनंतर दाखल झाले असल्याने जिल्हा कार्यालयाने ते स्वीकारले नाही. आदर्श शिक्षक निवडीसाठीची पडताळणी पारदर्शी पध्दतीने व्हावी, अशी मागणी शिक्षकांमधून होत आहे. जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शासनाच्या निकष आणि नियमानुसार प्रामाणिक कर्तव्यदक्ष गुणवत्ता शिक्षकांनाच आदर्श शिक्षक पुरस्कार द्यायचे असेल तर त्यांनी व्हिडिओ शूटिंग करून शिक्षकांची पडताळणी करून आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करावेत, अशी मागणी होत आहे.



### यावर्षी निवड पारदर्शी होईल

गेल्या वर्षी मी येथे नव्हतो यामुळे गेल्या वर्षी काय झालं हे मला माहीत नाही.गेल्या वर्षी सारखं मनमानी कारभार मी यावेळी खपून घेणार नाही. तात्काळ दोषिवर कायदेशीर कारवाई करणार आहे.

**- कादर शेख**
**जिल्हा शिक्षण अधिकारी सोलापूर**

### शिक्षणाधिकारी योग्य निर्णय घेतील

पडताळणीसाठी कोणता तालुका कोणाला द्यायचा हा अधिकारी जिल्हा शिक्षणाधिकारी यांचा असून पुरस्काराबाबत ते योग्य निर्णय घेतील.

**- प्रशांत अरबाळे**
**गट शिक्षणाधिकारी अक्कलकोट**

तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# आदित्यनाथांच्या इशाऱ्याचा अन्वयार्थ

उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे त्यांच्या परखड भूमिकांसाठी ओळखले जातात. मुख्यमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारल्यावर त्यांनी तेथील गुंडाराजचा सफाया सुरू केला तेव्हा कोण कुठल्या जातीचा-धर्माचा हे पाहिले नाही. त्यांच्या कारवाईचा बुलडोझर सर्व प्रकारच्या जाती-धर्मातील माफियांवर फिरला. एखाद्या विशिष्ट समुदायात माफिया आणि गुंड तत्त्वांची संख्या अधिक असेल तर त्यात त्यांचा इलाज नाही. पण, योगी आदित्यनाथांच्या सरकारच्या काळात जातीय किंवा धार्मिक अंगाने माफियाराज विरोधी कारवायांचा अवलंब झाल्याचे उदाहरण नाही. २०१७ मध्ये योगी आदित्यनाथ उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री झाले. अँटिरोमिओ स्क्वाड्सची स्थापना, गोवंशाच्या तस्करीवर बंदी, तंबाखू-पान-गुटखा यावर सरकारी कार्यालयांमध्ये बंदी, गुन्हेगारांशी हातमिळवणी करणाऱ्या पोलिसांची हकालपट्टी, अवैध कत्तलखाने बंद करण्याचा आदेश हे त्यांचे आरंभीचे निर्णय. त्यांनी सत्ता सांभाळताच पहिल्या वर्षात पोलिसांनी दररोज सरासरी चार गुंडांचा खात्मा केल्याचा मुद्दा समोर आला तेव्हा त्यांच्यावर टीकाही झाली होती. योगी आदित्यनाथ बिनधास्त आणि बेधडक आहेत. योगी काहीही बोलले तरी विरोधक त्यांच्यावर टीका करतात. आता आग्रा येथे वीर दुर्गादास राठोड यांच्या पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी योगी आदित्यनाथ म्हणाले की, बांगलादेशसारख्या चुका आता व्हायला नको. तेथे हिंदूंवर अत्याचार होत आहेत. लक्षात ठेवा, आपण विभाजित राहिलो किंवा झालो तर आपण संपलो (बटेंगे तो कटेंगे...). राष्ट्रापेक्षा मोठे काहीही असू शकत नाही. आपण एकजूट राहिलो तरच राष्ट्र असेल, एकसंध राष्ट्रात आपल्याला समृद्धीचा अनुभव घेता येईल आणि आपल्यात फूट पडली तर आपले नुकसान होईल. आता या आवाहनात जातीयता किंवा धर्मांधता यातले काहीही नाही. योगींचे आवाहन समस्त भारतीयांना आहे. पण, त्यांना वेगळ्या चष्म्याने पाहणाऱ्यांनी त्यांच्यावर टीका सुरू केली आहे. असदुद्दिन ओवैसीसारख्या नेत्यांना त्यांची वक्तव्ये झोंबत असतील तर त्याची काही वेगळी कारणे असू शकतात. योगी आदित्यनाथ यांचे आवाहन राष्ट्रीय एकात्मतेची गरज अधोरेखित करणारे आणि तिचे महत्त्व समजावून सांगणारे आहे आणि त्याला अनेक ऐतिहासिक संदर्भही आहेत. गेली हजारो वर्षे हिंदू समाज भारतभूमीवर राहत आहे. पण, आपल्या समाजात विषमता, जातीयता आणि विद्वेषाचे वातावरण असल्यामुळे परकीयांनी आपला फायदा उचलला आणि आपल्यावर राज्य केले. अनेक आक्रमणे आणि परकीय वर्चस्वाचा काळ अनुभवलेल्या भारतभूमीचे ऐतिहासिक वास्तव योगींनी लक्षात आणून दिले आहे. भारताचा इतिहास एकीकडे ज्ञान-विज्ञान-तंत्रज्ञान- तत्त्वज्ञान- अध्यात्म-कला-साहित्यादि क्षेत्रातील प्रगतीने तेजाळणारा असला, तरी आपल्या समाजात असलेली विषमता, जातीयवाद हाही आपल्याच इतिहासाचा भाग आहे, हे विसरता येत नाही. त्यामुळेच परकीयांना या देशावर राज्य करण्यासाठी साथ देणारे स्वकीयच होते, हेही विसरता येत नाही. प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील आक्रमणांची मालिका पाहिली तर परकीयांनी भारतीय उपखंडातील अंतर्गत मतभेदांचा फायदा घेतल्याचे दिसते. ब्रिटिशांनी भारतावर जवळजवळ दोन शतके राज्य केले. त्यांनी मुद्दाम फोडा आणि राज्य करा ही रणनीती वापरली. ही रणनीती नेमकी प्रभावी ठरली. कारण भारतीय समाज जात, धर्म आणि प्रादेशिक अस्मितांच्या मुद्द्यांवर विखंडित झालेला होता. भारत नावाची पुण्यभूमी हा आपला आत्मा आहे आणि हिंदुत्व हा आपला श्वास आहे, याचे विस्मरण झाल्याने आपल्याला परकीयांच्या वर्चस्वाखाली कित्येक दशके राहावे लागले. युरोपात एकीकडे स्वातंत्र्याची चळवळ जोर धरत असताना आपल्या भारतात परकीय सत्तेचे फास आवळण्याचा कार्यक्रम सुरू होता आणि आपल्या समाजातील विखंड त्यासाठी फायद्याचा ठरत होता. इंग्रजांनी जातीय व धार्मिक मतभेदांचा फायदा घेऊन जातीय तणाव वाढवला, जातीय शत्रुत्व वाढवले आणि प्रादेशिक शक्ती एकमेकांच्या विरोधात उभ्या केल्या. याच विखंडित मानसिकतेने १९४७ मध्ये भारताच्या फाळणीचा पाया घातला. भारताच्या इतिहासातील सर्वांत क्लेशकारक घटनांपैकी एक अशी ही घटना. त्यात मोठ्या प्रमाणात हिंसाचार झाला आणि लाखो लोकांचे विस्थापन झाले. आया-बहिणींच्या अब्रूचे धिंडवडे निघाले. या कालखंडातील धडे स्पष्ट आहेत; पण त्यातून आपण पुरेसे शिकलो, असे मात्र आजही दिसत नाही. योगी आदित्यनाथ जे म्हणतात, त्याकडे या ऐतिहासिक वास्तवाच्या चष्म्यातून बघितले पाहिजे. २१ व्या शतकात भू-राजकीय संघर्ष वाढत आहेत आणि त्याच वेळी जागतिक शक्ती बनण्याची आकांक्षा घेऊन भारताची घोडदौड सुरू आहे. या आकांक्षेचे प्रत्यक्षात उतरणे भारताच्या अंतर्गत ऐक्यावर अवलंबून आहे. धार्मिक, वांशिक, भाषक, पंथीय किंवा प्रादेशिक आधारावर विभागले गेलेले राष्ट्र जागतिक स्तरावर आपली ताकद दाखवू शकत नाही. अंतर्गत संघर्ष आणि विभाजनामुळे राष्ट्राची जडणघडण कमकुवत होते. त्यामुळे ते बाह्य दबावांना बळी पडते आणि अंतर्गत अशांततेला खतपाणी घालणारे ठरते. आता तर सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या उदयामुळे विभाजनवादी शक्तींची आणि ध्रुवीकरण घडवू पाहणाऱ्यांची क्षमता वाढली आहे. चुकीची माहिती, खोट्या बातम्या आणि प्रक्षोभक वक्तृत्वांचा प्रसार-प्रचार झपाट्याने होऊ लागला आहे. त्यातून समाजात फूट वाढताना दिसते आणि संघर्षही झडताना दिसतात. डिजिटल युग हे भारताच्या फायद्याचे असले, तरी या युगात राष्ट्रीय एकात्मतेसाठी नव्याने वचनबद्धतेची गरज आहे, हाच योगी आदित्यनाथ यांच्या वक्तव्याचा सांगावा आहे. विखंडित मानसिकतेमुळे आपण दीर्घकाळ पारतंत्र्य भोगले. मात्र, स्वातंत्र्याचा संघर्ष धार्मिक आणि प्रादेशिक भेदांच्या पलीकडे जाऊन सामूहिक राष्ट्रीय अस्मितेने चिन्हांकित झाला तेव्हा देश स्वतंत्र झाला हाही इतिहास आहे. एकसंध भारत जागतिक आव्हानांवर मात करू शकतो, जागतिक मंचावर आपले स्थान निश्चित करू शकतो आणि सर्व नागरिकांसाठी समृद्धी सुनिश्चित करू शकतो, हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारच्या कामगिरीने गेल्या दशकभरात दाखवून दिलेले आहे. योगी आदित्यनाथ यांच्या एकतेच्या आवाहनाला या व्यापक संदर्भासह पाहिले पाहिजे. त्यांचे विधान धार्मिक किंवा सांप्रदायिक विभाजनासाठी नसून बाह्य आणि अंतर्गत आव्हानांना तोंड देताना एकतेच्या महत्त्वाचे स्मरण करून देणारे आहे. त्यांनी दिलेला बांगलादेशातील हिंदूंच्या परिस्थितीचा संदर्भ हा सावधगिरीचा इशारा आहे. जेव्हा एखादा समुदाय उपेक्षित आणि विभाजित असतो, तेव्हा काय होऊ शकते, हा त्याचा अन्वयार्थ आहे. योगी आदित्यनाथांचे आवाहन केवळ हिंदूंना उद्देशून केले गेलेले नाही. ते सर्व भारतीयांनी एकत्र उभे राहण्याचे आवाहन आहे. एकता ही केवळ राष्ट्राभिमानाची बाब नसते. तिचा संबंध राष्ट्रीय अस्तित्वाशी आणि पर्यायाने देशातील माणसे, त्यांची कुटुंबे, त्यांचे जीवन यांच्याशी आहे. भू-राजकीय प्रतिस्पर्ध्यांमुळे किंवा अंतर्गत कलहामुळे, भारतातील सामाजिक स्थैर्य आणि शांततेला तडा जाऊ नये, या कळकळीतून एखादा नेता एकात्मतेची गरज अधोरेखित करीत असेल, तरी त्याच्याकडे संशयाने पाहणे चूक आहे. खरे तर भारताची विविधता ही आपली सर्वांत मोठी ताकद आहे. एवढ्या विविध जाती-धर्मांचे, भाषांचे, बोलींचे लोक एका भूखंडावर राहतात आणि ते लोकतांत्रिक राष्ट्र म्हणून निरंतर प्रगतिपथावर असते, असे एकही उदाहरण जगाच्या पाठीवर नाही. विविधतेतील एकता ही संकल्पना आणि त्या संकल्पनेचे प्रात्यक्षिक केवळ भारताच्या रूपाने सारे जग गेली कित्येक दशके पाहत आहे. आपले हे स्वरूप शक्तिमान करायचे असेल तर आपसी मतभेद विसरण्यासह जाती-धर्मांच्या पलीकडे गेले पाहिजे. विशेषतः हिंदू समाजाने जातीय व भाषिक भेदांच्या पलीकडे जाऊन एकतेचे माहात्म्य पुन्हा अधोरेखित केले पाहिजे. एकतेत ताकद असते आणि ताकदवानाकडे कुणीही वाकडी नजर करून पाहत नाही, हाच योगींच्या आवाहनाचा खरा अर्थ होय.

## चिंतन

**गुरुदत्त दिनकर वाकदेकर**

# सभ्यतेवर प्रश्नचिन्ह ?

कोलकाता येथील मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरवर बलात्कार करून खून केल्याच्या घटनेनंतर महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील एका खाजगी शाळेत दोन मुलींचे लैंगिक शोषण झाल्याची घटना समोर आली आहे. कोलकाता घटनेप्रमाणेच उत्तराखंडमधील उधमसिंग नगरमध्ये घरी परतणाऱ्या एका नर्सवर बलात्कार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली. बिहारमधील मुझफ्फरपूरमध्येही एका १४ वर्षीय विद्यार्थिनीवर बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. महिला आणि लहान मुलींवर बलात्काराच्या घटना उघडकीस येत असताना अशा घटना वारंवार आपल्या सभ्यतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात.

आता या समस्येमागील मानसशास्त्रावर गांभीर्याने चर्चा करावी लागेल, तरच या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा निघू शकेल. कोलकाता येथील प्रकरणाचा तपास सीबीआयकडून केला जात आहे. काही आरोपींना अटक करण्यात आली असून, ते चौकशीला सामोरे जात आहेत. मात्र या प्रकरणात कलकत्ता उच्च न्यायालयाने ज्याप्रकारे पश्चिम बंगाल सरकारला चाप लावले आणि त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ज्या पद्धतीने या प्रकरणाचा निकाल लावला आहे, त्यामुळे या प्रकरणातील पश्चिम बंगाल सरकारचे प्रशासकीय अपयश उघड झाले आहे. हे बलात्कार-हत्येचे प्रकरण आपल्या समाजावर प्रश्न निर्माण करते आणि वाढत्या मानसिक विकृतीकडे निर्देश करते. महिलांवरील लैंगिक हिंसाचार रोखण्यासाठी केवळ कायदा, शासन आणि पोलिस प्रशासन प्रभावी नाही, तर सामाजिक आणि कौटुंबिक मूल्ये विकसित करण्याचीही गरज आहे.

आज ज्याप्रकारे अशा घटना वाढत आहेत, ते केवळ काही घटकांची मानसिक दिवाळखोरी म्हणून फेटाळून लावता येणार नाही. समाजात अशा वर्तनाचे वाढते प्रमाण हे स्पष्टपणे सूचित करते की, आपल्या सामाजिक जडणघडणीत कुठेतरी काहीतरी गडबड आहे. हा दोष आपोआप निर्माण झाला आहे की जाणूनबुजून निर्माण केला जात आहे, याचाही येथे विचार करणे आवश्यक आहे. डिसेंबर २०१२ च्या दिल्ली सामूहिक बलात्काराच्या घटनेचा निषेध करण्यासाठी लोक ज्याप्रकारे रस्त्यावर उतरले ते पाहून कदाचित आपला समाज जागा झाला असेल असे वाटले. मात्र, या घटनेनंतरही अशा बातम्या येतच राहिल्या. क्रूरता आणि क्रूरतेच्या अशा घटनांबद्दलचा संताप न्याय्य आहे, परंतु केवळ रागाने कोणतीही समस्या सुटू शकत नाही. अशा घटना वारंवार का घडत आहेत, यावर चिंतन केले पाहिजे.

पुरुषप्रधान समाज खऱ्या अर्थाने महिलांचा आदर करतो का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एकीकडे आपण महिलांच्या बाबतीत स्वतःला पुरोगामी समजतो तर दुसरीकडे महिलांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन स्पष्ट नाही. जोपर्यंत आपण खऱ्या अर्थाने महिलांचा आदर करायला शिकत नाही, तोपर्यंत अशा घटनांना आळा घालण्यासाठी केलेले सर्व उपाय कुचकामी ठरतील. वास्तविक, बलात्कार हा असा शोषक शब्द आहे की तो शोषक वर्तन आणि प्रक्रिया दर्शवितो; जी केवळ आपल्या अस्तित्वालाच धक्का देत नाही तर आपल्यामध्ये न्यूनगंड निर्माण करते. या वर्तनाचा एक दुःखद आणि विरोधाभासी पैलू म्हणजे हे घृणास्पद कृत्य करणाऱ्या व्यक्तीमध्ये न्यूनगंड निर्माण होत नाही, उलट पीडित व्यक्ती स्वतःला कनिष्ठ समजू लागते. जगातील कोणतीही शोषणात्मक वागणूक श्रेष्ठत्व आणि कनिष्ठतेच्या भावनेशिवाय उद्भवत नाही. या वर्तनात स्वतःला श्रेष्ठ किंवा श्रेष्ठ सिद्ध करण्याची आणि इतरांना कनिष्ठ किंवा हीन सिद्ध करण्याची प्रवृत्ती असते. बलात्कार किंवा बलात्कारासारख्या घटनांमध्येही ही भावना तात्पुरती निर्माण होऊ शकते. शिवाय वासनेचा तात्कालिक आवेगही अशा घटनांना कारणीभूत असतो. असे घृणास्पद कृत्य करणाऱ्यांना मानसशास्त्रज्ञ मानसिक रुग्ण म्हणतात. या जमान्यात हे मानसिक आजार का वाढत आहेत, असा प्रश्न उपस्थित होत आहे. अशा घटनांचे गांभीर्य केवळ बलात्कार करणाऱ्याला किंवा बलात्कार करणाऱ्याला मानसिक आजारी म्हणून कमी करता येत नाही. यापूर्वी अशा घटना घडल्याच नाहीत असे नाही. याआधीही अशा घटना उघडकीस येत होत्या; मात्र अलिकडच्या काळात अशा घृणास्पद कृत्यांचा महापूर आला आहे. हा पूर कधी आणि कोणाला वेठीस धरेल सांगता येत नाही. हा पूर रोखण्यासाठी करण्यात येत असलेल्या सर्व उपाययोजना वरवरच्या आणि तात्पुरत्या ठरत आहेत. बलात्काराची एक घटना आपण विसरण्याआधीच दुसरी घटना प्रकाशात येते, हे दुर्दैवी आहे. अशा घटनांच्या निषेधार्थ जनता रस्त्यावर उतरते, पण जनतेचा रोष, सरकारचे प्रयत्न आणि कायद्याचा धाकही गुन्हेगारांच्या मनांना पराभूत करू शकत नाहीत. अशा घटनांनंतर बलात्कार करणाऱ्यांना लवकरात लवकर फाशी द्यावी, अशी जनतेची मागणी आहे. मात्र फाशीच्या भीतीने अशा घटना प्रत्यक्षात कमी होतील का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. निर्भया प्रकरणातील दोषींना फाशी झाली; मात्र त्यानंतरही बलात्कार आणि खुनाच्या अनेक घटना घडल्या. आज काही समाजविघातक शक्ती जाणीवपूर्वक समाज पेटवण्याचा प्रयत्न करत आहेत, हे दुर्दैव आहे. त्यामुळेच जनतेचा रोष किंवा फाशीची भीती अशा घटनांना आळा घालू शकत नाही. आज काही विचारवंत नैतिकता आणि पुरोगामित्व या परस्परविरोधी प्रक्रिया आहेत, हे सिद्ध करण्यात मग्न आहेत. तर, पुरोगामी असणे म्हणजे नैतिकता गमावणे नव्हे. त्यामुळे पुरोगामी राहून समाजाची नैतिकता कशी जपता येईल, याचा विचार करायला हवा. बलात्काराच्या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर कायदे आणि पोलिसांची सतर्कता नक्कीच आवश्यक आहे. परंतु हे उपाय या समस्येवर खरे उपाय नाहीत. अशा घटनांच्या मूळ कारणांवर लक्ष केंद्रित करण्याची वेळ आता आली आहे. गेल्या काही वर्षांत नैतिकता आणि अनैतिकता यांच्यातील रेषा ज्याप्रकारे धूसर झाली आहे, ती दुर्दैवी आहे. टीव्ही, चित्रपट आणि जाहिरातींमध्ये जी नग्नता प्रचलित आहे ती आज नैतिक बनली आहे. इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या पॉर्न साईट्समुळेही नग्नता आणि वासनेची नवी शाखा निर्माण होत आहे. जेव्हा आपण चित्रपटांमध्ये द्विअर्थी संवाद आणि नग्न दृश्ये ऐकतो आणि पाहतो तेव्हा कुटुंबासमोर आपले डोके शरमेने झुकते. अनेक चित्रपटांची गाणी आणि संगीत ऐकून आणि या गाण्यांवरील नायक-नायिकांनी केलेला अभिनय पाहून असे वाटते की, श्रोत्यांच्या आणि प्रेक्षकांच्या नावावर हे सर्व मुद्दाम केले जात आहे. अशा परिस्थितीतही सेन्सॉर बोर्ड गाढ झोपेत आहे, ही गंमत आहे.

सामाजिक आणि मानसिक नग्नतेची प्रक्रिया व्यक्तीला मानसिक आजारी बनवते. अशा घटना रोखण्यासाठी कठोर कायदे तसेच सामाजिक प्रबोधन आवश्यक आहे. आता सरकार, समाज आणि कुटुंबाला या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. कायमस्वरूपी उपचार नसताना महिलांवरील लैंगिक हिंसाचाराचा आजार आपल्या समाजात कॅन्सरसारखा वाढत राहील आणि आपण रस्त्यावर उतरून आपला संताप व्यक्त करत राहू. महिलांचा सन्मान राखूनच अशा घटना थांबवता येतील.

९९८७७४६७७६

## वेध

**गिरीश शेरेकर**

# अश्लील संकेतस्थळांचे धोकादायक परिणाम

देशात इंटरनेट क्रांती झाली अन् स्मार्टफोन प्रत्येकाच्या हातात आला. एका क्लिकवर जगातली कोणतीही माहिती मोबाईलच्या स्क्रीनवर दिसायला लागली. तासाचे काम सेकंदावर आले. एखादी सुविधा तुम्ही कोणत्या उद्देशातून वापरता यावरच सर्व काही अवलंबून आहे. या बदलाचे जसे फायदे दिसले तसे तोटेदेखील वेळोवेळी समोर येत आहेत. फायद्याची चर्चा जाहीरपणे होते. ती व्हायलाच पाहिजे आणि सर्वांसाठीच ती प्रेरणादायी ठरू शकते. पण, इंटरनेटच्या माध्यमातून मोबाईलवर सहज पाहायला मिळणाऱ्या अश्लील संकेतस्थळांवरच्या चित्रफितींमुळे जे नुकसान होत आहे, त्यावर मात्र अजिबातच चर्चा होताना दिसत नाही. अशा विषयांवर चर्चा करणे म्हणजे आपल्याकडे महापाप समजले जाते. उमजते, समजते पण बोलायचे नाही, या वृत्तीने युवापिढीचे प्रचंड नुकसान होत आहे. वयात येणाऱ्या किंवा आलेल्या आपल्या पाल्याकडे जो स्मार्टफोन आहे, त्याचा उपयोग कसा होतो आहे, याची पुसटशी कल्पना अनेक पालकांना नसते. अश्लील चित्रफिती पाहण्यासाठीच मोबाईलचा उपयोग होतो, असे आमचे अजिबात म्हणणे नाही. जी माहिती समोर येत आहे, त्यावरून बेरोजगार असणारे अनेक युवा गुगलवर नोकऱ्यांचा शोध घेण्याऐवजी अश्लील चित्रफितींचा शोध सर्वाधिक घेताना आढळले आहे. ज्यांच्याकडे रोजगार आहे, ते पण अशा शोधकार्यात मागे नाही.

कोलकाता घटनेनंतर महिला सुरक्षेवर व्यापक चर्चा सुरू झाली. पण, सुरक्षेचे मुद्दे शोधण्याऐवजी अश्लीलतेचाच शोध जास्त झाला. १० ते २० ऑगस्ट दरम्यानचे त्याचे प्रमाण ९०.८ टक्के आहे. नोकरी शोधण्याचे प्रमाण १७.४ टक्के तर कोलकाता घटनेसंदर्भातली माहिती ३०.३ टक्के शोधली गेली. 'कोलकाता रेप व्हिडीओ' देखील शोधला गेला. पीडितेचा फोटो, नाव टाकून शोधण्यात आला. घटना घडली की गळे फाडणारे आपण समाज म्हणून कुठे आहोत, याचा विचार यानिमित्ताने व्हायला हवा. मध्यंतरी अश्लील संकेतस्थळांचा मुद्दा चर्चेला आला होता. वेगवेगळ्या न्यायालयांमध्ये यावर चर्चा झाली. केंद्र सरकारने गंभीर दखल घेऊन ८०० पेक्षा जास्त अश्लील चित्रफितींची संकेतस्थळे बंद केली. त्याचा पाहिजे तसा परिणाम दिसत नाही. जी संकेतस्थळे खुली आहेत, त्यावर जाऊन चित्रफिती पाहिल्या जात आहेत. अभ्यासातल्या एका माहितीनुसार अमेरिका, ब्रिटननंतर भारतात सर्वाधिक अश्लील चित्रफिती बघितल्या जातात. वयानुसार त्याचे प्रमाण सांगायचे झाल्यास १८ ते २४ वर्ष वयोगटातले ४४ टक्के, २५ ते ३४ वय वर्षातले ४१ टक्के, ३५ ते ४४ वयातले ६ टक्के आणि ४५ ते ५४ वय असणारे ३ टक्के आहेत. १८ ते ३४ वर्ष वयोगटातील आकडे एकत्र केले तर ८५ टक्के युवा या चित्रफितींचा शोध घेतात. गेल्या सहा महिन्यातली स्थितीपण हीच आहे आणि गेल्या दोन वर्षातल्या आकड्यांमध्येही फारसा फरक नाही. आश्चर्य म्हणजे नोकरी, शिक्षणाची माहिती व जीवनात उपयोगात येणारे मुद्दे शोधकार्यात फारच गौण ठरले आहे. 'पॉर्न हब' असेच एक नावाजलेले संकेतस्थळ आहे. भारतातला वापरकर्ता या संकेतस्थळावर किमान सरासरी ८ मिनिटे २२ सेकंद राहतो. आसाम, बिहार, राजस्थान, चंदीगड, पश्चिम बंगालचा वापरकर्ता सरासरी ९ मिनिटांपेक्षा जास्त वेळ घालवितो. ज्या संस्कृतीत आपण वावरतो, त्या समाजव्यवस्थेसाठी ही बातमी फार चांगली नाही.

पूर्वीपण घटना झाल्या आहेच; पण निर्भया प्रकरणापासून देशात ज्या काही अत्याचाराच्या घटना चर्चेत आल्या आहेत, त्या घटनांसाठीचे आरोपींना मिळालेले प्रोत्साहन अश्लील चित्रफितीतूनच मिळाल्याचे तपासातून समोर आले आहे. कोलकाता घटनेतला आरोपी हिंसक अश्लील चित्रफीत पाहूनच हैवान झाला. ही एक प्रकारची विकृती आहे. अश्लीलतेचा गुलाम होणाऱ्यामध्ये ती लवकर बळावते आणि त्यातून मन हेलावणाऱ्या घटनांचा जन्म होतो. आपल्या देशात सेन्सॉर बोर्ड आहे. जे चित्रपट तयार होतात, ते कोणत्या वयोगटासाठी आहेत, याचे वर्गवारीनुसार ते प्रमाणपत्र देतात. पण, इंटरनेटच्या माध्यमातून येणाऱ्या अश्लील चित्रफितींबाबत आपल्या देशात कोणताच ठोस कायदा नाही. वेबसीरिज, ओटीटीवर काही बंधन नाही. महिला सुरक्षेच्या दृष्टीने विचार करायचा झाल्यास अश्लील चित्रफिती हा त्यासाठी एक भयंकर व्हायरस ठरत आहे. त्याला थांबविण्यासाठी कठोर पावले उचलावी लागणार आहेत. आपल्या देशात वयस्कांना हे करू नका, ते पाहू नका या प्रकारचे सल्ले देऊन काही नियम केले तर स्वातंत्र्याचे लगेच हनन होते. पण, अनेक दुर्दैवी घटना जेव्हा डोळ्यांसमोर येतात, त्यावेळी समाजासाठी जे घातक आहे, त्यासाठी तरी कायद्याने बंदी आणणे आवश्यक आहे. सरकार त्यावर विचार करेल हा विश्वास आहे.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

**प्रा. दिलीप जोशी**

# एक बिल्वं शिवार्पणम्!

श्रावण महिन्यात भगवान शिवशंकराची आराधना पुण्यफलदायी आहे. भगवान महादेवांना, 'बिल्वपत्र' म्हणजे बेलपत्र, साध्या शब्दात बेलाचे पान अत्यंत प्रिय आहे. भाविक भक्त व्रतस्थ राहून बिल्वभंडार 'ॐ नमः शिवाय' या पंचाक्षरी मंत्रासह पिंडीवर अर्पण करतात. बिल्व ही देवदत्त आणि प्रासादिक वनस्पती आहे. या बिल्ववृक्षाच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आहेत. त्यातील अनेक दंतकथा आहेत, पण बिल्ववृक्ष निर्माणाची कथा ऋग्वेदीय सूक्तात पाचव्या मंडलातील खिलसूक्तात आहे. हे खिलसूक्त म्हणजे सुप्रसिद्ध असे 'श्रीसूक्त' आहे.

*आदित्यवर्णे तपसोऽधि जातो वनस्पतीस्तव वृक्षोऽथ बिल्वः ।*
*तस्य फलानि तपसानुदंतु मायांत रायाश्च बाह्या अलक्ष्मीः ॥*


आदित्य म्हणजे बालसूर्यासम वर्ण असलेल्या श्रीलक्ष्मीच्या तपःसामर्थ्याने बिल्व नावाची वनस्पती निर्माण झाली. त्याच्या फळाच्या योगाने आपल्या घरातील अलक्ष्मी घराबाहेर जाऊन तिची जागा लक्ष्मी घेते. अशाच आशयाची कथा स्कंद पुराणात आहे. 'देवी भागवत' आणि 'कालिका पुराणात' जगाच्या कल्याणासाठी त्रिगुणात्मिका जगदंबेने बिल्वारण्यात तपश्चर्या केली तेव्हा भगवती कात्यायनीने शमी वृक्ष तर भगवती लक्ष्मीने बिल्व वृक्ष निर्माण केल्याचा उल्लेख आहे.

*बिल्वारण्ये तपश्चक्रे लक्ष्मीःलोकहितार्थिनी ।*

श्री म्हणजे श्रीमहालक्ष्मी. तिच्या तपश्चर्येतून निर्माण झाला म्हणून बिल्ववृक्ष हा 'श्रीवृक्ष' आहे आणि बिल्वफळ हे 'श्रीफळ' आहे. आपण नारळाला श्रीफळ म्हणतो, पण शास्त्रानुसार श्रीफळ म्हणजे बिल्वफळ आहे. या वृक्षाला ऋग्वेदाने वनस्पती संबोधिले आहे. म्हणजे बेल ही औषधीय वनस्पती आहे. महर्षी चरक आणि महर्षी सुश्रुत यांनीही बेलाचे महत्त्व सांगितले आहे. वनस्पती तीन प्रकारच्या असतात. १. फूल आणि फळ दोन्हीही येणारे. २. फक्त फूल येणारे आणि ३. फक्त फळ येणारे. बिल्व ही फक्त फळ येणारी वनस्पती आहे. म्हणून ती फळदायी आहे. बिल्व ही शरीराची शुद्धता आणि सप्तधातू निर्माण करणारी आयुर्वेदिक वनस्पती आहे.

बेलाचे वर्णन करताना आद्य शंकराचार्यांनी 'बिल्वाष्टक' लिहिले.

*त्रिदलं त्रिगुणाकारं त्रिनेत्रं च त्रियायुधम् ।*
*त्रिजन्मपाप संहारं एक बिल्वं शिवार्पणम् ॥*



तीन पाने हे सत्त्व-रज-तम या तीन गुणांचे प्रतीक आहे. बिल्वपर्ण भगवान शंकराचे तीन नेत्र आहेत. हेच बिल्वपान भगवान शंकराचे आयुध असलेल्या त्रिशूळासम आहे. केवळ एक जरी बेलपत्र महादेवाच्या पिंडीवर अर्पण केले तर तीन जन्माच्या पापातून मुक्ती मिळते हे बिल्वाष्टक सांगते. बिल्वदल पिंडीवर वाहताना कसे वाहावे? हा अनेकांना पडणारा प्रश्न आहे. तर, बेलाचे त्रिदल वाहताना शुद्ध सात्त्विक आणि सरळ भावाने वाहताना कोणताच फार विचार न करता जसे हातात येईल तसेच वाहावे. कारण भगवान शिव आशुतोष आहेत. आपला साधाभोळा भाव ते समजून घेतात. पण तरीही शक्य असल्यास सामान्य साधकाने बेलपत्र पिंडीवर वाहताना ते जाणीवपूर्वक उपडे म्हणजे पाठ वर राहील असे वाहावे. तांत्रिक साधक बिल्वपत्र सरळ म्हणजे बेलपानाची पाठ पिंडीवर राहील असे वाहतात. त्या भानगडीत आपण न पडलेले बरे! यात अजून प्रकार आहेत. देठ साधकाकडे आणि पर्णाग्र पिंडीकडे हा एक प्रकार ज्याला मारक उपासना आणि पर्णाग्र साधकाकडे आणि देठ पिंडीकडे ठेवून बिल्वपत्र वाहण्याचा प्रकार आहे. ज्याला तारक उपासना म्हणतात. ही फक्त माहिती म्हणून घ्या. आपण मात्र आर्त भावाने कुठलाही जादा उपचार न ठेवता आपल्याला जमेल तसे शुद्ध भावाने शरणागत होऊन बिल्वपत्र अर्पण करा, तरीही अपेक्षित फळप्राप्ती होते. साध्याभोळ्या देवाचे साधेभोळे भक्त बनून अर्चना करावी म्हणजे अवघड सोपे होते. शक्यतो प्रार्थना करून, स्वतः तोडून आणलेला बेल उच्चकोटीचा, पण ते शक्य होत नाही. अशावेळी विकत घेतलेली बेलपुडी पूजेपूर्वी ताटात काढून त्रिदल निवडून घ्यावेत. त्या ताटात थोडी अक्षत टाकली पाहिजे. बिल्वपत्र वाहताना समंत्र एकेक वाहावे.

बहुतेक जण न निवडता किंवा ताटात न काढता त्या पॉलिथिन पिशवीतच किंवा पानाच्या पुड्यात ठेवून वाहतात. वाहताना ते त्रिदल आहे किंवा नाही, हेही पाहत नाहीत म्हणून त्रिदल निवडणे महत्त्वाचे आहे. बरेच जण वाहताना हातात येतील त्या संख्येत बिल्वदल पिंडीवर वाहून मोकळे होतात. पाच-सहा वेळेतच बोचका धरत १०८ बिल्वपत्र पिंडीवर टाकून सुटकेचा निःश्वास घेतात. हे टाळले पाहिजे. बिल्वार्पण ही भाव आणि भक्तीचा उपचार आहे. जसे आपण कामाच्या ठिकाणी व्यवस्थित काम केले तरच महिन्याचा पगार व्यवस्थित मिळतो. इथे तर विश्वाचा नियंता विश्वनाथ आहे. त्याच्याकडून ईप्सित फळ पाहिजे असेल तर अर्चनही नीट व्हावे. असो.

समजा जर ताजी बेलपत्रे मिळाली नाहीत तर तीच बेलपाने ताटात काढून पुन्हा अक्षत टाकून तीच बिल्वपत्रे पिंडीवर वाहता येतात. पिंडीवरचे बिल्वपत्र तोपर्यंत निर्माल्य होत नाही जोपर्यंत ते चंडाच्या धोंड्यावर पडत नाही. अपवाद फक्त श्रावण सोमवारची बिल्वदले. निर्माल्य बिल्वपत्रांना 'चंडांश' म्हणतात. प्रत्येक शिवमंदिरात पिंडीवरील पत्रपुष्प टाकण्याची जागा असते. तिथे एक धोंडा ठेवला असतो. त्यालाच 'चंडाचा धोंडा' म्हणतात. शिवनिर्माल्याला 'चंडांश' म्हणतात. चंड नावाचा शिव गण होता. त्याचीही कथा आहे, पण विस्तारभयाने ती सांगता येणार नाही. आपल्या घरात बेलफळ म्हणजे 'श्रीफळ' नेहमी असले पाहिजे. बिल्वफळामुळे घरातील अलक्ष्मी बाहेर जाते. अवदसा आणि अवकळा बाहेर जाऊन आरोग्य, ऐश्वर्य आणि प्रसन्नता कायम निवासी राहतात. बिल्वपत्राचे अनन्यसाधारण माहात्म्य आपल्या भारतीय संस्कृतीत आहे. बेल वृक्ष हा 'हिमालयं समारभ्य यावदिंदू सरोवरम्' म्हणजे हिमालयातील श्रीनगरापासून प्रारंभ होऊन हिंदू महासागरापर्यंत म्हणजे कन्यकापरमेश्वरी कन्याकुमारीपर्यंत आढळतो. विषनाशक गुणधर्म असल्याने हलाहल प्राशन केलेल्या नीलकंठ भगवान शिवाला बिल्वपत्र अत्यंत प्रिय आहे. श्रावण महिना सुरू आहे. महादेवाच्या पिंडीवर श्रद्धेने एक बिल्वपत्र वाहून तर पाहा. या लोकात सुख-शांती-ऐश्वर्य अंती मोक्षपदास प्राप्त होऊ! भगवान शंकराला आत्यंतिक प्रिय बेलपानाचे आध्यात्मिक आणि आयुर्वेदिक महत्त्व आहे. बेलाचे एक पान तीन जन्माचे पाप नष्ट करते. 'एक बिल्वं शिवार्पणम् ।' हे आद्य शंकराचार्यांनी प्रमाणित केले आहे.

९८२२२६२७३५

### स्त्री रक्षक कृष्ण

प्रत्येक स्त्री-मनात कृष्ण वसलेला असतो. स्त्रियांना कृष्ण आवडतो. कारण कृष्ण हा स्त्री मन जाणारा आणि स्त्री रक्षण करणारा आहे. आज स्त्रियांवर अनन्वित अत्याचार होत आहेत. कुणीतरी कृष्ण रूपात धावून येईल हा तिला विश्वास आहे. परंतु हे कलियुग आहे. येथे स्वार्थी, राजकारणी, दुष्ट लोक वावरत आहेत. येथे कुणी कृष्ण नाही. कुणी कृष्ण रूपात नाही. कुणी स्त्री रक्षणार्थ धावून येणार नाही. जेव्हा जेव्हा स्त्रियांचे वस्त्रहरण होते, तेव्हा तेव्हा कृष्णाची आठवण येते. समाजात आता एक नव्हे, हजार कृष्ण संस्कारित होऊन निर्माण व्हायला हवेत. त्यांना स्त्रीमन, स्त्रीची इज्जत, स्त्री सन्मान याची जाण हवी. स्त्री रक्षणार्थ धावून जायची विजिगीषा हवी. तनमनातून धावून जायची कर्तव्याची ऊर्मी हवी. द्रौपदीचे रक्षण करणारा, सोळा हजार स्त्रियांना नरकासुराच्या कारावासातून सोडवणारा कृष्ण आवडता आदर्श आहे. नुसती सुटका नाही केली तर त्या महिलांना आपलं पालकत्व दिलं. कृष्ण त्यांचा पालक असल्यामुळे त्यांच्याकडे बोट दाखवायची कुणाची हिंमत झाली नाही आणि म्हणूनच आजही हीच श्रद्धा मानसिकता आहे की कृष्ण हवा. आता कलियुगात कृष्णाला माखनचोर, गोपींच्या सवे रासक्रीडा करणारा, राधेवर प्रेम करणारा हा असाच कृष्ण दाखवला. असाच कृष्ण बिंबवला, परंतु आज समाजमनात स्त्रीसंरक्षक कृष्ण प्रतिमा बिंबवणे आवश्यक आहे. प्रत्येक युवकाच्या मनात स्त्रीरक्षक कृष्णाचा आदर्श ठेवायला पाहिजे. कवी पुष्पमित्र उपाध्याय यांच्या कवितेची आठवण आली.

*सुनो द्रौपदी ! शस्त्र उठालो अब गोविंद ना आएंगे...*
*छोड़ो मेहंदी खड्ग संभालो खुद ही अपना चीर बचा लो*
*द्यूत बिछाए बैठे शकुनि मस्तक सब बिक जाएंगे...*
*सुनो द्रौपदी ! शस्त्र उठालो अब गोविंद ना आएंगे...*

आज बघ्यांचा जमाना आहे. म्हणून हे स्त्रीये चक्रधारी कृष्णासारखी तू हातात शस्त्र घे. तू अबला नाही सबला बन. इथे सारे कौरव, दुर्योधन, दुःशासन वावरत आहे. हा जमाना मदत मागण्याचा, कृष्ण रूपात एकही पुरुष धावून येणार नाही. तुलाच तुझी अब्रू सांभाळायची आहे. तुझा जीव तुला वाचवायचा आहे. तू आता हातात शस्त्र घे. तुला स्वतःला झाशीची राणी व्हायचे आहे. तुला हातात शस्त्र घेऊन स्वतःला आणि आपल्या इतर माता-भगिनींना सुरक्षित करायचे आहे. महिलांनो, तुम्हीच कृष्ण व्हा. स्वतःचे आणि आपल्या महिला भगिनींचे रक्षण करा.

**मीना खोंड**/७७९९५६४२१२

## वाचक पत्रे

### गांधीसागरचे सौंदर्यीकरण

गांधीसागरच्या सौंदर्यीकरणाचे काम मागील ३-४ वर्षापासून रखडत चालले आहे. टिळक पुतळा ते तिकडे विदर्भ प्रीमिअरच्या मुख्यालयापासून तर भाऊजी पागे उद्यानाच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत टिनाचे कठडे लावून ठेवले आहे. पागे उद्यानाच्या भागाने टाटा पारशी शाळा, शिशुविहार व तीन सहकारी बँका आहेत. शाळा सुटतेवेळी ऑटोचालक मुलांना घ्यायला येतात तेव्हा तेथे फार गर्दी होते. वाहनचालक व पादचाऱ्यांना गर्दीतून वाट काढता पुरेवाट होते. त्यामुळे ना पालिका प्रशासन, ना शाळा प्रशासन ना पोलिस प्रशासन लक्ष देत. काही दिवसांनी विधानसभा आचारसंहिता लागली की पुन्हा काम रखडेल. सत्तापरिवर्तन झाले तर अजूनच संथ वाहते कृष्णामाई होईल. आताच कामाला गती मिळावी.

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### कॅन्डल मार्चने न्याय मिळेल?

कोलकाता येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने प्रत्येकाचे काळीज हळहळले. अशा घटना देशभरात सर्वत्र जवळजवळ रोजच्याच घडत आहेत. त्यामुळे मुली घराबाहेर गेल्यावर त्या घरी येईपर्यंत पालकांचा जीव टांगणीला लागला असतो. मानवतेला काळिमा लावणारे प्रसंग ओढवतात. कारण माणसातला राक्षस जागा होतो. आज माणसाने भौतिक प्रगती तर केली, पण नैतिकता गमावली आहे. कुणाला कायद्याची भीती राहिली नाही. केवळ शाळा-महाविद्यालयांमध्ये नैतिक मूल्यांचा तास घेऊन किंवा कॅन्डल मार्च काढून या घटना थांबणार आहेत का? असे असते तर आजपर्यंत बरेच कॅन्डल मार्च निघाले, तरीही त्याच दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती होत आहे. कोलकाताच्या घटनेच्या निषेधार्थ देशभरात कॅन्डल मार्च सुरू होते तेव्हाच बदलापूरला दोन अबोध बालिकांवर अत्याचार झाले. अन्य एका ठिकाणी एका शाळेतील लहान वर्गातील अल्पवयीन मुलीवर त्याच शाळेतील दहावीत शिकणाऱ्या चार मुलांनी अती प्रसंग केला. या सगळ्यातून एकच लक्षात येते की, केवळ लहानपणापासून 'गुड टच - बॅड टच' शिकवून चालणार नाही, तर साधनेने आपले आध्यात्मिक बळ वाढवण्याचे शिक्षण मुलींना द्यायला हवे. निर्भयाचा धाक मुलींवर लादण्यापेक्षा स्वतःचे रक्षण करता येण्यासाठी शिक्षण द्यायला हवे. तसेच मुलांमधील वासना जागृत करणारे, त्याचे धडे देणारे सोशल मीडियावरील सगळ्या अनैतिक गोष्टींच्या प्रसारावर सरकारने बंदी घालायला हवी. ते बंद होईपर्यंत सर्वांनी वैधानिक मार्गाने संघटित प्रयत्न करत राहायला हवे. केवळ सोशल मीडियाच्या माध्यमातून आपला आक्रोश व्यक्त करून किंवा कॅन्डल मार्च काढून चालणार नाही. अशा घटनांमध्ये अपराध्याला कठोर शिक्षा व्हायला हवी, यासाठी सरकारने कडक कायदे करायला हवे. तसेच कायद्याची अंमलबजावणी तत्परतेने व्हायला हवी तरच असे निर्घृण कृत्य करण्यास कुणी धजावणार नाही.

**प्रांजली विजय ब्रह्मे**/नागपूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महापालिकेने लाड कमिटी अंतर्गत दिली ३५ जणांना नियुक्ती

## ● महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी काढले आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

सोलापूर महापालिका प्रशासनाने महापालिकेतील कर्मचाऱ्यांच्या वारसदारांकडून आलेल्या अर्जांमधून लाड कमिटी अंतर्गत ३५ जणांना नियुक्तीचे आदेश महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी मंगळवारी दिले.

यामुळे त्या नियुक्त कर्मचाऱ्यांकडून आनंद व्यक्त करण्यात आला. महापालिकेकडून यापूर्वी देखील अशा प्रलंबित ७९ नियुक्त्या देण्यात आल्या. त्यांना सातवा वेतन आयोगानुसार वेतन तसेच अधिक इतर मान्य भत्ते दिनांक २८ ऑगस्ट २०२४ पासून पुढील दोन वर्षाच्या परिविक्षा कालावधीसाठी अटी व शर्तीच्या अनुसरून देण्यात येणार आहे. यामध्ये नियुक्त्या देण्यात आलेल्या वारसा हक्क कर्मचाऱ्यांना घनकचरा व्यवस्थापन विभागात झाडूवाली, झाडूवाला, बिगारी तसेच मंडई विभागात बिगारी म्हणून नियुक्त यांचा समावेश आहे.

महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार आणि उपायुक्त आशिष लोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक लक्ष्मीनारायण दोंतुल यांच्या माध्यमातून या विभागाने या नियुक्तीसाठीची प्रक्रिया राबवली. बुधवार दि. २८ ऑगस्ट २०२४ पासून दोन वर्षाच्या परीविक्षा कालावधी करिता अटी व शर्तीस अधीन राहून महापालिकेतील संबंधित कार्यालयाकडे या कर्मचाऱ्यांना नियुक्त करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे.

आज एकूण ३५ वारसांना हे नियुक्ती आदेश देण्यात आले आहे. यामध्ये झाडूवाला - २३, झाडूवाली- ४, बिगारी - ८, यांचा समावेश आहे.


## महाळुंग श्रीपूर नगरपंचायत

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ता. माळशिरस, जि. सोलापूर
स्थापना - ०९/०३/२०२१
E-mail-comcmahalung@gmail.com

जा.क्र.४६/२०२४ दि. २६/०८/२०२४

### आरोग्य विभाग

जाहीर प्रकटन

स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महाळुंग श्रीपूर शहराला ODF+ मानांकन प्राप्त झालेले असून महाळुंग श्रीपूर नगरपंचायत स्वच्छ भारत अभियान २.० मध्ये ODF+ Recertificaton ला आणि GFC वन स्टार साठी अर्ज सादर करत आहे. या अंतर्गत GFC वन स्टार, ODF+ मानांकन करिता दिलेल्या निकषानुसार GFC वन स्टार, ODF+ बाबत महाळुंग श्रीपूर नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्रमांक १ ते १७ वॉर्डमध्ये मा. शासनाने दिलेल्या सूचना, निकष व घोषणापत्रानुसार सर्व निकष पूर्ण केलेले आहे. तसेच शासन आदेशानुसार व शासनाकडील मार्गदर्शक सूचनेनुसार महाळुंग श्रीपूर शहर GFC वन स्टार ODF+ मानांकनासाठी पात्र आहे. त्यामुळे महाळुंग श्रीपूर नगरपंचायत मार्फत महाळुंग श्रीपूर शहर GFC वन स्टार, ODF+ म्हणून घोषित करणेबाबत नगरपंचायताने शासनाकडे प्रस्ताव सादर करणेबाबत मंजुरी दिलेली आहे. त्याबाबत आपल्या काही हरकती व सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात ७ दिवसात कार्यालयीन वेळेत महाळुंग श्रीपूर नगरपंचायत कार्यालयात जमा करावी. दिलेल्या विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचना यावर विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
मुख्याधिकारी
महाळुंग श्रीपूर नगरपंचायत



## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २९९/२०२४

१) **आयानोद्दीन कैमुद्दीन काझी,**
रा. कुंभार गल्ली, पांगरी, ता. बार्शी, सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील रियाज द. बागवान) — अर्जदार

- विरुद्ध -

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर — गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, स्वतः अर्जदार, रा. कुंभार गल्ली, पांगरी, ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे पांगरी ग्रामीण रुग्णालय पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी दिनांक ०९ जुलै २००६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक ०९ जुलै २००६ रोजी मौजे पांगरी ग्रामीण रुग्णालय, पांगरी, ता. बार्शी, जि. सोलापूर या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. २६२/२०२४

१) **संगीता मधुकर आवटे,**
रा. अंबिकानगर, वैराग, ता. बार्शी, सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील दत्तात्रय स. मुंढे) — अर्जदार

- विरुद्ध -

२) **जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
नगरपंचायत, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर — गैरअर्जदार

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराची मुलगी, निकीता मधुकर आवटे, रा. अंबिकानगर, वैराग, ता. बार्शी जि. सोलापूर यांचा मौजे वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक २८ मे २००० रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराची मुलगी निकीता मधुकर आवटे यांचा दिनांक २८ मे २००० रोजी मौजे वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. १२ ऑगस्ट २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः वैराग, ता. बार्शी येथील व आसपासचे लोकांना जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन- डि. व सब डि. सोलापूर ता. बार्शी पैकी मौजे वैराग हद्दीतील बिनशेती गट नं. ३९१/१ प्लॉट नं. ३४ पैकी उत्तरेकडील बाजूचा प्लॉट यांचे क्षेत्रफळ ०.९८.६९ हे.आर. चौ.मी. आकार ९ रु. ८३ पैसे असून याचा नगरपंचायत मिळकत नं. २२१२/११३ असा आहे. यांसी चतुःसिमा- पूर्वेस- प्लॉट नं. २३ ची जागा, पश्चिमेस- समाईक रस्ता, दक्षिणेस- प्लॉट नं. ३४ पैकी सुजित पोकळे यांची जागा, उत्तरेस- प्लॉट नं. ३३ ची जागा याची वागणूक व पाणी पश्चिमेस. येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक मिळकत आतील तदंगभूत वस्तूसह व वहिवाटीच्या हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली घरजागा ही संजय विक्रम जाधव यांचे स्वतंत्र खरेदी मालकी व कब्जे वहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जे वहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची घरजागा त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर घरजागा मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर घरजागा मिळकतीबाबत खरेदी घेणेबाबत लेखी करारपत्र झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर घरजागा मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा घरजागा मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमूद घरजागेवर कोणाचा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास सदर घरजागेसंदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर घरजागेवर कोणाचा बोजा, हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्त्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर घरजागा निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली असे.

ही जाहीर नोटीस दिली. तारीख : २३/०८/२०२४

सही/-
**श्री. लक्ष्मीकांत सिद्धेश्वर झाडे, ॲडव्होकेट,**
२२०९/३८, सिद्धेश्वर निवास, गणेश नगर, माढा रोड, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट मो.नं. ९८५०६६७४९६



महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

## उपविभागीय अधिकारी, सोलापूर क्र.२ सोलापूर यांचे कार्यालय

### भूसंपादन संकलन

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दूरध्वनी.: (०२१७) २३२०३८५ Email ID: sdosolapur2@gmail.com
पत्ता जुने जिल्हाधिकारी कार्यालय, पहिला मजला सिध्देश्यर पेठ, सोलापूर ४१३ ००१

जा.क्र.२०२४/उविअसोक्र. २/भूसंपादन/कावि/५५२/एस आर/२/२०२४ दिनाक २०/०८/२०२४

### खरेदीपूर्व जाहीर नोटीस

प्रस्तुत नोटीसीव्दारे सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना कळविण्यात येते की, जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर यांचे मार्फत मौजे दुधनी, ता. अक्कलकोट, जिल्हा सोलापूर येथील रुपांतरीत साठवण तलावाच्या दुधनी ग्रा.क्र.४ निर्मितीसाठी भुसंपादन प्रस्ताव खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दत्तीने प्राप्त झालेल्या प्रस्तावात भुसंपादन करणेबाबत आवश्यक जमिन शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय क्र.संकीर्ण/०३/२०१५ प्र.क्र.३४/अ/२ दिनांक १२/०५/२०१५ क्र. संकीर्ण/३/प्र.क्र.३४/अ/२ दिनांक ३०/०९/२०१५ व परिपत्रक एल.क्यू.एन ०१/२०१७/प्र.क्र./१२/अ/२ दिनांक २५/०१/२०१७ मध्ये विषद केलेल्या कार्यपध्दत्तीनुसार खाजगी जमीनी सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेकामी प्रस्तावीत केले आहे. सदर जमीनीचा तपशील सोबतच्या अनुसूचीमध्ये संबंधीत जमीन मालकांचे नांव गट नंबर खरेदीसाठी प्रस्तावीत केलेले क्षेत्र इतर सह नमूद केला आहे.

सदर जमीनीमध्ये हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपत्र, वारस हक्क, गहाणखत, दानपत्र, बोजा, बाकी, लिज, कर्ज, बक्षीसपत्र, जप्ती, करारपत्र, व इतर हक्क असल्यास त्याबाबत सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत पुराव्यांसह लेखी हरकत सूचना या कार्यालयाकडे सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.०० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत) समक्ष अथवा रजिष्टर पोस्टाने सादर करावी. दिलेल्या मुदतीत कोणताही तक्रार/सूचना प्राप्त न झाल्यास सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी

असल्याचे समजण्यात येवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. तसेच दिलेल्या मुदतीनंतर हरकत प्राप्त झाल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही.

### अनुसूची

**संपादन संस्थेचे नाव** : जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सोलापूर
**संपादनाचे प्रयोजन** : मौजे दुधनी ग्रा.क्र.४. ता. अक्कलकोटजिल्हा सोलापूर येथील रुपांतरीत साठवण तलावाच्या निर्मितीसाठी भुसंपादन प्रस्ताव खाजगी वाटाघाटीद्वारे भूसंपादन करणेबाबत

| अ. क्र. | भूधारकाचे नाव | गट नंबर/ सि.स.न | ग्रुप नंबर/ प्रकार | खरेदी करावयाचे क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|
| मौजे दुधनी, ता. अक्कलकोट, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | | | | |
| १ | चनम्मा गुरुबसप्पा पाटील, मल्लिनाथ गुरुबसप्पा पाटील, विजयालक्ष्मी गुरुबसप्पा पाटील, निर्मलाबाई गुरुबसप्पा पाटील, नागेश गुरुबसप्पा पाटील, सरकार व इतर | १८७ | जिरायत | ३.२७ |
| २ | तुषारसिंग तेजसिंग राठोड | १८८ | जिरायत | ०.६० |
| ३ | चनम्मा गुरुबसप्पा पाटील, मल्ल्निाथ गुरुबसप्पा पाटील, विजयालक्ष्मी गुरुबसप्पा पाटील, निर्मलाबाई गुरुबसप्पा पाटील, नागेश गुरुबसप्पा पाटील, सरकार व इतर | १९०/१ | जिरायत | ६.९० |
| ४ | नबी मोहोद्दीन शेख | १९०/२ | जिरायत | ०.११ |
| | | | एकूण | १०.८८ |

शिक्का

सही/-
(विठ्ठल उदमले)
उपविभागीय अधिकारी
सोलापूर क्र. २, सोलापूर

जिमाका/सो/जाहि/११४/२०२४-२५



## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः नागोबाचीवाडी व बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन- डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे नागोबाचीवाडी येथील शेतजमीन याचा तपशील- गट नंबर २५०/१/ब याचे एकूण क्षेत्रफळ हे. ०२-०० आर आहे अशी मिळकत.

सदर शेतजमीन ही १) सौ. विद्या भगवान माने आणि २) श्रावणी भगवान माने ३) सायली भगवान माने यांच्या मालकीची असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस आहे. सदरची शेतजमीन ते विक्री करु इच्छितात. शेतजमीन विक्री निघालेबाबत आमचे अशिलास समजलेने आमच्या अशिलाने योग्य ती किंमत देऊ केलेने १) सौ. विद्या भगवान माने आणि २) श्रावणी भगवान माने ३) सायली भगवान माने यांनी सदरची शेतजमीन विक्री करणेबाबतचा करार आमच्या अशिलाशी केला. त्या व्यवहारापोटी आमच्या अशिलाकडून साक्षीदारासमक्ष इसार रक्कम स्वीकारली आहे व खरेदीखत करुन देण्याचा व्यवहार आमच्या अशील बरोबर ठरविला आहे.

सदर मिळकतीवर कोणाचेही कसलेही हक्क, हितसंबंध, लीज, दान, गहाण, टाच, बोजा, अशा प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ (सात) दिवसांचे आत आमचे वकिलांना खाली दिलेल्या पत्त्यावरती प्रत्यक्ष भेटून कागदोपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबित करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील कोणाची कसलीही हरकत नाही असे गृहीत धरुन मिळकत बिनबोजाची, क्लिअर टायटल आहे असे गृहीत धरुन सदर मिळकत खरेदी करतील. खरेदीनंतर कोणाची कसलेही हरकत आलेस आमचे अशिलाच्या हक्कावर व अधिकारावर ती बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये याकरिता खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली. दिनांक : २७/०८/२०२४

सही/-
**ॲड. कुलदीप संजय क्षीरसागर,,**
**ॲड. अमरदीप राजीव क्षीरसागर,**
**ॲड. हेमंत भारत रामगुडे**
ऑफिस पत्ता : ३९४५/१, भवानी पेठ, सोलापूर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
(अशिलातर्फे ॲडव्होकेटस्)



## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आझादी का अमृत महोत्सव

आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, 2002 अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि कलम 13 च्या उप-कलम (12) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करत आहेत. सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 ने **09/01/2024** रोजी **डिमांड नोटिस** जारी केल्या आहेत ज्यात खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस देण्यात आली आहे की अधोस्वाक्षरीने उपकलम (4) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे. **22/08/2024** रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह अधिनियमाचे कलम 13 वाचले

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार येथे नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- अशोक चौक** <br> **कर्जदार:- 1.श्री.सुनंदा श्रीनिवास धारा.** <br> **2. श्री.उमेश श्रीनिवास धारा.** <br> **3.श्री.महेश श्रीनिवास धारा.** <br> सर्व आर/ओ, टी.पी. क्र. 1, सिटी सर्व्हे नं. 10389, फायनल प्लॉट नं. 35, सब प्लॉट-288/अ, घर क्र.1131, नवीन पाच पेठी, कॉलेजजवळ जुने सोलापूर-413005 <br> **हमीदार :-** <br> **1.श्री.श्रीनिवास व्यंकटप्पा धारा.** <br> सर्व आर/ओ, टी.पी. क्र. 1, सिटी सर्व्हे नं. 10389, फायनल प्लॉट नं. 35, सब प्लॉट-288/अ, घर क्र.1131, नवीन पाच पेठी, कॉलेजजवळ जुने सोलापूर-413005 | T.P.No.1 CTS No.10389 a.final Plot No.35, Sub Plot-288/ संपूर्णपणे मोजणारे क्षेत्रफळ 105.8 sq.mtr जे मौजा येथे आहे ते सर्व तुकडे आणि पार्सल:नवीन पाचा पेठ ता.उत्तर सोलापूर जि. सोलापूर <br> खालीलप्रमाणे सीमा:- <br> पूर्व :- फायनल प्लॉट क्र.35 सब प्लॉट क्र.288/बी <br> पश्चिम :- रस्ता, उत्तर: रस्ता <br> दक्षिण: अंतिम भूखंड क्र. 35 उप प्लॉट क्र. 288/बी मधील दक्षिण बाजूची जमीन, सर्व इमारत संरचना आणि बांधकाम त्यासोबत जोडलेले आहे. | **डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी** <br> **मागणी सूचना:** <br> दि. 09/01/2024 <br> रु.17,99,422.00/- अधिक लागू न केलेले व्याज 09.01.2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत <br> **सांकेतीक ताबा तारीख:** <br> 22/08/2024 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २७/०८/२०२४

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



## उपविभागीय अधिकारी सोलापूर क्रमांक १, सोलापूर यांचे कार्यालय

पत्ता- सिध्देश्वर पेठ, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, सोलापूर

### संकलन-भूसंपादन

दूरध्वनी क्रमांक- ०२१७२७३१००९ Email ID - ssolapur1.rfsol-mh@gov.in

जा.क्र.२०२४/उविअक्र.१/भूसंपादन/एस.आर. ०४/२०२४/कावि-११८२ सोलापूर दिनांक २०/०८/२०२४

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

सोलापूर जिल्ह्यातील तमाम लोकांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डीव्हिजन व सब डीव्हीजन कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, सोलापूर यांचेकडे मौजे पानगाव, तालुका बार्शी, जिल्हा- सोलापूर येथील जमीनी पिंपळगाव (ढाळे) मध्यम प्रकल्प ता. बार्शी प्रकल्पाच्या मौजे पानगाव येथील मुख्य कालव्याच्या कामासाठी या सार्वजनिक प्रयोजनार्थ महाराष्ट्र शासन महसुल व वन विभागांकडील निर्णय क्र. संकिर्ण /०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक १२/०५/२०१५ व शासन परिपत्रक क्र. एलक्यूएन-०१/२०१७/प्र.क्र. १२/अ-२ दिनांक २५/०१/२०१७ अन्वये खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी घेणेबाबत विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार सार्वजनिक प्रयोजनासाठी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी पध्दतीने घेणे प्रस्तावित आहे.

खालील अनुसूचीमध्ये संबंधित जमिन मालकाचे नांव, गट नंबर व संपादित क्षेत्र इ. तपशील दिला आहे. सदर जमिनीबाबत जमिन मालकाच्या हिस्स्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपुत्र, वारसा हक्क, गहाण, दान, बोजा व आकी, जिल, कर्ज, बक्षिस पत्र, जप्ती करारमदार इतर हक्क असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसाच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार या कार्यालयास कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते ५.३० वा. पर्यंत) समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.

वरील मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेद व निजोखमी असल्याचे समजुन इकडील कार्यालय मा. राज्यपाल, महाराष्ट्र शासन यांचे वतीने जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली समितीने मंजुर केलेल्या दरानुसार मुदतीनंतर केव्हाही उपअधिक्षक भुमी अभिलेख, तालुका बार्शी यांचेकडुन प्राप्त झालेल्या संयुक्त मोजणी नकाशे व प्रत्यक्ष मोजमापानुसार येणाऱ्या क्षेत्राचा खरेदी व्यवहार पुर्ण करेल. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आल्यास ती या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. हि खरेदीपुर्व नोटिस दिली.

### परिशिट-अ

| अ. क्र. | भूधारकाचे नाव | गावाचे नाव | तालुका | गट क्र. | भुधारणा पध्दती | गाव नमुना नं. ७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र हे.आर. | खरेदी करावयाचे क्षेत्र हे. आर. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | श्रीधर नारायण केसकर व इतर | पानगाव | बार्शी | ११३२ पै. | जिरायत वर्ग | २०.२८ | १.२२ |

स्थळ - सोलापूर
दिनांक - २०/०८/२०२४

शिक्का

सही/-
(सदाशिव पडदुणे)
उपविभागीय अधिकारी सोलापूर
क्रमांक १, सोलापूर

जिमाका/सो/जाहि/१०८/२०२४-२५



## वैराग नगरपंचायत, वैराग

### जाहीर प्रकटन

जा.नं.१८३१/२०२४ दिनांक २७/०८/२०२४
फा.नं. नामांतरण २७८८/२०२४ प्रकरण

सर्व नागरिकांना कळविणेत येते की, श्री. संगीत रामचंद्र कसबे, सि.स.नं. २८६, गट नं. - प्लॉट नं. - न.प. मिळकत नं. १८४७ चे वर नामांतर करिता अर्ज दाखल केला आहे. त्यची चतुःसिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्व - रस्ता, पश्चिम - खुली जागा, दक्षिण - रस्ता, उत्तर - भिवा खिलारे

वरीलप्रमाणे नामांतरणाबाबत ज्या कोणास जो काही आक्षेप असेल तो (१५) दिवसाचे आत इकडील कार्यालयास दाखल करावा नसता मुदतीनंतर कोणीतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

शिक्का

सही/-
कर निर्धारण अधिकारी
वैराग, नगरपंचायत, वैराग



## बँक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

प्रधान कार्यालय/ Head Office
लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5

आझादी का अमृत महोत्सव

आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, 2002 अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि कलम 13 च्या उप-कलम (12) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करत आहेत. सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, 2002 ने **25/05/2024** रोजी डिमांड नोटिस जारी केल्या आहेत ज्यात खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस देण्यात आली आहे की अधोस्वाक्षरीने उपकलम (4) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक ताबा** घेतला आहे. **22/08/2024** रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह अधिनियमाचे कलम 13 वाचले.

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार येथे नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- अशोक चौक** <br> **कर्जदार:- 1. श्री.श्रीनिवास रामदास दुबास.** <br> **पत्ता 1 :-** सानिया नगर, कसबे उत्तर सोलापूर येथे जुना नं.110/2 नवीन सर्व्हे नं.108/2 चा भूखंड क्रमांक A-22. <br> **पत्ता 2 :-** पोस्ट प्लॉट नं.106 एमआयडीसी अक्कलकोट रोड, सोलापूर येथे. <br> **पत्ता 3 :-** गट क्रमांक 99, ग्रामपंचायत गाव, कुंभारी, दक्षिण सोलापूर. <br> **सह-कर्जदार:-** <br> **1.श्रीमती मीरा श्रीनिवास दुबास.** <br> **पत्ता 1 :-** सानिया नगर, कसबे उत्तर सोलापूर येथे जुना नं.110/2 नवीन सर्व्हे नं.108/2 चा भूखंड क्रमांक A-22. <br> **पत्ता 2 :-** पोस्ट प्लॉट नं.106 एमआयडीसी अक्कलकोट रोड, सोलापूर येथे. <br> **पत्ता 3:-** गट क्रमांक 99, ग्रामपंचायत गाव, कुंभारी, दक्षिण सोलापूर. | जुने एस. नं. 110/2 नवीन एस. नं. 108/2 मधील भूखंड क्रमांक -22 च्या मध्यभागी भागाचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, ऑनलाइन 7/12 उताऱ्यानुसार प्लॉट क्षेत्रफळ 169.60 चौ. क्षेत्रफळ 140.35 चौ. मीटर सोलापूर महानगरपालिका शहराच्या कार्यक्षेत्रातील सोनिया नगर कसबे उत्तर सोलापूर येथे स्थित; <br> **खालीलप्रमाणे बांधलेले:** <br> पूर्व : भूखंड क्रमांक 329 ते 331; <br> पश्चिम : भूखंड क्रमांक - 22 चा उर्वरित भाग; <br> उत्तर : भूखंड क्रमांक - 22 चा उर्वरित भाग <br> दक्षिण : 20 मीटर रुंद रस्ता <br> सर्व इमारतीची रचना आणि बांधकाम सोबत जोडलेले आहे. | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी <br> **मागणी सूचना:** <br> दि. 25/05/2024 <br> रु.74,99,079.00/- अधिक लागू न केलेले व्याज 25/05/2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत <br> **सांकेतीक ताबा तारीख:** <br> 22/08/2024 |

ठिकाण - सोलापूर
दिनांक - २७/०८/२०२४

सही/-
मुख्य व्यवस्थापक आणि
प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.



## नगरपरिषद तुळजापूर

### जाहीर निविदा सूचना

जा.क्र-न.प.तु/पा.पु.वि/निविदा/२०२४/१८०७ दि.२६/०८/२०२४

याद्वारे सर्व नोंदणीकृत मान्यता प्राप्त पुरवठादारांकडून शारदीय नवरात्र महोत्सव २०२४ व चैत्री यात्रा २०२५ अंतर्गत भाविकांसाठी शुद्ध पिण्याचे जार पुरवठा व शुध्दीकरण केलेले पाणी लिटरप्रमाणे पुरवठा करणे, पाण्याचे टँकर पुरवठा करणे, पाण्याच्या टाक्या पुरवठा करणे, स्वच्छता विभागास साहित्य पुरवठा करणे व जंतुनाशक पुरवठा करणे या ५ कामाचे जाहीर प्रसिद्धीकरण करून ऑफलाईन/ऑनलाईन पद्धतीने निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुकांनी आपली निविदा ऑफलाईन/ऑनलाईन पद्धतीने पद्धतीने दि. २८/०८/२०२४ ते दि ०५/०९/२०२४ रोजी साय ५:०० वा या विहित कालावधीत सादर करावीत. व प्राप्त निविदा उघडणे दि. ०६/०९/२०२४ रोजी उघडण्यात येईल प्राप्त व पात्र निविदांचाच विचार केला जाईल. सदरील कामाबाबतीत इतर अटी व शर्ती निविदा अर्ज मागणी केल्यास उपलब्ध होईल.

**ई-मेलः- tuljapurmc@gmail.com**

सही/-
मुख्याधिकारी
नगर परिषद तुळजापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### ऋतुपर्णा-श्वेतपर्णाचा पहिल्याच फेरीत पराभव



**सेऊल :** भारतीय महिला दुहेरीत ऋतुपर्णा पांडा आणि श्वेतपर्णा पांडा या जोडीचा मंगळवारी येथे कोरिया ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या फेरीत सरळ गेममध्ये पराभव झाला. पांडा भगिनींना ३७ मिनिटे चाललेल्या या सामन्यात चायनीज तैपेईच्या हसिह पेई शेन आणि ह्यू इन जू या जोडीविरुद्ध १८-२१, ५-२१ असा पराभव पत्करावा लागला. महिला एकेरीत भारताच्या तीन खेळाडू अक्षरी कश्यप, मालविका बनसोड आणि अश्मिता चलिहा आव्हान सादर करत आहेत. अक्षराशी पहिल्या फेरीत डेन्मार्कच्या क्रिस्टोफरसनशी तर बुधवारी मालविका आणि अश्मिता यांचा सामना डेन्मार्कच्या होजमार्क जार्सफेल्ट आणि थायलंडच्या पोर्नपावी चोचुवाँगशी होईल.

# पॅरिसमध्ये भारताला विक्रमी पदकांची आशा

## पॅरालिम्पिक स्पर्धेत ८४ खेळाडूंचा सहभाग

**◆ पॅरिस, २७ ऑगस्ट**

बुधवारपासून येथे सुरू होणाऱ्या पॅरालिम्पिक खेळांसाठी भारताने ८४ खेळाडू पाठवले आहेत. त्यांच्याकडून विक्रमी पदक जिंकण्याची अपेक्षा आहे.

२०२१ मध्ये टोकियो पॅरालिम्पिकमध्ये भारताने पाच सुवर्णांसह विक्रमी १९ पदके जिंकली होती आणि एकूण क्रमवारीत २४व्या स्थानावर होते. तीन वर्षांनंतर, सुवर्णपदकांची संख्या दुहेरी अंकात नेण्याचे आणि एकूण २५ हून अधिक पदके जिंकण्याचे भारताचे लक्ष्य आहे.

भारताने आतापर्यंतची सर्वांत मोठी तुकडी पाठवल्याने सर्वाधिक पदके जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. याशिवाय भारतीय खेळाडूंनी अलीकडे चांगली कामगिरी करून अपेक्षा वाढवल्या आहेत.

PARiS 2024

गेल्या वर्षी हँगझोऊ आशियाई पॅरा गेम्समध्ये भारताने २९ सुवर्णांसह विक्रमी १११ पदके जिंकली होती. यानंतर मे महिन्यात झालेल्या जागतिक पॅरा ॲथ्लेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेत भारताने अर्धा डझन सुवर्णांसह १७ पदके जिंकली.

आशियाई क्रीडा स्पर्धेत पदक जिंकणाऱ्या अनेक खेळाडूंचा पॅरालिम्पिक संघात समावेश आहे. यामध्ये जागतिक विक्रम धारक भालाफेकपटू सुमित अंतिल आणि रायफल नेमबाज अवनी लेखरा (१० मीटर एअर रायफल स्टँडिंग एसएच १) यासारख्या अव्वल स्टार्सचा समावेश आहे. हे दोघेही टोकियोमध्ये जिंकलेल्या सुवर्णपदकाचा बचाव करण्याचा प्रयत्न करतील.

भारताच्या पॅरा-ॲथ्लेटिक्स संघाने भूतकाळात चांगली कामगिरी केली आहे आणि यावेळीही ॲथ्लेटिक्समध्ये सहभागी होणाऱ्या ३८ खेळाडूंकडून देशाला मोठ्या आशा आहेत.

इतर प्रमुख पदक दावेदारांमध्ये पॅरा तिरंदाज शीतल देवी हिचा समावेश आहे, ती तिच्या पायाने शूट करते. त्याच्याशिवाय, होकातो सेमा (शॉट पूट) आणि नारायण कोंगनापल्ले (रोअर) आणि इतर अनेक खेळाडू पदकांचे दावेदार आहेत. भारत यावेळी १२ खेळांमध्ये सहभागी होत आहे, तर टोकियो येथील ५४ सदस्यीय संघ नऊ खेळांमध्ये सहभागी झाला होता. (वृत्तसंस्था)

### सुमित, भाग्यश्री ध्वजवाहक

आशियाई पॅरा गेम्समध्ये एफ ३४ स्पर्धेत रौप्य पदक जिंकणारा सुमित अंतिल आणि शॉट पुटर भाग्यश्री जाधव पॅरालिम्पिक खेळांच्या इतिहासात प्रथमच स्टेडियमबाहेर होणाऱ्या उद्घाटन समारंभात भारताचे ध्वजवाहक असतील.

# ६ ऑक्टोबरला होणार भारत-पाकिस्तान लढत

## महिला टी-२० विश्वचषकाचे वेळापत्रक जाहीर



**◆ नवी दिल्ली, २७ ऑगस्ट**

आयसीसीने यावर्षी ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या महिला टी-२० विश्वचषक २०२४चे नवीन वेळापत्रक जारी केले आहे. टी-२० विश्वचषक यापूर्वी बांगलादेशमध्ये होणार होता पण राजकीय परिस्थितीमुळे तो यूएईला हलवावा लागला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाचा सामना दुबईत पाकिस्तानशी होणार आहे.

६ ऑक्टोबर रोजी भारतीय महिला संघ पाकिस्तानशी भिडणार आहे. भारतीय संघाचा पहिला सामना न्यूझीलंडशी होणार आहे. हा सामना दुबईत होणार आहे. याआधी भारतीय संघ २ सराव सामनेही खेळणार आहे. या स्पर्धेचे आयोजन ३ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

२०२० च्या उपविजेत्या भारत, न्यूझीलंड, पाकिस्तान आणि श्रीलंका यांच्यासह सहा वेळा विजेता ऑस्ट्रेलियाला अ गटात ठेवण्यात आले आहे, तर २०१६ च्या विजेत्या वेस्ट इंडीज, बांगलादेश आणि स्कॉटलंडसह दक्षिण आफ्रिका आणि इंग्लंडला ब गटात ठेवण्यात आले आहे.

महिला टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेत प्रत्येक संघाची चार गटांत विभागणी करण्यात आली आहे. प्रत्येक गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील. अंतिम सामना २० ऑक्टोबर रोजी दुबई येथे होणार आहे तर उपांत्य फेरी १७ आणि १८ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीसाठी राखीव दिवस निश्चित करण्यात आला आहे. जर भारताने उपांत्य फेरी गाठली, तर त्याचा समावेश उपांत्यपूर्व १ मध्ये होईल. दुबई आणि शारजाह या दोन ठिकाणी एकूण २३ सामने खेळवले जातील. (वृत्तसंस्था)

### स्पर्धेचे वेळापत्रक

| | |
|---|---|
| ३ ऑक्टोबर : | बांगलादेश विरुद्ध स्कॉटलंड, शारजा |
| ३ ऑक्टोबर : | पाकिस्तान विरुद्ध श्रीलंका, शारजा |
| ४ ऑक्टोबर : | दक्षिण आफ्रिका विरुद्ध वेस्ट इंडीज, दुबई |
| ४ ऑक्टोबर : | भारत विरुद्ध न्यूझीलंड, दुबई |
| ५ ऑक्टोबर : | बांगलादेश विरुद्ध इंग्लंड, शारजा |
| ५ ऑक्टोबर : | ऑस्ट्रेलिया विरुद्ध श्रीलंका, शारजा |
| ६ ऑक्टोबर : | भारत विरुद्ध पाकिस्तान, दुबई |
| ६ ऑक्टोबर : | वेस्ट इंडीज विरुद्ध स्कॉटलंड, दुबई |
| ७ ऑक्टोबर : | इंग्लंड विरुद्ध दक्षिण आफ्रिका, शारजा |
| ८ ऑक्टोबर : | ऑस्ट्रेलिया विरुद्ध न्यूझीलंड, शारजा |
| ९ ऑक्टोबर : | दक्षिण आफ्रिका विरुद्ध स्कॉटलंड, दुबई |
| ९ ऑक्टोबर : | भारत विरुद्ध श्रीलंका, दुबई |
| १० ऑक्टोबर : | बांगलादेश विरुद्ध वेस्ट इंडीज, शारजा |
| ११ ऑक्टोबर : | ऑस्ट्रेलिया विरुद्ध पाकिस्तान, दुबई |
| १२ ऑक्टोबर : | न्यूझीलंड विरुद्ध श्रीलंका, शारजा |
| १२ ऑक्टोबर : | बांगलादेश विरुद्ध दक्षिण आफ्रिका, दुबई |
| १३ ऑक्टोबर : | इंग्लंड विरुद्ध स्कॉटलंड, शारजा |
| १३ ऑक्टोबर : | भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया, शारजा |
| १४ ऑक्टोबर : | पाकिस्तान विरुद्ध न्यूझीलंड, दुबई |
| १५ ऑक्टोबर : | इंग्लंड विरुद्ध वेस्ट इंडीज, दुबई |
| १७ ऑक्टोबर : | उपांत्य फेरी १, दुबई |
| १८ ऑक्टोबर : | उपांत्य फेरी २, शारजा |
| २० ऑक्टोबर : | अंतिम सामना, दुबई |

# सोलापूर विद्यापीठात क्रीडा दिनानिमित्त उद्या खेळाडूंचा सन्मान

## सर्वोत्कृष्ठ क्रीडा कामगिरी केलेल्या महाविद्यालयास पुरणचंद्र पुंजाळ चषक प्रदान करणार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात क्रीडा विभागाच्या विविध स्पर्धेत यश संपादन केलेल्या खेळाडूंचा सन्मान सोहळ्याचे आयोजन केले आहे.

मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. या राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा. प्रकाश महानवर हे असणार आहेत. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. भारतीय विश्वविद्यालय संघ आयोजित वेस्ट झोन, साऊथ वेस्ट झोन, ऑल इंडिया, खेलो इंडिया व राज्यस्तरीय क्रीडा महोत्सव तसेच आंतर विद्यापीठ विविध क्रीडा स्पर्धेत विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयातील ५४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये विद्यापीठास १५ सुवर्ण,




१० रौप्य आणि ८ ब्रांझ अशी ३३ पदके यंदाच्या वर्षी विद्यापीठास प्राप्त झाली आहेत. जवळपास ८२ खेळाडूंनी यशाचा झेंडा फडकविला. या खेळाडूंचा क्रीडादिनी विद्यापीठाच्यावतीने सन्मान केला जाणार आहे. तसेच यावेळी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत सर्वोत्कृष्ठ ठरलेल्या महाविद्यालयाला पुरणचंद्र पुंजाळ फिरता चषक देऊन त्यांचाही सन्मान केला जाणार आहे. तसेच विद्यापीठाच्या विविध परीक्षांमध्ये व विविध विषयात प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार देखील या कार्यक्रमात करण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या गुणवंत पाल्यांना पारितोषिके दिली जाणार आहेत. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित राहावे, आवाहन क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांनी केले.

**या खेळाडूंचा सन्मान होणार**

**प्राविण्यप्राप्त खेळाडू :** अरुण राठोड, आकांक्षा गावडे, संतोषी देशमुख, सायली टोणपे, सुजाता बाबर, निरंज महानवर, विनीत दिनकर, हर्ष राऊत (ॲथलेटिक्स), विजय संगटे, अभिषेक चव्हाण, साहिर कादर, कुणाल तुळशे, नईम इनामदार, रोहित पोतदार, विकास राठोड, समर्थ कोळी, सौरभ चव्हाण, राकेश राठोड, अभिजित वागंधरे (खो-खो), वैष्णवी टिंगरे, शुभम क्षीरसागर(शुटींग), शुभांगी माचेर्ला, श्रीकांत कोंडारे, शंशाक मदरी, माधव गड्डम, प्रिया मुस्तारे (डायव्हिंग), शुभम जाधव (धनुर्विद्या), शिवांजली कोळेकर, आकाश सरगर, मंगेश कोळी, अनंत सौमित्र, अश्लेषा बागडे, गणेश चव्हाण (कुस्ती). **आंतरविद्यापीठ स्पर्धेतील सहभागी :** बबलू चव्हाण, प्रथमेश देशमुख, चैतन्य रुपनर (ॲथलेटिक्स), प्रतीक्षा पारसे, तनिष्का ठोकळ, श्रेया परदेशी (धनुर्विद्या), ईश्वर गड्डम, वरुण दोरनाल, गुरुराज कुरापाटी, प्रणीता खंडाल (जलतरण), कौस्तुभ तळीखेडे, दिग्विजय गोयल, हर्षल झिंजाडे, अलोक मिश्रा, विवेक रंगदळ, सोहम साठे, ऋषिकेश शिंदे, सूरज वायकुळे, निर्रजा तवर, अपेक्षा सावंत, मोनालिका कंदीकंटला, प्रतीक्षा गायकवाड, झिनत शेख, वैष्णवी दळवी, कृष्णवेणी बुट्टा, मुस्कान शेख, स्नेहल बचुटे, सीमा नरुटे (तलवारबाजी), करण ढाणे, पृथ्वीराज जाधव, रामेश्वर येलगुंडे, वैभवी माने, प्रमिला मोहिते (ज्युदो), किरण जगताप, नम्रता कुंभार, कल्याणी चव्हाण (वेटलिफ्टींग), अथर्व गुरुजी, तुषार अवताडे, अनिकेत म्हेत्रे, विवेक वाडे, महेश भानवसे, ओंकार मंडले (योगासन), सुचेता लोकरे, दीक्षा गोठणेकर, तनुजा देवकर, शिवांजली शिंदे, स्वप्नील भिंगरे, बालाजी मलगे, शिवाराज पाटील(कुस्ती)

# ह.दे. प्रशालेच्या मुली विजेत्या

## शालेय शहर क्रिकेट स्पर्धेतील कामगिरी





**सोलापूर :** शालेय क्रिकेट स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटात हरीभाई देवकरण प्रशालेने विजेतेपद पटकाविले. ह.दे. प्रशालेच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी अरिहंत स्कूलवर दहा गडी राखून दणदणीत विजय मिळविला. प्रथम फलंदाजी करताना अरिहंत स्कूलने ७० धावा केल्या. विजयी लक्ष्य हरिभाई देवकरण प्रशालेने आठ षटकात पूर्ण केले. सलीमीच्या भक्ती पवार (३८) व पुनम माशाळ (२२) या जोडीने हे लक्ष्य सहज पूर्ण केले.

या स्पर्धेचे उद्घाटन सोलापूर महानगरपालिकेचे मुख्य लेखा अधिकारी रत्नराज जवळगेकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी मनपा क्रीडा अधिकारी श्रीकांत घोलप, ह. दे.चे प्राचार्य दीपक फाटक, पर्यवेक्षक हनुमंत मोतीबने, भानुदास बनसोडे, क्रीडा शिक्षक प्रमोद चुंगे, माणिक साळसकर, प्रकाश कंपली, अक्षय गवळी आदी उपस्थित होते.

# सोलापूर जिल्हा ज्युनिअर मैदानी स्पर्धा रविवारी सोरेगावला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने रविवारी दिनांक १ सप्टेंबर रोजी एस.आर.पी.एफ कॅम्प मैदान सोरेगाव विजापूर रोड सोलापूर येथे सकाळी ९ वाजता पासून आयोजित केली आहे. या स्पर्धेत निवड झालेल्या खेळाडूंची निवड महाराष्ट्र राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी होणार आहे. ही स्पर्धा अनुक्रमे १४ वर्षे मुले व मुली (जन्म तारीख १२ नोव्हेंबर २०१० ते ११ नोव्हेंबर २०१२ दरम्यान जन्मलेले). १६ वर्षे मुले व मुली (जन्मतारीख १२ नोव्हेंबर २००८ ते ११ नोव्हेंबर २०१०), १८ वर्षे मुले व मुली (जन्म तारीख १२ नोव्हेंबर २००६ ते ११ नोव्हेंबर २००८), २० वर्षे मुले व मुली जन्म तारीख १२ नोव्हेंबर २००४ ते ११ नोव्हेंबर २००६) दरम्यान जन्मलेले असावे

तसेच रविवार २५ ऑगस्ट रोजी नेहरूनगर शासकीय मैदान येथे आयोजित २३ वर्षे मुला व मुलींची पावसामुळे स्थगीत केलेली स्पर्धाही यावेळी घेण्यात येणार आहे.

ह्या स्पर्धेत शाळा, महाविद्यालय, क्रीडा मंडळ, स्पोर्ट्स क्लब वैयक्तिक सहभागी होता येईल. ह्या स्पर्धेसाठी जन्म प्रमाणपत्र महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायत यांच्याकडून प्राप्त दाखला तसेच १० बोर्ड प्रमाणपत्रावरील जन्म तारीख ग्राह्य धरले जाईल. स्पर्धेत निवड झालेल्या खेळाडूंनी राज्य स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ॲथलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडियाचे ॲथलिट रजिस्ट्रेशन करुन यु आय डी क्रमांक प्राप्त करून घेणे अनिवार्य आहे. ज्या खेळाडूंचे यु आय डी आहे त्यांनी प्रवेशिकावर नमूद करावे. स्पर्धा प्रवेशिका शनिवार दिनांक ३१ ऑगस्टपर्यंत ९३२६०५५९४० या नंबर व्हॉट्सॲप मेसेज करावा, असे सोलापूर जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनचे सचिव राजू प्याटी यांनी कळविले आहे.

# आंतरशालेय वुशू स्पर्धेत रिया जाधव अजिंक्य


**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट**



शालेय शहर वुशू स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलींच्या गटातून इंडियन मॉडेल स्कूलच्या (सी.बी.एस.ई) रिया जाधव हिने ५६ किलो खालील वजनी गटातून अजिंक्यपद पटकाविले. या कामगिरीवर तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिला क्रीडा शिक्षक सचिन ढवाण व राजकुमार माने यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष प्रा.ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी मॅडम, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, अचला राचर्ला, व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# खो-खो चे खेळाडू घडविण्याचा ध्यास

## खेळाडू ते प्रशिक्षक : उमाकांत गायकवाड



**महाराष्ट्राच्या किशोर खो खो संघाचे सहाय्यक प्रशिक्षक आणि उत्कर्ष क्रीडा मंडळाचे प्रशिक्षक उमाकांत तिप्पण्णा गायकवाडने आपल्या कामगिरीच्या जोरावर खेळाडू ते प्रशिक्षक अशी मजल मारली आहे. येथील बुधवार पेठेतील दलित समाजातील या प्रशिक्षकाने क्रीडा व सामाजिक क्षेत्रातही भरारी घेतली आहे ती खो खो खेळामुळेच. त्याच्या वाढदिवसानिमित्त क्रीडा कामगिरीबरोबरच सामाजिक कार्याचा घेतलेला आढावा.**

**- अजितकुमार संगवे, सोलापूर.**

रावजी सखाराम हायस्कूल या शाळेत शिकत होतो. शाळेत जाताना घरापासून ते शाळेपर्यंत आम्ही सर्व मित्र धावण्याची शर्यत लावत होतो. तेव्हापासूनच खेळाची आवड निर्माण झाली हे सांगताना उमाकांत म्हणतो, ''मी सहावीत होतो. तेव्हा माझे गुरु बाळासाहेब गायकवाड हे रोज शाळेमध्ये खो-खोचा सराव घेण्याकरता येत होते. शाळेतील प्रत्येक वर्गातील धावण्याच्या शर्यतीतील प्रथम आलेल्या खेळाडूंना खो-खोच्या सरावासाठी निवड होत होती. या कामगिरीवर गायकवाड सरांनी माझी खो खोच्या सरावासाठी निवड केली. त्यांनी आम्हाला खोखोतील तंत्रशुद्ध प्रशिक्षण दिले. दोन वर्षातच आमच्या शाळेचा खो-खो संघ पुणे विभागीय स्पर्धेत विजयी झाला. त्या विजयामध्ये माझी कामगिरी अष्टपैलू होती. त्या जोरावर आम्ही सलग तीन वर्षे विभागीय स्पर्धेपर्यंत पोहोचलो.''

### ● सलग २० वर्षे रक्तदान

जीएम सामाजिक संस्थेच्या माध्यमातून उमाकांतचे सामाजिक कार्यही सुरू आहे. त्यासाठी संस्थापक बाळासाहेब वाघमारे व पप्पू गायकवाड यांचे मार्गदर्शन मिळत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त सलग २० वर्षे वर्षापासून तो रक्तदान करतो. त्यास सोलापूर महानगरपालिका सेवक सहकारी पतसंस्थेचा आदर्श सेवक पुरस्कारही मिळाला आहे. पतसंस्थेत काम करत असताना खो-खो स्पर्धेसाठी त्यास व्यवस्थापक किरण तीगलपल्ली यांचे सहकार्य लाभले.

### ● उत्कर्ष मंडळामुळे कामगिरी बहरली

उत्कर्ष क्रीडा मंडळामुळेच माझी कामगिरी बहरत गेली असे सांगताना उमाकांत म्हणाला, ''गायकवाड सरांनी आम्हाला असे सांगितले की, जो उत्कर्ष क्रीडा मंडळाच्या मैदानावर दर शनिवारी व रविवारी सरावासाठी येईल त्याला माझ्याकडून बनियन व गेम पॅन्ट देण्यात येईल. मग मी खो-खो या खेळाकडे आकर्षित झालो. उत्कर्ष क्रीडा मंडळावर सरावास गेल्यावर खो-खोतील अनेक बारकावे व तंत्रशुद्ध प्रशिक्षण आमच्या बाळासाहेब गायकवाड सरांचे गुरु (स्व.)रामचंद्र जाधव सरांनी दिले. ते प्रत्येक महिन्याला आमच्याकडून खो-खो खेळातील टेक्निक म्हणजे काय? या विषयावर लेखी पेपर घेत असे. त्यांच्याबरोबरच सुशांत हार, सत्येन जाधव, सारंग खाडीलकर, सिद्धाराम करजगीकर, (कै.)प्रमोद शिवपुजे व (कै.) मोहन पवार यांचेही मार्गदर्शन मला मिळाले. अठरा वर्षाखालील गटात असताना सुद्धा ओपन गटात खेळण्याची संधी मिळत होती. त्यामुळे माझी जिल्ह्याच्या १८वर्षाखालील संघामध्ये निवड झाली. सलग चार वर्षे अठरा वर्षाखालील गटातून आणि ३ वर्षे पुरुष गटातून माझी निवड झाली. मुंबईच्या महापौर चषक खो-खो स्पर्धेसाठीही आमच्या मंडळाचा संघ जात होता. माझे कनिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षण दयानंद कॉलेजमध्ये व वरिष्ठ महाविद्यालयाचे शिक्षण संतोष भीमराव पाटील महाविद्यालय मंद्रूप येथे झाले व बीएची पदवी मिळवली.''

### ● उत्कर्ष क्रीडा मंडळ परत सुरु केले

उमाकांत म्हणतो, ''पुरुष महिला राज्य खो-खो स्पर्धा २०१९-२० मध्ये सोलापूरला घेण्यात आली होती. बरेच वर्ष उत्कर्ष क्रीडा मंडळ बंद होता. आम्ही सर्व ज्युनिअर खेळाडू मिळून गेट-टुगेदरसाठी एकत्र आलो होतो. तेव्हा चर्चा होऊन पुन्हा उत्कर्ष क्रीडा मंडळ सुरू करण्याबाबत ठरले. असोसिएशनचे सचिव श्रीकांत ढेपे यांच्याशी संपर्क करून आम्ही मंडळ पुन्हा सुरू केले. सर्वप्रथम आम्ही सर्वांनी स्वतः खेळायचे ठरविले. अजित शिंदे, सुनील चव्हाण व मी रेल्वे मैदानावर याचा श्रीगणेशा केला व स्पर्धाही घेतली. सध्या हरिभाई देवकरण प्रशाला आणि पार्क स्टेडियमवर आमचा सराव सुरू आहे. पार्कचे मैदान मिळण्यासाठी जिल्हा असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांचे सहकार्य लाभले. उत्कर्ष क्रीडा मंडळाची नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करीत असताना आमच्या मंडळातील ज्येष्ठ (कै.) शरणप्पा तोरवी, लक्ष्मण ढेरे, शरद अकतनाळ, अशोक नागणे, (कै.) रामचंद्र जाधव, विजय तडसरे, श्रीकांत ढेपे, संजय नाईक यांनी आमच्यावर विश्वास ठेवत आम्हाला पदाधिकारी पदाची संधी दिली. मी खजिनदार पदाची व नूतन पदाधिकारी मंडळाची सर्व जबाबदारी व्यवस्थित पार पाडत आहोत. मंडळाच्या माध्यमातून अनेक मित्र जोडले गेले. मी जिल्हा खो खो पंच परीक्षा उत्तीर्ण झालो. त्यामुळे मंडळाच्या वतीने जिल्हा खो खो स्पर्धा व जिल्हा पंच परीक्षाही घेतली.''



### ● दोन ठिकाणी मंडळाचा सराव सुरू

उमाकांत म्हणाला, ''चार खेळाडूवरून आज १००च्या पुढे दोन्ही मैदानावर खेळाडूंचा सराव आम्ही घेत आहोत. अजित शिंदे, सुनील चव्हाण, आशिष अवधूर्ती हे माझ्या खांद्याला खांदा लावून रोज सकाळी व संध्याकाळी सराव घेण्यासाठी येत असतात. आज उत्कर्ष क्रीडा मंडळ हा प्रत्येक वर्षी पुरुष गटात व अठरा वर्षाखालील गटात अंतिम फेरीत खेळत आहे. यामुळे जिल्हा असोसिएशनने माझी तीन वर्षे निवड समितीवर व दोन वर्षापासून प्रशिक्षक म्हणून माझी निवड केली. असोसिएशनने मला तांत्रिक समितीचे सचिव म्हणूनही संधी दिली आहे. त्यामुळे दोन वर्षापासून असोसिएशनच्या वतीने जिल्हा खो खो पंच शिबिरही होत आहे. मंडळाचा प्रत्येक वर्षी राष्ट्रीय, विद्यापीठ व शालेय राष्ट्रीय खेळाडू घडण्याचा आलेख उंचावतच आहे. घरची जबाबदारी, नोकरी आणि खेळाडू घडवण्यासाठी पत्नीचे मिळणारे सहकार्य मोलाचे आहे.''

### ● डॉ. जाधव व ॲड. शर्मा यांनी संधी दिली

''जिल्हा हँडबॉल संघटनेने मला उत्कृष्ट प्रशिक्षक पुरस्कार देऊनही गौरविले. सिने दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या हस्ते मला हा पुरस्कार मिळाल्याचा अभिमान आहे. उत्कर्ष क्रीडा मंडळांबरोबरच सिद्धेश्वर प्रशाला, ह. दे. प्रशाला व दमाणी प्रशाला येथे खो खो खेळाडू घडवण्याचे काम करत आहे. माझा मुलगा सुजत हाही केंद्रीय विद्यालयाच्या खोखो संघात राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झाला. माझ्या सर्व कामगिरीची दखल महाराष्ट्र खो-खो असोसिएशनने घेतली. डॉ. चंद्रजीत जाधव व ॲड. गोविंद शर्मा यांनी मला महाराष्ट्राच्या किशोर संघाच्या सहाय्यक प्रशिक्षकपदी संधी दिली. त्या संधीचं सोनं झालं. महाराष्ट्र किशोर संघाने सुवर्णपदक पटकाविले. बुधवार पेठेतील दलित समाजाच्या मुलाने ही भरारी घेतली आहे ती खो खो खेळामुळेच. त्यामुळे खो-खो चे खेळाडू घडविण्याचा माझा ध्यास आहे '' असा मानस उमाकांतने व्यक्त केला.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### बालाजी नगरात किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत मारहाण; परस्परविरोधी गुन्हा

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

मजरेवाडी परिसरातील बालाजी नगरात दोन गटात किरकोळ कारणावरून शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याप्रकरणी सात जणांविरुध्द परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी अमन सादिक शेख (वय २१, रा. बालाजी नगर, मजरेवाडी, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन हारूण पटेल, तनवीर पटेल, सबिया पटेल, आतया रोशनबी शेख (सर्व. रा. बालाजी नगर मजरेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तर याप्रकरणी हारुण मेहमुद पेटल (वय ४२, रा. बालाजी नगर, मजरेवाडी) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अमन सादिक शेख, सादिक शेख, गौस शेख (रा. बालाजी नगर, नागनाथ मंदिर, मजरेवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २५ ऑगस्अ रोजी सायंकाळी हारूण पटेल यांच्या घराजवळ अमन शेख हा विवाहात दिलेल्या संसार उपयोगी सामान परत देऊन त्यांचे सासरे व पत्नी हबीबा यांना तुमचा व माझा आता काही संबंध नाही असे सांगितले. त्यावेळी हारूण पटेल व इतरांनी अमन यास शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण करून बांबू डोक्यात मारून जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कटके हे करीत आहेत. तर हारूण पटेल यांच्या फिर्यादीनुसार, २६ ऑगस्ट रोजी सायंकाळी हारूण पटेल व इतर घरातील सदस्य हे घरी असताना अमन शेख याने पटेल यांनी संसास उपयोगी सामान तीनचाकी अॅपे रिक्षात भरून परत पाठविले. रिक्षाचालक जुबेर व पटेल हे सामान उतरवित असताना अमन शेख व इतरांनी हातातील तलवारीने पटेल यांना मारण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पटेल यांची पत्नी साबिया या मध्ये आल्या असता अमनने त्यांना लाकडाने मारहाण करून जखमी केले. तसेच घरावर दगडफेक करून शिवीगाळ करत तलवारीने मारण्याचा प्रयत्न केला. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार कटके हे करीत आहेत.

### भाजी आणण्यासाठी गेल्यावर चोरट्याने मोबाईल पळवला

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

सत्तर फूट रोड येथील पिंडीपोल हॉस्पिटल जवळ भाजी आणण्यासाठी गेल्यानंतर सुरेशबाबू पद्मराज मंकणी (वय ५९, रा. वालचंद कॉलेज समोर) यांच्या खिशातील ४५ हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २६ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी मंकणी यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार धुमाळ हे करीत आहेत.

### एटीएम कार्ड काढून देतो म्हणून फसवणूक; दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

एटीएम मशिनमध्ये अडकलेले एटीएम काढून देतो म्हणत चाळीस हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन अनोळखी इसमानविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २६ ऑगस्ट रोजी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास जमखंडी फुल येथे घडली. याप्रकरणी विक्रम उत्तम कसबे (वय ४८, रा. आंबेडकर नगर, सिंचन भवन) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून दोघा इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. २६ ऑगस्ट रोजी दुपारी विक्रमम कसबे हे जमखंडी पूल येथील एसबीआय बँकेच्या एटीएम मधून रक्कम काढण्याकरिता गेले होते. त्यावेळी कसबे यांचे दोन ट्रांजेक्शन कॅन्सल झाले व त्यांच्या बहिणीचे एटीएम कार्ड हे दुसऱ्या वेळेस मशिनमध्ये अडकले. तेथे हजर असलेल्या दोन इसमांनी कसबे यांचा विश्वास संपादन करून फिर्यादींचे एटीएम काढून देतो असे सांगून त्यांच्याकडून एटीएम कार्डचा पिन टाकून ४० हजार रुपये काढून कसबे यांची फसवणूक केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक ढेरे हे करीत आहेत.






# बोरामणीच्या सरपंच पुष्पावती आवटे यांच्यावरील अविश्वास ठराव मंजूर

## ● उपसरपंचसह १६ सदस्य सरपंचांच्या विरोधात

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २७ ऑगस्ट-**

बोरामणी येथील ग्रामपंचायतीच्या सरपंच पुष्पावती आवटे यांच्यावर उपसरपंच महादेवी माळी यांच्यासह सोळा सदस्यांनी एकत्र येऊन २२ ऑगस्ट रोजी दक्षिण सोलापूरचे तहसीलदार किरण जमदाडे यांच्याकडे सरपंच आवटे ह्या विकासकामे करतांना विश्वासात घेत नसून ते मनमानी कारभार करत असल्याचे ठपका ठेवत एक विरूध्द सोळा असा अविश्वास ठराव दाखल केला होता. तो अविश्वास ठराव मंगळवारी मंजूर करण्यात आला.

येथील ग्रामपंचायत ही सतरा सदस्यांची आहे. या ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणुक ग्रामस्थांनी एकत्र येऊन तीन वर्षापूर्वी बिनविरोध केली होती. लिंगायत समाजाच्या आवटे यांना साडेतीन वर्षासाठी सरपंच पदावर बिनविरोध निवड करून त्यांना संधी दिली होती. मात्र साडेतीन वर्षांनी मराठा समाजातील अरुणा साळुंखे यांना उर्वरित कार्यकाळासाठी सरपंच पदावर संधी देण्याचा निर्णय सर्व सदस्यांसह गावातील सर्वच राजकीय पक्षाच्या प्रमुखांनी घेतला होता. मात्र आवटे यांना ठरवून दिलेला साडेतीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला नाही. म्हणून त्यांच्यावर अविश्वास ठराव दाखल करण्यात आला. उपसरपंच महादेवी माळी, अरुणा साळुंखे, वैभव हलसगी, आकाश माशाळे, स्वप्नाली पटणे, ज्योती देशमुख, मुनीरोद्दीन पठाण, सुभाष भोसले, सैपन फुलारी, भिम पवार, स्वाती रोकडे, अनुसया राठोड, सुनिता गाडेकर, महेंद्र राजगुरू, रत्नाबाई राजगुरू आणि राजकुमार राठोड यांच्यासह अन्य ग्रामपंचायत सदस्यांनी अविश्वास ठरावाच्या बाजूने मतदान केले.

सरपंच आवटे याच्यावर झालेला अविश्वास ठराव यशस्वी होण्यासाठी बाजार समितीचे माजी संचालक केदार विभुते, पंचायत समितीचे माजी सदस्य धनेश आचलारे, सोसायटीचे अध्यक्ष भारत कवडे, वजीर मुजावर, इसुलाल पटेल, शाम भोसले, बाबू खोबरे, नितीन माशाळे, रफीक मुजावर, नितीन माशाळे, विलास भोसले, गौस शेख, चन्नु मटगे, राजकुमार हलसगे, राजू पटणे, अप्पा हलसगे, नागू जाधव, दिलीप होटगे, शिवराज विभुते, नागनाथ हुक्केरी, मल्लिनाथ पटणे, पमु बिराजदार, डॉ. विष्णुपंत गावडे, बाबूराव गावडे, विश्वनाथ हेबळे, अंकुश राठोड, रतन पवार, साहेबलाल शेख, सैपन पटेल, आदम पटेल, मुस्ताक नदाफ, माणिक नन्नवरे, अस्लम शेख आदी प्रमुखांनी प्रयत्न केले. अविश्वास ठराव यशस्वी झाल्यानंतर गावात उपसरपंच माळी यांच्यासह सर्वच सदस्यांनी प्रमुख कार्यकर्त्यासह मोठा जल्लोष केला.



# कबड्डी स्पर्धेत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २७ ऑगस्ट-**

तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाने १९ वर्षी मुली संघाने कृष्णा इंटरनॅशनल स्कूल, कात्रज या संघाला एक डाव राखून पराभूत करून प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय निवड झाली तर १९ वर्षी मुले संघाने जेऊर संघाला एक डाव राखून पराभूत करून तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय पावसाळी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे यांच्या हस्ते झाले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, प्राचार्य डॉ. एल.बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, तालुका क्रीडा समन्वयक प्रा.राम काळे व तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. एल. बी. पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक, कनिष्ठ वरिष्ठ महाविद्यातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे कार्य दखल घेण्याजोगे

## ● स्वामी दर्शनानंतर एस.बी.आय.चे महाव्यवस्थापक अरविंद कुमार सिंह यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२७ ऑगस्ट-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य दखल घेण्याजोगे असल्याचे मनोगत महाराष्ट्र मंडळ भारतीय स्टेट बँकचे मुख्य महाव्यवस्थापक अरविंद कुमार सिंह यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन व नगरसेवक महेश इंगळे यांनी महाव्यवस्थापक अरविंद कुमार सिंह यांच्यासह मुख्य व्यवस्थापक दिनेश राव, उप महाव्यवस्थापक कुमार परिमल प्रेम, प्रशासकीय कार्यालय कोल्हापूरचे उप महाव्यवस्थापक पंकज कुमार बरनवाल, सोलापूरचे क्षेत्रीय व्यवस्थापक निशांत कुमार जयस्वाल, अक्कलकोट शाखेचे व्यवस्थापक विकास खडतकर, उपव्यवस्थापक धनंजय सोन्याने यांचाही श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सत्कार केला. याप्रसंगी महाव्यवस्थापक अरविंद कुमार



सिंह बोलत होते. पुढे बोलताना सिंह यांनी राज्यातील अन्य देवस्थानच्या तुलनेत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील स्वामींचे दर्शन विनामूल्य आहे हे सर्वसामान्य भाविकां करिता अत्यंत समाधानाची बाब आहे. . याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रथम महेश इंगळे, अक्कलकोटचे सनदी लेखापाल ओंकार उटगे, श्रीशैल गवंडी, विपुल जाधव, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.



# शक्ति कायद्याची त्वरित अंमलबजावणी करा

## ● शिवसेना उपनेत्या अस्मिता गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

शिवसेना पक्ष प्रमुख महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे हे मुख्यमंत्री असताना शक्ति कायदा विधान सभेत एकमताने मंजूर झाला. परंतु अजूनही या कायद्याची महाराष्ट्रात अंमलबजावणी झालेली नाही. या शक्ति कायद्याची त्वरित अंमलबजावणी करून त्वरित लागू करण्यात यावा, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी केली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पुनम गेटसमोर सह्यांची मोहीम राबविण्यात आली. महिला पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी लोकसभा क्षेत्र संघटिका शशिकला चिवडशेट्टी, मध्य विधानसभा संघटिका सुनंदा माने, शहर संघटिका जोहरा रंगरेज, युवती सेना पूजा खंदारे, रेखा आडकी उपजिल्हा संघटिका मंगल थोरात, उप शहर संघटिका जयश्री पाटील मीना सुरवसे, श्रीदेवी बगले, माजी जिल्हा परिषद सदस्य सुनिता सोनार, सरस्वती कोरे, भागीरथी गोंडी, रेखा लांडगे, काजल कांबळे, प्रियंका वाघमोडे आदी महिला पदाधिकारी उपस्थित होते

## श्री संतसेना महाराज पुण्यतिथी निमित्त उद्यापासून विविध कार्यक्रम

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

श्री संतसेना नाभिक समाजोन्नती संस्था व उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ व ३० ऑगस्ट दरम्यान संत शिरोमणी श्री. संतसेना महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती उत्सव समिती अध्यक्ष नंदकुमार दळवी यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापुरातील उत्तर कसबा, नाभिक गल्ली येथील सेना महाराज मंदिरात हा पुण्यतिथी सोहळा होणार आहे. गुरुवार दि. २९ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता संतोष धोत्रे यांच्या अभिषेकाने सोहळ्याची सुरुवात होणार आहे. सायंकाळी ५ ते ५:३० वाजता , महिला भजनी मंडळ सायंकाळी ५:३० ते ६:३० वाजता प्रवचन, रात्री ८ ते ९ हभप गणेश वारे महाराज यांचे कीर्तन होणार आहे. शुक्रवार दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता मनोहर क्षिरसागर यांचा अभिषेक होणार आहे. सकाळी १० ते १२ वाजता हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर (उळे) यांचे गुलालाचे किर्तन होणार आहे. दु. १२ वाजता महाप्रसाद वाटप होईल. सोलापूर शहर जिल्ह्यातील सर्व नाभिक भक्तांनी व समाजबांधवानी गुलालाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन उत्सव समिती अध्यक्ष नंदकुमार दळवी यांनी केले आहे. पत्रकार परिषदेस मनोहर क्षिरसागर, पांडुरंग पवार, केदार शिंदे, निखिल दळवी आदी उपस्थित होते.



# निशिगंधा बँकेस ४२.३५ लाखांचा नफा

## ● सभासदांना ९ टक्के लाभांश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ ऑगस्ट-**

येथील निशिगंधा बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन आर. बी. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. यावेळी सभासदांना ९ टक्के लाभांश जाहीर करण्यात आला. गत चौदा वर्षात निशिगंधा बँकेने सभासद व ठेवीदारांची विश्वासार्हता जपत कल्याणराव काळे यांच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारक प्रगती केली आहे.

यावेळी बँकेचे मार्गदर्शक व संचालक कल्याणराव काळे यांनी गेल्या चौदा वर्षाचा बँकेच्या प्रगतीचा आढावा सभासदांसमोर ठेवला आणि लवकरच बँकेची स्वमालकिची इमारत उभी करण्याचा मानस बोलून दाखविला, यावेळी व्हा.चेअरमन् सतिश लाड, संचालक देविदास सावंत, बी बी सावंत, डॉ. मंदार सोनवणे, भागवत चवरे, वैभव साळुंखे, महेश पटवर्धन, अनिल निकते संचालिका अॅड.क्रांती कदम, शोभा येडगे उपस्थित होते. यावेळी आदर्श सभासद म्हणून गोपाळ शिंदे, दत्तात्रय लोकरे, महेश काळे, संभाजी नाईकनवरे, अविनाश गव्हाणे, अर्जुन झांबरे, समीर बागवान श्रीमती अलका घाडगे, वैशाली बिडकर या मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

सभेच्या पुर्वी एक तास सभासदांसाठी आयोजित केलेल्या सभासद प्रशिक्षण वर्गामध्ये सहकार प्रशिक्षण केंद्र, शाखा सोलापूर यांचे प्रतिनिधी जितेंद्र चव्हाण यांनी सभासदांचे हक्क व कर्तव्ये, याबाबतची सखोल माहिती यावेळी उपस्थितांना दिली.

सभेच्या सुरूवातीस श्री. विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन जेष्ठ सभासद श्रीमती मुक्ताबाई पिसे, नितीन ताड व इतर मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. सरव्यवस्थापक कैलास शिर्के यांनी विषयपत्रिकेवरील विषयांचे वाचन केले, त्यास सभासदांनी आवाजी मतदानाने मंजूरी दिली. यावेळी अहवाल सालातील दिवंगत सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

सभेस सहकार शिरोमणी साखर कारखान्याचे व्हा.चेअरमन् भारत कोळेकर, डॉ.राजेंद्र जाधव, डॉ.सुधीर शिनगारे, उत्तमराव जमदाडे (गुरूजी), संजय काळे (सर), सुधाकर कवडे, अतुल म्हमाणे, रमेश कुलकर्णी, नितीन देवकर, महेश सावंत, धनंजय कुलकर्णी, बाळासाहेब काळे (गुरूजी), निलेश शेंडगे, सतीश कटकोंड, रामचंद्र जाधव, कृतांजली सावंत, संजीवनी शिरसाठ, आदि बहुसंख्येने उपस्थित होते. आभार व्हा.चेअरमन सतिश लाड यांनी मानले.




### ▸ सन २३-२४ मधील बँकेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा

निशिगंधा सहकारी बँकेच्या सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील कामकाजाचा आढावा घेताना कल्याणराव काळे म्हणाले कि, मार्च २०२४ अखेर बँकेचे ४ हजार ८३६ सभासद असून बँकेकडे रू. ३६.५० कोटींच्या ठेवी असून, रू.१९.९७ कोटींचे कर्जवाटप केलेले आहे तर रू.१५.८८ कोटींची गुंतवणूक केली आहे. चालू अर्थिक वर्षात बँकेस रू.४२.३५ लाख रूपयांचा नफा झालेला आहे.

### ▸ आणासाहेब पाटील महामंडळाच्या योजनेतून बँकेकडून कर्जपुरवठा

लवकरच बँकेचे एटीएम सुरू होत असून आणासाहेब पाटील महामंडळाच्या योजनेतून बँकेने १५० तरूण उद्योजकांना रू.१२ कोटींचा कर्ज पुरवठा केलेला असून या योजनेतून लाभार्थ्यांना रू.१.२५ कोटी चा व्याज परतावा मिळालेला आहे. या योजनेचा तरूणांनी जास्तीत जास्त फायदा घ्यावा तसेच अल्प व्याजदरात सोनेतारण, सी टी एस चेकबुक, आरटीजीएस, एनएफईटी, ई-पेमेट, तसेच शाखा भाळवणी येथे सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय इ. सेवा बँक देत आहे त्याचा लाभ सर्व सभासदांनी घ्यावा.

## पुरस्कारासाठी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करा

**सोलापूर दि.२७ ऑगस्ट-**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत ग्रंथालय संचालनालयाकडून राज्यातील शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचा गुणात्मक विकास व्हावा या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार तसेच, ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते व सेवक यांना भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांच्या नावाने डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व सेवक पुरस्कार देण्यात येतो. यासाठी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन प्र. ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी केले आहे.

सन २०२३-२४ या वर्षीच्या पुरस्कारासाठी इच्छुक असणारी ग्रंथालये, कार्यकर्ते व सेवक यांनी आपले विहित नमुन्यातील अर्ज आवश्यक त्या कागदपत्रांसह २६ ऑगस्ट ते २५ सप्टेंबरपर्यंत तीन प्रतीत जिल्ह्यातील जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालयांकडे पाठवावे. राज्यातील शहरी व ग्रामीण विभागातील अ, ब, क, ड वर्गातील उत्कृष्ट शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अनुक्रमे रुपये १ लाख, ७५ हजार, ५० हजार, २५ हजार तसेच राज्य उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी ५० हजार आणि प्रत्येकी एक उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता व ग्रंथालय सेवक यांना प्रत्येकी रुपये २५ हजार सन्मान चिन्ह, प्रमाणपत्र, ग्रंथ भेट देऊन गौरवण्यात येईल.

# नास्ति मातृ समंत्राण

**माता के समान कोई रक्षक नहीं. परस्त्री मातेसमान मानण्याचा संस्कार देणारी आपली भारत भूमी आणि डॉक्टरला देवाचे दुसरे रूप मानणारे आपण, काय झालं आहे आपल्या समाजाला? एका लेडी डॉक्टरला जी सेवाव्रती आहे. जिने ३६ तास काम केले होते, थकून जी कर्म स्थळी झोपी गेली, झोप कधी लागते? सुरक्षित ठिकाणी विश्वासाच्या लोकांमध्ये आणि इथेच होतो विश्वासघात. एका विदुशीचा का? कशासाठी? कोणी केला? पुरुष नावाच्या एका असुराने ज्याच्या साथीला अजून असुर आले, दुर्देव आपल्या भूमीचे ज्या भारत भूमी ने भगतसिंग, सुखदेव, राजगुरु असे सुपुत्र जन्माला घातले आणि अजरामर झाले.**




'नारी प्रीत मै राधा बने
गृहस्ती मै बने जानकी
काली बने शिश काटे
जाब बात हो साम्मानकी'
स्त्री शक्ती को शत शत प्रणाम
हे सखी नवतरुणी
'तुम हुई शारदा विष्णू प्रिया
अब बनो भवानी भी है मानी
मान तभी बच पायेंगे
सुनो द्रौंपदी शस्त्र उठालो
अब गोविंद ना आयेंगे'
जननी जन्म भूमिस्च
स्वर्गादपि गरीयसी.

आपले प्राण देऊन, नमन त्या वीरांना. कुठे ते देशप्रेमी -कुठे आपला संस्कारी देश आणि आताच्या समाजातील हा पुरुष वर्ग कुठे -संस्कार विहीन ज्या राज्यातील हे असुरी प्रवृत्तीचे लोक आहेत त्याच राज्यात माँ कालीची भक्ती करणारा मोठ्ठा वर्ग आहे. दुर्गा मातेच्या आराधनेचा संस्कार आहे, तरीही असुर प्रवृत्ती डोके वर काढतेच आहे, बाब काळजीत टाकणारी आहे. ज्या मातेचे विटंबन केले जाते, त्या मातेने नऊ महिने गर्भातच सुरक्षा देणे टाळले, तर कुठून येईल पुरुषार्थ पिढी म्हणून माता भगिनींचा आदर करावाच लागेल नविन पिढीसाठी संस्कृतीचा वारसा जपला पाहिजे. भारतीय संस्कृती वंदनीय आहे तिचा आपल्याला अभिमान असायला हवा आणि ती कृतीतून झळकावी, असे आपले वर्तन हवे, 'संस्कृती म्हणजे प्रकृतीत विकार होऊ नये म्हणून त्यावर करायचा संस्कार 'भारतीय संस्कृती फारच जुनी आहे आपल्या संस्कृती चा पाया वेदांवर आधारित आहे, वेद म्हणजे प्राचीन साहित्य मानले जाते, वेदांची निर्मीती अनेक ऋषींनी केली. वेदांमधील काही सुक्त हे स्त्रियांनीही रचलेले आहेत, वैदिक साहित्य हे ऋग्वेदात काव्यरुपात आहे. एकूण वेद चार वेदाच्या ग्रंथाना संहिता असे म्हणतात. वेदांना श्रुती असेही म्हणतात. भारतीय संस्कृतीशी बांधलेले नास्तिक व निधर्मी जवळ जवळ ४० लाखांच्यावर आहेत. आपल्या धर्माचा आधार यम नियम आहे यम म्हणजे -तीन त्रिकाळ न बदलणारे, सत्य, प्रेम, अहिंसा, दया, परोपकार, ब्रह्मचर्य, नियम म्हणजे गंध लावणे ,जानवे घालणे आणि याच संस्कृतीने आपल्याला मात्रेयी गार्गी सीता द्रोपदी यांचे संस्कार आणि मां जिजाउ यांचा वारसा दिला, किती दाखले देऊ लेखणी अपुरी पडेल, सावित्रीने शिक्षणाची कवाडे उघडून दिली. राजमाता अहिल्या देवीनी भक्ती आणि श्रद्धेचा वसा दिला, त्या माझी भारतीय रक्तामध्ये हे अत्याचाराचे मूळ आले कुठून त्याचा समूळ नायनाट करायचा असेल तर बलात्काराच्या गुन्ह्याला लिंग कापणे हीच शिक्षा योग्य आहे तरच गुन्हेगार भयभीत होतील आणि शासनाने PORN SITESवर बंदी घालावी, मुलींना ग्रामीण पातळी पासुन सुरक्षा प्रदान करावी, शालेय क्रीडामध्ये कराटे आणि स्वसंरक्षणाचे शिक्षण बंधनकारक करावे. महिन्यातून एक स्त्री रोग तज्ञ भेट आयोजित करावी.

**- डॉ. सौ. दिपांजली सुनील पाटील (माने)**
**M.Sc., M.Ed., M.Phil., Ph.D**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## क्राईम वृत्त

### चारित्र्याच्या संशयावरून विवाहितेचा छळ करणाऱ्या तिघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

चारित्र्याच्या संशयावरून तसेच पतीचे दुसरे लग्न लावून देण्याची धमकी देत विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह तिघांविरुध्द जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अक्षता अविनाश भोसले (वय २२, रा. चमडा कारखान्याजवळ, हनुमान नगर, भवानी पेठ, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अविनाश भोसले, सासरे गोपाळ भोसले, दीर विकास भोसले (रा. महाळुंग, ता. माळशिरस) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ एप्रिल २०१९ ते २ एप्रिल २०२४ या कालावधीत अक्षता या पती अविनाश भोसले यांच्यासोबत सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती अविनाश हे दारू पिऊन येऊन अक्षतावर संशय घेऊन शिवीगाळ करून तिला मारहाण करीत. तसेच सासरे गोपाळ व दीर विकास या दोघांनी आमच्या मुलाचे दुसरे लग्न लावून देतो असे म्हणून शिवीगाळ करून बेदम मारहाण केली. तसेच अक्षताच्या आई वडीलांनी लग्नात आमचा मानपान केला नाही, लग्नात किंमती वस्तु दिल्या नाहीत, तुझ्या बायकोचे बाहेर लफडे आहे असे अविनाश यास सांगून अक्षताला घरातून हाकलून देऊन तिचा शारीरीक व मानसिक छळ केला. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पैकेकरी तपास करीत आहेत.



### पाच लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या सहाजणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

पाच लाख रुपयांसाठी विवाहितेचा छळ करणाऱ्या पतीसह सहाजणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत पायल सचिन पाटेकर (वय २२, रा. संत गुलाबबाबा नगर, मजरेवाडी, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती सचिन भानुदास पाटेकर, सासू छाया भानुदास पाटेकर, सासरे भानुदास बंडू पाटेकर, दीर राहुल भानुदास पाटेकर, जाऊ सोनाली राहुल पाटेकर (सर्व रा. देशमुख वस्ती, आमराई, सोलापूर), आत्या मंगल (रा. आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ९ डिसेंबर २०२२ ते ४ ऑक्टोबर २०२३ या कालावधीत पायल या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व दीराने बांधकाम करण्यासाठी पायल हिने आईकडून ५ लाख रुपये आणावेत त्याशिवाय तिला नांदविणार नाही असे म्हणून तिचा छळ केला. तसेच पायलविषयी पती सचिन यास खोटे नाटे सांगून ते ऐकूण सचिन पायल हिच्याशी भांडण करीत होता. तसेच तु जीन्स का घालतेस, साडी का घालत नाही, स्वयंपाक केल्यावर चांगला येत नाही असे म्हणून सारखे पायलला हिनवून तिला माहेरी हाकलून दिले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

### आरटीओ ऑफीसच्या कंपौंडमध्ये तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

पैशाच्या कारणावरून आरटीओ ऑफीसच्या कंम्पौडमध्ये तरूणास मारहाण करण्यात आली. मिथुन नामदेव पवार (वय ३४, रा. मुळेगाव तांडा, दक्षिण सोलापूर) असे जखमीचे नाव असून त्याच्यावर शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. २७ ऑगस्ट रोजी सकाळी साडेआकराच्या सुमारास आरटीओ ऑफीसच्या कंम्पौडमध्ये पैशाच्या कारणावरून किरण राजा चव्हाण व इतर ६ जणांनी मिळून मिथुन पवार यास दगड, लाथाबुक्क्याने मारहाण केली. यामध्ये मिथुन याच्या नाकातून रक्त येऊन चेहऱ्यावर मुक्का मार लागला आहे. त्यामुळे मिथुन यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




# सिंधुदुर्गातील शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामात १०० टक्के भ्रष्टाचार

## ● जगविख्यात शिल्पकार भगवान रामपुरेंनी यांनी ओढले ताशेरे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

सिंधुदुर्गातील राजकोट किल्ल्यावर पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते अवघ्या आठ महिन्यांपूर्वी लोकार्पण करण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा २८ फुटांचा ब्राँझ पुतळा सोमवारी कोसळून पडला होता. हे वृत्त वाऱ्यासारखे पसरल्यानंतर राज्यभरात एकच गहजब उडाला होता. या दुर्घटनेसाठी राज्य सरकार, केंद्र सरकार आणि नौदल यापैकी नेमके कोण जबाबदार आहे, यावरुन आरोप-प्रत्यारोप सुरु झाले होते. तर पोलिसांनी हा पुतळा उभारणारा शिल्पकार जयदीप आपटे आणि स्ट्रक्टचर इंजिनिअर चेतन पाटील यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला होता. या पार्श्वभूमीवर जगविख्यात शिल्पकार भगवान रामपुरे यांनी परखड शब्दांत आपली मतं मांडत सिंधुदुर्गात शिवाजी महाराजांचा पुतळा उभारताना नेमकी काय चूक झाली, याबाबत एका वृत्तवाहिनीवर भाष्य केले.



भगवान रामपुरे यांनी म्हटले की, सिंधुदुर्गात छत्रपती शिवरायांचा पुतळा अशाप्रकारे कोसळणे, ही एक कलावंत म्हणून माझ्यासाठी अत्यंत शरमेची आणि मान खाली घालायला लावणारी घटना आहे. जेव्हा पुतळ्याची उंची १५ फुटांपेक्षा जास्त असते तेव्हा शिल्पकारासोबत इंजिनिअरिंगचे काम जास्त महत्वाचे असते. पुतळ्यातील स्टीलचे रॉड उत्तम दर्जाचे असावेत. पुतळ्याची उंची जितकी जास्त तितका पाय भक्कम असावा लागतो. १०८ फुटी शंकराचार्यांचा पुतळा करताना आम्ही कंपनीसोबत काम केले. या पुतळ्यासाठी ८० फूट खोल पाया खणला होता. उंच पुतळा करताना जमिनीचा सर्व्हे केला जातो. जमिनीत मुरूम किती, खडक किती याचा विचार होतो. भूकंप झाला तर पुतळ्यावर त्याचा परिणाम होऊ नये, याचा विचार केला जातो. भुगर्भमध्ये खडक किती, पाणी किती, हे सर्टिफाय केल्यावरच काम केले जाते. आम्हाला शंकरचार्यांचा पुतळा करताना पाया ५०० वर्ष काही होणार नाही याची गॅरेंटी मागितली होती. तज्ञांनी ७०० वर्ष काही होणार नाही हे सर्टिफिकेट दिल्यानंतरच काम सुरु करण्यात आल्याचे भगवान रामपुरे यांनी सांगितले. २००३ साली मी सोलापुरात झाशीच्या राणीचा पुतळा केला. दोन पायावर असलेला हा पुतळा असून ही इतके वर्ष टिकून आहे. नंतर बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळाही केला. मात्र बिल देताना पालिकेत अनेक टेबलवर कमिशन मागण्यात आली. या घटनेतही तेच असण्याची शक्यता आहे, शंभर टक्के यात भ्रष्टाचार झाला असेल. या घटनेला शासनही तितकंच जबाबदार आहे, असे भगवान रामपुरे यांनी म्हटले.

**● सर्वात कमी रक्कमेची निविदा भरणाऱ्यालाच सरकारी काम दिलं जातं**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सिंधुदुर्गातील दुर्घटनेबाबत प्रतिक्रिया देताना, वाऱ्याचा जास्त असलेला वेग शिवरायांचा पुतळा कोसळण्यास कारणीभूत ठरला, असे वक्तव्य केले होते. याबाबत भगवान रामपुरे यांनी म्हटले की, जर ४५ किलोमीटर वेगाने जर वारे वाहत असतील तर त्याचा विचार आधीच व्हायला हवा होता. चूक केवळ शिल्पकारची नाही, शासकीय कामात निविदा मागवतात, जी रक्कम सर्वात कमी त्याला काम देतात. कामाचा दर्जा न पाहता केवळ रक्कम कमी किती हे पाहिलं जातं, म्हणून मी महापालिकेचे काम करायचे नाहीच हे ठरवले आहे.

**● सरकारला नेहमी कमी वेळेत पुतळा उभारायची घाई असते...**

भगवान रामपुरे यांनी सिंधुदुर्गाती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्यासाठी अनुभवी कलाकाराची निवड करणे गरजेचे होते, असे म्हटले. चार-पाच महिन्यात पुतळा करा, आमचे साहेब येणार आहेत उद्घाटनाला, निवडणूक आहे त्याची जाहिरात करता येईल, असं म्हटले जाते. कुठलंही शासन असलं तरी हे होतच. उद्घाटनाची वेळ आधी ठरलेली असते आणि त्या वेळेत काम करण्यासाठी घाई होते. चांगले कलावंत हे कमी पैशात उपलब्ध होत नाही, त्यासाठी वेळ देणे हे तितकेच महत्वाचे असल्याचे मत भगवान रामपुरे यांनी व्यक्त केले.



**सोलापुर : बुधवार पेठ येथील वाल्मिकी मेहतर समाज मागासवर्गीय सेवा मंडळाच्यावतीने श्री कपिल लाल बेगी यांच्या नेतृत्वाखाली समाजाचे आराध्य दैवत श्री. जहार वीर गोगा काठी मिरवणूक काढण्यात आली. यावेळेस मोठा जनसमुदाय उपस्थित होता.**

# गणेशोत्सव परवान्यासाठी 'एक खिडकी' योजना

## ● पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

गणेशोत्सवाला आता ७ सप्टेंबरपासून सुरवात होत असून गणेशोत्सव मंडळांना उत्सवाचा परवाना ऑनलाइन मिळणार आहे. त्यासाठी प्रत्येक पोलिस ठाण्यात एक खिडकी योजना राबविणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी दिली.



शहरातील प्रत्येक पोलिस ठाण्यांमधून ऑनलाईन पध्दतीने परवाने दिले जाणार आहेत. त्यासाठी मंडळाच्या अध्यक्षांसह प्रमुख पदाधिकाऱ्यांना शहरातील त्या त्या पोलिस ठाण्यात जावे लागणार आहे. मंडळाचे पदाधिकारी नेमके कोण, याची माहिती संबंधित पोलिस ठाण्यातील प्रभारी अधिकाऱ्यांना व्हावी हा त्यामागचा हेतू आहे. त्यानंतर पोलिस ठाण्यातील कर्मचाऱ्यांकडून ऑनलाईन पध्दतीने माहिती भरून परवाने वितरित केले जाणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार राज्यातील गणेशोत्सव मंडळांना एक खिडकी योजनेतून ऑनलाइन परवाना दिला जाणार असून पोलिस आयुक्तालयात गुरुवार २९ ऑगस्ट रोजी शांतता कमिटीची बैठक होणार आहे.



**● पारंपारीक वाद्याला पसंती द्यावी...**

पारंपरिक वाद्याला पसंती देऊन मंडळांनी डीजेमुक्त मिरवणुका काढाव्यात, मंडळांनी सार्वजनिक रस्त्याला अडथळा होणार नाही असा मंडप टाकावा, लाईट कनेक्शन अधिकृत असावे, अग्निशामक विभागाच्या सूचनांचे पालन करावे, गणपतीमुर्तीसमोर स्वयंसेवक नेमाव, सामाजिक उपक्रम राबवावेत, यासाठी पोलिस आयुक्त एम. राज कुमार यांनी सर्वांना आवाहन केले आहे.

**● दिवसरात्र पोलिसांची गस्त...**

शहरातील हजारो नागरिक दररोज पहाटे मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडतात. यावेळी पोलिसांची गुड मॉर्निंग पथकाद्वारे गस्त सुरु असते. या पथकाकडून मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांच्या सुरक्षिततेसाठीही प्रयत्न करण्यात येणार आहे. या पथकामध्ये एक साध्या वेशातील व एक गणवेशातील पोलिस गस्त करणार आहे. याशिवाय रात्री दहा ते पहाटेपर्यंत देखील 'क्युआर कोड' लावलेल्या जवळपास २०० ठिकाणी पोलिस गस्त करतात. या रात्रगस्तीवेळी ज्याठिकाणी काही आक्षेपार्ह दिसेल त्यांची चौकशी तसेच काही ठिकाणी विनाकारण रात्री उशिरापर्यंत तरुण किंवा अन्य लोक थांबलेले असल्यास त्यांची माहिती घेतली जाईल, असे पोलिस आयुक्तांनी सांगितले.



# कॅम्पस ड्राईव्हमधून 'बीगसी'च्या २२ विद्यार्थ्यांची निवड

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट**

केगाव येथील भारतरत्न इंदिरा गांधी अभियांत्रिकी महाविद्यालयात टेस्ट यंत्रा सॉफ्टवेअर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून कॅम्पस ड्राईव्हमधून २२ विद्यार्थ्यांची निवड झाली. या ड्राइव्हमध्ये २०२५ च्या बॅच मधून ही निवड बिर्ला सॉफ्ट ३ इंटिग्रो रीप्रो सिस्टीम या कंपन्यांमध्ये ३.५ ते ९.५ लाख या पॅकेजवर निवड झाली. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रवींद्र डी. गायकवाड, सचिवा अनामिका रवींद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या निवड प्रक्रियेवेळी कंपनीचे आणि टेस्ट यंत्रा सॉफ्टवेअर सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉक्टर सचिन देठे उपस्थित होते.

# भुसार अडत व्यापाऱ्यांचा राजव्यापी बंद मागे

**सोलापूर दि. २७ ऑगस्ट-**

सोलापूर बाजार समितीमधील अडते आणि व्यापारी संघटनांनी संप मागे घेतल्याची घोषणा केली, त्यानुसार सर्व शेतमालाचे व्यवहार सुरळीतपणे पार पडतील, असे भुसार अडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी यांनी सांगितले. व्यापारी महासंघाच्या वतीने विविध मागण्यांसाठी राज्यस्तरावर संप पुकारण्यात आला होता.

सोमवारी सकाळी मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर व्यापारी महासंघाच्या कृती समितीने संपमागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हा निर्णय झाल्याचे त्यांनी सांगितले. बाजार समितीत सर्व व्यापारी संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक झाली. यावेळी बाजार समितीचे माजी संचालक केदारनाथ उंबरजे, फळ बाजार विभाग असोसिएशनचे अध्यक्ष फय्याज बागवान, एन. एम. खलिफा, रियाज बागवान, रेवणसिद्ध आवजे आदी उपस्थित होते.









### महिलेच्या विनयभंगप्रकरणी तरूणावर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

बाथरूममध्ये घुसून महिलेचा विनयभंग करणाऱ्या तरूणाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत महिला ही मंगळवारी सकाळी तिच्या घरासमोरील बाथरूममध्ये अंघोळ करीत असताना यातील आरोपी तरूणाने जबरदस्तीने बाथरूममध्ये घुसून त्या महिलेचा विनयभंग केला. यावेळी त्या तरूणाने पिडीतेचे तोंड दाबून तिला ठार मारण्याची धमकी देत तिचा विनयभंग केला. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला पोलिस उपनिरीक्षक जेऊघाले पुढील तपास करीत आहेत.

# शिवा म्हणजे 'सेवासदन'चे वैभव

**मुलींनो आपल्या शाळेतील अत्यंत लोकप्रिय सेवक शिवा कांबळे यांचे २८ जुलै २०२४ निधन झाले. शिवा म्हणजे सेवासदनचे वैभव.**

आम्ही आठ तास काम केले पण शिवा शांता यानी २४ तास शाळेसाठी काम केले होते. बारा वर्षापासून शिवा शाळेमध्ये कार्यरत होता. नानासाहेब पाठकानी त्याला शाळेत लावले. अठरा वर्षाचा होईपर्यंत शिवा नानासाहेबांचा उजवा हात होता. त्यांच्याकडून तो खूप काही शिकला. अक्षरशत्रू असलेला हा माणूस सर्व कामांमध्ये मात्र इतका हुशार होता. आलेला प्रत्येक माणूस पहिल्यांदा शिवाजी यांची चौकशी करायचा. ऑफिस व्यवस्थित ठेवणं असो, शाळेची स्वच्छता. नाटकाचे नेपथ्य विज्ञान प्रयोग शाळेत विज्ञान उपकरण तयार करताना त्याची होणारी मदत खूप छान असायची. तिथे त्याची हुशारी दिसत असे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विलक्षण तळमळ होती सेवासदनवर त्याचे नितांत प्रेम होते. मुलींच्या शाळेत राहूनही कधीही मुलींच्या कुणाच्याही बाबतीमध्ये लहानपण तरुणपण मध्यम वय हे सर्व काला कालखंड त्याचे सेवासदन मध्ये गेले. पण तो नेहमी सर्वांसाठी बाप माणूस राहिला. मुली कुठे पाठवायच्या असतील तर शिवाबरोबर बिनधास्त पाठवाव्यात. मी शिक्षिका म्हणून शिवाबरोबर मुंबई,जम्मू काश्मीर अनेक सहली केलेल्या आहेत. त्याचे वर्तन इतके सुंदर अत्यंत चरित्रवान माणूस असेच वर्णन करावे मुलींसाठी खूप धडपड जम्मूला प्रदर्शनामध्ये तो माझ्याबरोबर होता. पण त्या ठिकाणी तो संपूर्ण भारताचा झाला होता. कारण संपूर्ण भारतीय तेथे होते आणि प्रत्येक जण शिवा कहा है, शिवा कहा है, अशीच चौकशी करत होते. मी म्हणलं, शिवा तू आमच्याबरोबर आलाय का सगळ्या भारताबरोबर आला हेच मला कळत नाही. सगळ्यांसाठी शिवा राबत होता तिथे लखनऊच्या प्रदर्शनात तरी प्राची लंगोटे बरोबर तो मी तयार केलेले उपकरण घेऊन गेला होता. मी काही कारणामुळे जाऊ शकले नाही पण शिवानी अत्यंत धिटाईने राष्ट्रपती झैल सिंगजी यांचे समोर जाऊन 'हम बहुत दूर से आये है, आप कम से कम जीप से उतर कर हमारा उपकरण तो देखिये आप ऐसेही जीप मे घुमते रहोगे तो बच्चे नाराज हो जायेंगे' आणि खरोखर झैलसिंगजीनी जीपमधून उतरून प्रदर्शन पाहिले ते आपल्या उपकरणाजवळ आले. प्राची लंगोटे चे कौतुक केले. सर्वांनी शिवाला खूप धन्यवाद दिले. खूप धाडसी आणि हुशार मुलगा होता. एसएससी बोर्डाचे अधिकारी असोत, नाट्य आराधनांचा काही काम असो, त्यांचे नेपथ्य असो, सिद्धप्पा पाटलाचा मांडव घालणे असो, कुणाचे भोजन असो. सगळ्यांच्या मदतीला शिवा धावून जाणार. शिवा आणि शांता हे सेवासदनचे वैभव होते. ते चतुर्थ श्रेणी कर्मचारी होते म्हणून कुठे कमी नव्हते. सेवासदनचा इतिहास भूगोल शिवा इतका कुणालाच माहीत नाही. तडवळकर सरांच्या आधी नानासाहेबांबरोबर तो कार्यरत होता.त्यामुळे बांधकाम असो, शिक्षण खात्यात जाऊन सह्या आणणे असो, बँकेत असो सर्वच मंडळी शिवाला ओळखत होती आणि शिवा त्यांचे कामी येत होता. त्यामुळे तेही प्रेमाने शिवाचे काम करीत असत. असं शाळेवर प्रेम करणारा माझ्यासाठी तरी तो भावासारखाच होता. शिवा आज आमच्यात नाही, हे दु:ख आहे. शेवटच्या कालावधीमध्ये त्याला खूप त्रास झाला. त्या त्रासातून त्याची सुटका झाली. इतकेच त्याच्या मृत्यूमुळे त्याची पत्नी सत्यभामा ही मात्र आता एकाकी झाली आहे. तिच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. देव त्याच्या आत्म्याला शांती देवो, हे वाक्य लिहिताना सुद्धा मला खूप वाईट वाटते. माझ्या नोकरीतली ३३ वर्ष मी त्याच्याबरोबर काढली परमेश्वरीचे पुढे इलाज नाही हेच खरे ओम शांती.



**- शीला पत्की, माजी मुख्याध्यापिका सेवासदन कन्या प्रशाला**

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

९ | बुधवार, २८ ऑगस्ट २०२४ https://epaper.dainiktarunbharat.com सोलापूर तरुण भारत

# सिंधुदुर्ग घटना; सरकारच्या कामावर ओढले ताशेरे

## सोलापुरात श्री शिवजन्मोत्सव महामंडळाकडून निषेध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

सिंधुदुर्ग येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा कोसळल्यांनतर या घटनेचे पडसाद राज्यात उमटत आहेत. त्याच पार्श्वभूमीवर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या घटनेचा जोरदार निषेध नोंदवला. अश्वारूढ शिवछत्रपतींच्या पुतळ्यासमोर विविध घोषणा देत आणि निदर्शने करत भ्रष्ट सरकारच्या भ्रष्ट कारभारावर ताशेरे ओढले. यावेळी मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकाऱ्यांनी काळी फीत लावून हातामध्ये काळा बॅनर घेऊन जोरदार निदर्शने केली.

महायुती सरकारच्या भ्रष्ट कारभारावर शिवप्रेमी नाराज आहेत. सरकारने आमच्या दैवताचा संपूर्ण महाराष्ट्राच्या आराध्य दैवत याचा अपमान विटंबना केली आहे. जे कोणी या घटनेस जबाबदार असतील त्यांच्यावर कडक शासन झाले पाहिजे. अन्यथा महाराष्ट्र पेटून उठेल आता तीव्र प्रतिक्रिया यावेळी माऊली पवार यांनी व्यक्त केली.




त्याचप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारताना कोणतेही स्ट्रक्चरल ऑडिट त्याचप्रमाणे बेसमेंट यांचे योग्य नियोजन आणि कामकाज केले नाही त्यामुळे सदरची वाईट घटना घडली आहे.

सरकारने याकडे गांभीर्याने पहावे. अन्यथा सरकारला याची किंमत चुकवावी लागेल, असा गंभीर इशारा माजी नगरसेवक विनोद भोसले यांनी यावेळी दिला. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज मुस्लिम ब्रिगेडने देखील या आंदोलनात सहभाग नोंदवत या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला.

याप्रसंगी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष मतीन बागवान यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना सरकारच्या या निंदनीय कामकाजावर विरोध करत घटनेचा निषेध नोंदवला. जे काम मुघल साम्राज्याने केले नाही ते काम हे सरकार करत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची विटंबना होत आहे. मात्र, सरकार वादळाचे सोंग घेत आहे. असे निष्क्रिय सरकार काही कामाचे नाही. यामुळे जनता आता त्रस्त झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान महाराष्ट्र खपवून घेणार नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया संभाजी आरमारचे श्रीकांत डांगे यांनी यावेळी व्यक्त केली. याप्रसंगी श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ज्येष्ठ पदाधिकारी पद्माकर काळे, राजन जाधव, पुरुषोत्तम बरडे, माऊली पवार, श्रीकांत डांगे, विनोद भोसले, गणेश डोंगरे, रवी मोहिते, नितीन बागवान, फैज बागवान, आयाज बागवान, शिवाजी वाघमोडे, सोमनाथ राऊत, निरंजन बोधुल, प्रसाद पवार आदींसह श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे पदाधिकारी आणि शिवप्रेमी उपस्थित होते.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८७०

**भोगीं त्याग जाला संगीच असंग ।**
**तोडियले लाग माग दोन्ही ।।**

मानवी देह म्हटला की कांही प्रमाणात का होईना पण विषयभोग आणि असंगाचे संग हे येणारच. या देहात राहूनही देहापासून वेगळे राहणे अत्यंत अवघड काम आहे. हे अवघड काम फारच मोजक्या लोकांना जमते. पाण्यात राहून पाण्यापेक्षा वेगळे राहणे म्हटल्याप्रमाणे देहात राहून देहापेक्षा वेगळे राहणे होय. देह म्हटला की इंद्रियांच्या इच्छा, विषयाच्या वासना ह्या थोड्याफार प्रमाणात का होईना निर्माण होतच असतात. इंद्रियांना विषय भोगाची इच्छा निर्माण होणे ही कांही प्रमाणात नैसर्गिकता व जास्त प्रमाणात मानसिकता आहे. देह म्हटले की इंद्रियांच्या विषयभोगाची इच्छा येते. या इच्छेप्रमाणे ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, द्वेष, स्वार्थ, काम, क्रोध या असंगाचा संगही येतो. विषयाच्या भोगाची इच्छा आणि असंगाचा संग या दोघांना पूर्णत: तोडून वागणे अत्यंत अवघड असले तरी ते आवश्यक आहे.



हे अवघड पण आवश्यक कार्य करण्यात आपण सद्गुरु कृपेने यशस्वी झालो आहोत. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**भोगीं त्याग जाला संगीचा असंग ।**
**तोडियले लाग माय दोन्ही ।।**

नीती-नियमाला अनुसरून विषयाचा भोग घेण्यास शास्त्रानेही मान्यता दिली आहे. पण जेव्हा विषयाचा भोग नीतीनियमबाह्य होतो, तेव्हा तो पूर्णत: बाधक ठरतो. विषयभोगाच्या त्यागाची अवस्था प्राप्त होणे अवघड असते. तरीही प्रयत्नाअंती ही अवस्था अनेकांना साध्य झाली आहे. आपल्या देहामध्ये मी ला जोपर्यंत स्थान आहे, तोपर्यंत विषयभोगातून त्याचबरोबर असंगास पात्र असणाऱ्या ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, स्वार्थ, काम, क्रोध आदिमधून मुक्त होणे अवघड असते. हा अवघडपणा नष्ट करण्याचा मूळ मार्ग म्हणजे मी पासून सुटका करून घेणे हा होय. नाशवंत देहाला मी म्हणण्यामुळे इंद्रिय नियंत्रणाकडे आपोआप दुर्लक्ष होते. इंद्रिय नियंत्रणाकडे दुर्लक्ष झाल्याने इंद्रिय मुक्तपणे विषयाच्या मागे लागतात. इंद्रियाची प्रबलता माणसाला त्यांचे लळे पुरवण्यास भाग पाडते. एकदा का इंद्रियांच्या लळा पूर्तीचा माणूस प्रयत्न करू लागला की मग अनेकांना हेच कार्य करीत राहणे क्रमप्राप्त ठरते. फार मोठा झटका बसेपर्यंत किंवा अत्यंत महान सद्गुरुचा संग लाभून परिवर्तनाची वेळ येईपर्यंत इंद्रियलळा पुरविण्याची कार्यवाही चालूच राहते. त्यामुळे आपण झटका बसून स्वत:च्या नजरेतून उतरण्याची वेळ येण्याची किंवा महान सद्गुरुच्या सहवासाची वाट न पाहता ज्ञानोबा-तुकारामांच्या मार्गदर्शनातूनच विषयभोग व असंगाच्या संगातून मुक्त होणेच योग्य होईल असे आम्हास वाटते.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार**
**दि. २८ ऑगस्ट २०२४**
**विक्रम संवत् २०८०,**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - श्रावण**
**कृ. दशमी (२५.१९)**
**ऋतु - शरद**
**नक्षत्र- मृग (१५.५२)**
**योग - वज्र (१९.१०)**
**करण - वणिज (१३.२२)**
**सुर्योदय - ०६.२५**
**सूर्यास्त - १८.५४**

**दिनविशेष - श्रीकृष्ण सरस्वती महाराज पुण्यतिथी कोल्हापूर**
**मंगलागौरी पूजन**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३ ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष** : कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ** : आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन** : सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क** : व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह** : प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील. कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या** : उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ** : आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक** : कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु** : सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर** : दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ** : व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन** : श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.

# राष्ट्रवादीने फोडली महायुती सरकारच्या काळ्या कारनाम्याची दहीहंडी

## विविध घोषणा देत काळे कारनाम्याचे पत्रक आणि काळे फुगे वाटले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट -**

सोलापूर शहर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने मंगळवारी सात रस्ता चौकामध्ये राज्यातील महायुती सरकारचे काळे कारनामे भांडाफोड करण्यासाठी दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सात रस्ता चौकात पक्षाच्या कार्यकर्त्यांनी महायुती सरकारच्या काळे कारनाम्यांच्या विरोधात रोष व्यक्त करण्यासाठी दहीहंडी फोडून निषेध नोंदवला. विविध घोषणा देत परिसर दणाणून सोडला होता.

राज्यातील महायुती सरकारचे काळे कारनाम्याचे पत्रक आणि काळे फुगे वाटण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष सुधीर खरटमल, मनोहर सपाटे, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद गायकवाड, यू एन बेरीया, जनार्दन कारमपुरी, प्रशांत बाबर, सर्फराज शेख, चंद्रकांत पवार, मिलिंद गोरे, अजित बनसोडे, सनी म्हेत्रे, शक्ती कटकदौंड, अक्षय जाधव, महिला अध्यक्षा सुनिता रोटे, रेखा सपाटे, वंदना भिसे, सिया मुलाणी, कविता कोडवाल, गौरा कोरे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### भ्रष्टाचारी युतीच्या सोबत राहू नये

राज्यात महायुती सरकार आल्यापासून भ्रष्टाचार, बेरोजगार, महागाई वाढली असून हे सर्व जनतेसमोर आणण्यासाठी पक्षाच्या वतीने महायुतीचे काळे कारनामे हे पेपर छापले आहेत ते जनतेला आम्ही देत आहोत, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत अशा भ्रष्टाचारी युतीच्या सोबत राहू नये, असे आवाहन केले आहे.

**- प्रमोद गायकवाड,**
**प्रदेश उपाध्यक्ष शरद पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी**

### काळे कारनामे उघड

राज्य शासनाने जनतेच्या तोंडाला फसव्या योजनेतून पाने पुसले आहेत. भ्रष्ट सरकारची कारनामे उघड करण्यासाठी दहीहांडी फोडली आहे. यापुढील काळात आणखीन तीव्र आंदोलन करून सरकारच्या काळ्या करणाम्यांचा निषेध करत राहू.

**- प्रशांत बाबर,**
**राष्ट्रवादी शरद पवार गट युवक प्रदेश उपाध्यक्ष**

## अनुकूल परिस्थितीतही धर्म आराधना करा : साध्वी प्राचीश्रीजी

**सोलापूर, दि.२७ ऑगस्ट -**




अनुकूल परिस्थिती अथवा सुखात असला की माणसाला धर्म आराधनेची आठवण होत नाही. अनुकूल परिस्थितीत सुख भोगण्यात तो इतका व्यस्त असतो की त्याला देवाची वा कोणाचीही आठवण होत नाही. अनुकूल परिस्थितीतही धर्म आराधना करा, असे प्रतिपादन प्रवचन प्रभाविका साध्वी प्राचीश्रीजी यांनी केले.

आज आपल्याला जे ऐश्वर्य मिळालेले आहे ती आपली पूर्व पुण्याई होत. म्हणून मिळालेले ऐश्वर्य भोगण्यात वेळ घालवायचे की धर्म आराधना करायची हे तुम्हीच ठरवा. भोगण्यापेक्षा त्यागणे महत्त्वाचे असते. भोगण्यात वेळ घालवल्यामुळे पुण्य कर्म संपून जातील. पुण्य संचयाचा बॅलन्स शून्यावर येईल. प्रतिकूल परिस्थिती येईल त्यावेळेस व्यक्ती विचार करतो की, माझ्यावर ही वेळ का आली? मी कोणाचेच वाईट केले नाही. धर्मक्रिया करताना फक्त क्रिया राहू नये याची काळजी घ्या. त्यात अहोभाव असू द्या. जीवनात व्रती बना. १२ व्रत घेणे शक्य नसले तरी छोटे छोटे नियम पाळा. धर्मक्रियेला अहोभावाची जोड दिल्याने ते बेस्ट होईल. अहोभाव असेल तर उत्तम फलप्राप्ती होते. उगाच दैनंदिन काम म्हणून, घरातले सांगतात म्हणून अथवा सर्वजण करतात म्हणून दिखाव्यासाठी धर्म करू नका.धर्म प्रदर्शनाची बाब नव्हे. धर्म आराधनेत भाव शुद्ध व दृढ हवे.

## महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी उद्यापासून बेमुदत संपावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ ऑगस्ट-**

राज्य शासनाकडे दिर्घकाळ प्रलंबित मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाच्या आदेशानुसार सोलापूर जिल्ह्यातील अनुदानित महाविद्यालयातील ७०० शिक्षकेतर कर्मचारी गुरुवार दि. २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाणार असल्याची माहिती कॉलेज कर्मचारी युनियन सोलापूरचे अध्यक्ष दत्ता भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र राज्यातील सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्या मागण्या दिर्घकाळ प्रलंबित आहेत. याबाबत राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना व इतर घटक संघटनांच्या मार्फत शासनाकडे चर्चा व निवेदने सादर करून, सदर प्रलंबित मागण्यांबाबत सत्वर सकारात्मक निर्णय घ्यावेत यासाठी सततचे प्रयत्न झाले. परंतु या रास्त मागण्यांना न्याय मिळाला नाही. विद्यार्थ्यांना वेठीस धरण्याचा आमचा हेतू नाही. परंतु नाईलाजाने हा बेमुदत संप करावा लागत आहे, असे अध्यक्ष भोसले यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस कॉलेज कर्मचारी युनियनचे सरचिटणीस राजेंद्र गिड्डे, उपाध्यक्ष आनंद व्हटकर, सिनेट सदस्य अजितकुमार संगवे आदी उपस्थित होते.

### अशा आहेत प्रमुख मागण्या

- * सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करा.
- * सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा.
- * सर्व रिक्त पदे अग्रक्रमाने भरा
- * चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांची पदे निरसित करु नका
- * सेवानिवृतीचे वय ६० वर्षे करा
- * शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा (१०/२०/३०) लाभ द्या

# स्मार्ट सिटीत वाढले कचऱ्यांचे ढिगारे



## घंटागाडी कर्मचाऱ्यांच्या संपानंतरही शहराची बकाल अवस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २६ ऑगस्ट -**

सोलापूर स्मार्ट सिटीत दिवसेंदिवस कचऱ्यांचे ढीग वाढत चालल्याने स्मार्ट सिटीचे रूपांतर बकाल सिटी बनल्याचे दृश्य आहे. घंटागाडी कर्मचाऱ्यांच्या संपानंतर शहरात कचऱ्यांचे ढीग वरचेवर वाढत असल्याने शहराचे रूप विद्रूप झालेले दिसून येत आहे. पवित्र श्रावण महिन्यात ग्रामदैवत श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिर रोडच्या कडेला कचऱ्यांचे ढीग साचल्याने भाविक भक्तांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

एकीकडे महापालिका प्रशासनाने घंटागाडी कर्मचाऱ्यांच्या संपावर तोडगा काढत संप मिटल्याचे सांगितले. परंतु शहरातील अनेक भागात घंटागाडी येत नसल्याने नागरिकांच्या घरात देखील कचरा साठत चाललेला आहे. नाईलाजाने वैतागून अनेक नागरिकांनी कचरा रस्त्यावर फेकण्यास सुरुवात केलेली दिसत आहे. स्मार्ट शहरातील अनेक स्मार्ट रस्त्यांवर कचऱ्यांचे जागोजागी ढीग पहावयास मिळत आहे. याकडे महापालिका प्रशासन लक्ष देणार का ? असा सवाल आता स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. सोलापूर स्मार्ट सिटीचे रूपांतर बकाल सिटीत होत आहे. ऐन पावसाळ्यात शहरातील विविध ठिकाणी कचरा संकलन केला जात नसल्याने मोकाट जनावरांचा वावर देखील कचरा कुंड्यांवर वाढला आहे. शहरातील वाढता कचरा दुर्गंधी अस्वच्छता यामुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होत आहे. शहराच्या प्रमुख चौकात तसेच हद्दवाढ भागात देखील हेच विदारक दृश्य दिसून येत आहे. संबंधित झोन अधिकारी , सफाई कर्मचारी , घंटागाडी कर्मचारी तसेच ठेकेदार यांनी शहरातील विविध भागात पाहणी करून त्यावर थोडगा काढावा अशी मागणी देखील आता स्थानिक नागरिकांमधून केली जात आहेत.

### महापालिका आयुक्तांनी लक्ष देण्याची गरज

महापालिका प्रशासनाला आम्ही वेळोवेळी कर भरतो परंतु त्याचा उपयोग चांगल्या कामासाठी होत नाही. अधिकारी कर्मचारी आणि संबंधित ठेकेदार आपल्या कर्तव्याला मूठमाती देत आहेत. कचरा उचलण्याचा ठेका घेणाऱ्या मक्तेदांवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. कर्मचाऱ्यांना वेळेवर पगार दिला जात नाही. यामुळे नागरिकांना याचा नाद त्रास सहन करावा लागत आहे. या प्रश्नावर आयुक्तांनी गांभीर्यपूर्वक विचार करावा.

**- श्रीनिवास संगा, श्री प्रतिष्ठान सामजिक संस्था अध्यक्ष**

### घंटागाडी येत नसल्याने कचरा रस्त्यावर

महापालिका प्रशासन नागरिकांसाठी मूलभूत सुविधा देण्याकडे दुर्लक्ष करत आहे. वेळोवेळी कर भरून देखील सुविधा दिल्या जात नाहीत. घंटागाडी वेळेवर येत नसल्याने घरामध्ये कचरा साठत आहे. साठलेला कचऱ्याने सर्वत्र दुर्गंधी वाढत असून नाईलाजाने सदरचा कचरा रस्त्यावर टाकावा लागत आहे. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे

**- विठ्ठल बडगंची, नागरिक.**



## राज्यसारथी गृहनिर्माण संस्थेची वार्षिक सभा खेळीमेळीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

येथील राज्य सारथी गृहनिर्माण संस्था, आदित्य नगरची विसावी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. निवृत्त प्राध्यापक शंकरराव खळसोडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला संस्थेचे अध्यक्ष भारत जाधव यांच्यासह सर्व संचालक मंडळ व सल्लागार मंडळ सदस्य यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

संस्था अध्यक्षांनी, गुलाब पुष्प देऊन सर्वांचे स्वागत केले. पदाधिकाऱ्यांच्या हस्ते आदित्य देवतेचे पूजन करण्यात आले. संस्थेच्या वतीने सभा अध्यक्षांचा सत्कार करण्यात आला. संस्था सचिव, निवृत्त प्राध्यापक विलास मोरे यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम पत्रिकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. संस्थेचे सक्रिय सदस्य जयप्रकाश काळे, राजीव अय्यर, थोरात आदींनी मनोगत व्यक्त करीत, काही समस्या निदर्शनाला आणून दिल्या. सर्व अडीअडचणी टप्प्याटप्प्याने सोडविण्यात येतील, असे आश्वासन अध्यक्षांनी दिले. सभा अध्यक्ष खळसोडे यांनी अध्यक्ष भाषणात संस्थेच्या चोख कामकाजाबद्दल कौतुक केले. शेवटी कोषाध्यक्ष बाळासाहेब नागणे यांनी आभार मानले.

## समता विद्यालयात पुस्तक हंडी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २७ ऑगस्ट-**

येथील मागास समाजसेवा संचलित समता मराठी विद्यालयात श्रीकृष्ण-जन्माष्टमी निमित्त वाचनाचे महत्व वाढीस लागावे म्हणून पुस्तक हंडी उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी पुस्तक हंडीतील पुस्तकांचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांना सामाजिक आणि पारंपरिक सणांचे महत्त्व कळावे म्हणून सातत्याने असे उपक्रम राबवण्यात येत असल्याचे मुख्याध्यापक जयवंत हक्के यांनी सांगितले.



गोपाळकालानिमित्त 'पुस्तक हंडी' उभारण्यात आली होती. शाळेतील बालवाडी ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे रचत पुस्तकांची हंडी फोडत ज्ञानाचा खजिना लुटला. यावेळी वेदांत माने, जानकी बडूरवाले, रिया पुणेवाले आणि कृष्णा मेनगुले या विद्यार्थ्यांनी 'श्रीकृष्ण आणि राधा ही वेशभूषा साकारली होती. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी 'पुस्तक हंडी' साकारण्यात आली होती. याप्रसंगी मिनाक्षी राठोड, ज्योती रणसिंग, समिना मुजावर, कल्पना वाघमारे, चारुशीला म्हमाणे,, सुनिता पवार, संतोष रजपूत, सुजाता डोंगरे आदी उपस्थित होते.

# हिंदवी परिवाराची पन्हाळा पावनखिंड मोहीम ऊर्जा देणारी

## शहर, जिल्ह्यातून १९० शिवभक्तांचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापर, दि. २७ ऑगस्ट-**

राष्ट्रप्रथम वंदे मातरम ह्या बोध वाक्यावर चालणारी हिंदवी परिवाराची दरवर्षीप्रमाणे यंदाही गडकोट पदभ्रमती मोहीम पन्हाळा ते पावनखिंड अशी तीन दिवसीय मोहीम संस्थापक अध्यक्ष डॉ.शिवरत्न शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली.

यंदाच्या ह्या मोहिमेत ४७५ शिवभक्तांनी सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये विशेष उल्लेखनीयबाब म्हणजे ह्यामध्ये ७३ महिलांनी आपला सहभाग नोंदविला होता. यात सोलापूर शहर व जिल्ह्यातुन १९० शिवभक्त तर अहमदनगर, अकलूज, अकोला, अमरावती, बीड, भुसावळ, बुलढाणा, जालना, मंगळवेढा, वाशीम, मिरज, नागपूर, नाशिक, शेवगाव, पुणे राहुरी, फलटण, कोल्हापूर, ठाणे आदी ठिकाणाहून असंख्य शिवभक्त ह्या पदभ्रमंती मोहिमेत सहभागी झालेले होते.



मोहिमेची सुरुवात नरवीर शिवा काशीद व नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या पुतळ्यास अभिवादन करून पन्हाळा येथील पुसाटी बुरुज येथून झाली. मोहिमेचे सांगता काडसिद्धेश्वर महास्वामीजींच्या उपस्थितीत सिद्धगिरी मठ कणेरी कोल्हापूर येथे झाली. ह्याप्रसंगी हिंदवी परिवाराचे संस्थापक अध्यक्ष डॉ शिवरत्न शेटे यांनी ह्या तीन दिवसीय मोहिमेची भौगोलिक मार्गावर चाललेल्या ठिकाणचे ऐतिहासिक महत्व, छत्रपती शिवरायांच्या पन्हाळ्यातून झालेली सुटका, त्या ठिकाणी बलिदान दिलेले नरवीर शिवा काशीद, बाजीप्रभू देशपांडे यांच्यासह अनेक मावळ्यांनी स्वराज्यासाठी दिलेली बलिदान ह्या सर्व घटनांची पुन्हा एकदा आठवण त्यांनी त्यांच्या ओजस्वी वाणीतून सर्व सहभागी शिवभक्तांना करून दिली.

### हिंदवी परिवार मोहिमेचे वैशिष्ट्य

यंदाचे हे १५ वे वर्ष, प्रत्येक मोहिमेत सुसज्ज अशी रेस्क्यू टीम, डॉक्टर पथक, संपूर्ण मोहिमेत हिंदवी परिवाराची स्वत:ची कार्डियाक अंबुलन्स, प्रत्येकवेळी मोहिमेत १२ ते ४५ वर्षाच्या अबाल वृध्दांचा सहभाग.

याप्रसंगी मोहीम सरनोबत, संभाजी भोसले, रामकृष्ण पाटील, धारेश्वर तोडकरी, अभिषेक गांधी, महेश शिंदे, भूषण बापट, दिलीप मेसरे, समाधान अवताडे, अमृत काटकर, वसंतराव झावरे, विनायक दुदगी, लक्ष्मण वाघ, प्रकाश सरनाईक, लक्ष्मण लेंगरे, सचिन भोसले, दादू कांबळे, उमेश भालसिंग, नितीन धांडे, विजय पोखरकर, जगन्नाथ राऊत, संतोष शेटे, अजय भोयर आदींसह विविध जिल्ह्याप्रमुख, विभागप्रमुख व हिंदवी परिवारातील शिवभक्तांनी मोहिमेच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पंढरीतील बाजारपेठा विविध गणेशमूर्तींनी सजल्या

## आतापासूनच बुकिंग सुरु; विविध आकार-प्रकारच्या गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ ऑगस्ट-**

येत्या ७ सप्टेंबर रोजी गणेशचतुर्थीचा सण आहे. त्यामुळे या सणासाठी आता केवळ दहा त अकरा दिवसांचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे येथील स्थानिक कारागिराच्या कारखान्यांमधून गणेशाच्या भव्य मूर्तीवर रंगकाम करण्यापूर्वीचा शेवटचा हात फिरविला जात आहे, तर दुसरीकडे परगावच्या कारागिरांनी बनविलेल्या मूर्ती येथील बाजारपेठे मध्ये विक्रीसाठी दाखल झालेल्या दिसत आहेत.

हिंदू सणातील सर्वात मोठा सण म्हणून समजला जाणाऱ्या गणेशोत्सवाची घरातील लहान, थोरांसह सर्वांनाच उत्सुकता असते. गणेशोत्सव आता केवळ दहा ते बारा दिवसांवर येऊन ठेपलेला आहे. त्यामुळे येथील स्थानिक मूर्तिकारांच्या कारखान्यांमधून बनविण्यात आलेल्या विविध प्रकारच्या भव्य अशा गणेशमूर्तींवर रंगकाम करण्या अगोदर फिनिशींगचा शेवटचा हात फिरविला जात आहे. यामध्ये मूर्तीवरील राहिलेल्या त्रुटी शोधून त्यावर काम केले जात आहे. स्थानिक कारागिरांच्या कारखान्यांमधून लहान तशाच मोठ्या मूर्ती तयार झालेल्या दिसत आहेत. यावर्षी कच्चा माल तसेच वाढती महागाई यामुळे गणेशमूर्तींच्या किंमत मध्ये सुमारे २० ते ३० टक्के एवढी वाढ झाल्याचे सांगितले जात आहे. मोठ्या गणपती मध्ये स्वामी समर्थ, दत्त अवतार, विठ्ठल अवतार, प्रभू राम अवतार या रुपातील गणेशमूर्तींना सार्वजनिक मंडळांकडून चांगली मागणी असल्याचे येथील मुर्तीकारांकडून सांगितले जात आहे. दुसरीकडे पेण,कोल्हापूर, नगर, सांगली आणि पुणे या भागातील प्रसिद्ध कारागिरांनी बनविलेल्या लहान तसेच मध्यम आकाराच्या मूर्ती देखील येथील बाजारपेठेतून विक्रीसाठी सज्ज झालेल्या दिसत आहेत. येथील भादुले चौक, कवठेकर प्रशाला रस्त्यावर गणेशमूर्तींच्या विक्रीसाठी खास स्टॉल्स उभारलेले दिसत आहेत.



### एलईडी लाईट तसेच डायमंडच्या मूर्तींना मागणी

येथील बाजारपेठेत विविध प्रकारच्या आणि विविध उंचीच्या गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध झाल्या असून मागील काही वर्षापासून एलईडी लाईट असलेल्या गणेशाच्या मूर्ती देखील विक्रीस उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. या बरोबरच छत्रपती शिवाजी महाराज, लालबागचा राजा, दगडूशेठ हलवाई गणेशमूर्तींवर अमेरिक डायमंडची देखील सजावट करण्यात आली असून या मूर्तींना खरोखरचे फेटे तसेच शेले देखील परिधान करण्यात आलेले आहेत. या मूर्तींना देखील नागरिकांमधून मागणी होत असल्याचे विक्रेत्यांकडून सांगितले जात आहे.

### विविध रुपातील गणेशमूर्ती उपलब्ध

या वर्षी लालबागचा राजा, बालगणपती, शिवाजी महाराज, तुकाराम महाराज, बालाजी अवतार, गरुडावर आरुढ झालेला, शेंदूर लावलेला गणपती, नवनाथरुपी गणपती, दगडूशेठ हलवाई, सिंहासनावर आरुढ झालेला गणपती, जास्वंद फुलामधील गणपती, अक्कलकोट स्वामी रुपातील गणपती, विठ्ठल रुपातील गणपती, फेटा आणि शेला परिधान केलेला गणपती अशा विविध प्रकारच्या गणेशमूर्ती विक्रीसाठी उपलब्ध झालेल्या दिसत आहे. तीन इंचापासून ते साधारण सहा ते नऊ फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींना मागणी असून दोनशे रुपयांपासून ते दहा, पंधरा आणि वीस, पंचवीस हजार रुपयांपर्यंत किंमत असलेल्या मूर्ती उपलब्ध असल्याचे येथील कारागिरांकडून सांगितले जात आहे.

## संक्षिप्त वृत्त



### पिलीव येथील भैस-सुळेवस्ती ओढ्यावरील पुलाचे भूमिपूजन

**पिलीव, दि. २७ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील भैस - सुळेवस्ती ओढयावरती आ. राम सातपुते यांच्या फंडातून मंजूर झालेल्या पूलाचे पिलीव गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील, पिलीवचे माजी लोकनियुक्त सरपंच नितीन मोहीते, माजी उपसरपंच संजय आर्वे, माजी ग्रामपंचायत सदस्य अविनाश जेऊरकर, माजी उपसरपंच नारायण सुळे, पिलीव विकास सोसायटीचे संचालक कुबेर भैस, पत्रकार संघाचे अध्यक्ष अतुल नष्टे, भैया रजपुत, पत्रकार दामोदर लोखंडे, संजय पाटील, सुजित सातपुते, उदय कदम, मधुकर भैस,किसन भिसन,अनिल सुळे,नारायण भिसन, अर्जुन सुळे, सदाशिव भैस, वैभव सुळे, किरण भिसन, महादेव भैस, विकास सुळे, रामचंद्र मंजार, अक्षय भिसन, तानाजी सुळे, सागर भैस, दिगांबर भैस, दामोदर भिसन, धनाजी सुळे, ठेकेदार खेडेकर या मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला.

### हेरिटेज मनीधारी सांस्कृतिक मंडळाच्या अध्यक्षपदी उद्योजक गजानन होनराव

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

अक्कलकोट-सोलापूर रस्त्यावरील हेरिटेज मनी धारी एम्पायर येथील गणेशोत्सव तरुण मंडळाच्या अध्यक्षपदी अडत व्यापारी व उद्योजक गजानन होनराव यांची एकमतांनी निवड झाली. उपाध्यक्ष सैदू गाडी, सचिव संजय जोगीपेठकर, सहसचिव काशीनाथ बिराजदार, खजिनदार अंबादास खराडे, सहखजिनदार उद्धव पौळ, मिरवणूक प्रमुख प्रकाश कोटे, सहमिरवणूक प्रमुख नागेश आळगी, पूजा प्रमुख शंकर गाडी, शिवय्या मसुती. सल्लागार समिती- सुरेश येळमेली, सिद्रामप्पा गोविंदे, संतोष बुरबुरे, विजयकुमार भोसले, म्हाळप्पा सुरवसे, मलप्पा मुळजे यांच्या निवडी झाल्या. गणेशोत्सव शानदार करण्यासाठी लेझीम सरावाचे नियोजन करण्यात आले आहे. सोलापुरात सगळ्या गणेश भक्तांचे लक्ष वेधून घेईल अशा पद्धतीने यंदा मिरवणूक काढण्यात येणार आहे. पारंपारिक वाद्याबरोबरच लेझीमचा ताफा यंदाच्या मिरवणुकीत चार चाँद लावणार आहे, अशा पद्धतीने नियोजन करण्यात येत असल्याचे नूतन अध्यक्ष गजानन होनराव यांनी सांगितले.





### वाढदिवसाचा अनावश्यक खर्च टाळून आश्रम शाळेत शालेय साहित्यांचे वाटप

**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**

दुर्वांग इंद्रजीत बोरगांवकर याच्या वाढदिवसनिमित्त अनावश्यक खर्च टाळून यमगरवाडी (भटकी विमुक्त सेवा प्रकल्प) आश्रम शाळा येथे शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. यामध्ये स्कूल बॅग, वही, पेन, कंपास, लहान मुलांचे आकर्षक स्कूल बॅग व खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी वडील इंद्रजीत बोरगांवकर, आई सई इंद्रजीत बोरगांवकर, अक्कलकोट तालुका भटकी विमुक्त तालुका प्रमुख संदीप कटकधोंड, वाघमोडे, घुगे, भोजने उपस्थित होते



### शिवसेना महिला आघाडीतर्फे शालेय साहित्याचे वाटप

**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**

शिवसेना शहर महिला आघाडी व कामगार सेना माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ फेडरेशन महाराष्ट्र अक्कलकोट तालुका कार्यकारणी यांच्या संयुक्त विद्यमाने कै. द्वारकाबाई साहेबराव कांबळे मनपा मराठी मुलांची शाळा विनायक नगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी माहिती अधिकार महासंघाचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष सुळे, मुंबई मुख्यमंत्री जनकल्याण समितीचे श्रीकांत गोसावी व माहिती अधिकार महिला आघाडी तालुका संघटक शिवसेना महिला आघाडी शहराध्यक्ष वैशाली हावनूर, कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे, सिद्धाराम बगले, श्रीकांत कोळी, आकाश बबलाद, वर्षा मेत्रे, गंगाबाई स्वामी, वाघमारे, लक्ष्मी रामनाळी उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांचे सत्कार मुख्याध्यापक किशोर मोरे यांनी केले.

### सिद्धेश्वर मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकाची बॅग पळवली

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

शहरातील सिद्धेश्वर मंदिरे येथे दर्शनासाठी आलेल्या भाविकाच्या हातातील हॅन्ड बॅग अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेऊन चोरून नेल्याची घटना २१ ऑगस्ट रोजी सकाळी सव्वा सात ते पावणे आठ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी वंदना रवींद्र गोयल (वय ४५, रा. मुरारजी पेठ, लकी चौक) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरून नेलेल्या हॅन्ड बॅग मध्ये एकुण ६२ हजार ५०० रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र व रोख रक्कम असा ऐवज होता. पुढील तपास पोलीस नाईक भिमदे हे करीत आहेत.

## हन्नूरच्या अनंत चैतन्य प्रशालेत दहीहंडी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**

अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, हन्नूर येथे हा दहीहंडीचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये सर्व वर्गाच्या संघानी उस्फूर्त प्रतिसाद दिला.

मुख्याध्यापक अशोक साखरे यांच्या हस्ते श्री कृष्ण मूर्तीच्या प्रतिमेचे पूजन करून उत्सवास सुरुवात करण्यात आली. याक्षणी श्री कृष्ण-राधाच्या वेशभूषेत निशांत बाळशंकर व नंदिनी रोट्टे होते. कार्यक्रमाच्या सुरूवातीला शिवानी बाळशंकर, सायली पवार व समुह भक्ती स्वामी व समुह, ऐश्वर्या घोडके यांनी नृत्य केले. पाचवी ते दहावीपर्यंतच्या मुलां-मुलींनी बनवलेल्या प्रत्येक संघाने मनोरे रचून दहीहंडी फोडण्याचा छान प्रयत्न केला. मात्र यात दहावीच्या करुणा हेगडेच्या संघाने तर याच वर्गातील कुमार बाबुराव यादवच्या संघाने बाजी मारली. वजेत्या संघाला मुख्याध्यापक अशोक साखरे यांच्यावतीने रोख बक्षीस देऊन गौरवण्यात आले. दहीहंडीचा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, अप्पासाहेब काळे, स्वप्नाली जमदाडे,धनंजय जोजन, सुरेश जाधव, राजेंद्र यंदे, शशिकांत अंकलगे, अब्दुल अजीज मुल्ला, काशिनाथ पाटील, स्वामीनाथ कोरे, शिवप्पा घोडके यांनी परिश्रम घेतले. सरदार मत्तेखाने, शहाजी माने, रवींद्र कालीबत्ते, रमेश शिंदे, मृदुलादेवी स्वामी,जैनुद्दीन जमादार यांनी सहकार्य केले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष व आमदार सचिन कल्याणशेट्टी, जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मल्लिनाथ कल्याणशेट्टी, माजी प्राचार्य व आधारस्तंभ सिध्देश्वर कल्याणशेट्टी, संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, उपसरपंच सागर कल्याणशेट्टी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, सीईओ रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख पूनम कोकळगी यांनी कौतुक केले.



## पिलीव येथे बदलापूर घटनेच्या निषेधार्थ सर्वपक्षीय कँडल मार्च

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २७ ऑगस्ट-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथील शाळेतील चिमुरड्यावर जो अमानुष अत्याचार केला याच्या निषेधार्थ सत्ताधारी व प्रशासनाच्या विरोधात पिलीव येथे सर्वपक्षीय कॅन्डल मार्चचे आयोजन करण्यात आले. याची सुरुवात पिलीव येथील हनुमान मंदीरापासून झाली तर शेवट पिलीव पोलीस स्टेशनला निवेदन देऊन करण्यात आला.

यावेळी मनसेच्या नगरसेविका रेश्मा टेळे, मनसेचे तालुका अध्यक्ष सुरेश टेळे, तालुका संघटक मायाप्पा जावळे, अनंता जामदार, शिवसेना तालुका उपाध्यक्ष डॉ. निलेश कांबळे, आरिफखान पठाण, श्याम मदने, नितीन कपने, अविनाश जेऊरकर, फिरोज शेख, अतुल जामदार, माजी सरपंच अमोल मदने, मोहसीन शेख, रणधीर जामदार, राजाभाऊ जामदार, अमिनखान पठाण,सचिन पुकळे, कदीरखान पठाण, रहीम शेख,सागर भैस, मंगेश वाघमारे, वैभव पिसे, पूनम भैस, सुषमा जामदार, काजल रजपुत, जहागिरदार ताई, कविता देशमुख, रिझवाना शेख, ज्येष्ठ पत्रकार दामोदर लोखंडे, प्रमोद भैस,संजय पाटील यांच्यासह असंख्य महिला, मुली, ग्रामस्थ या मोर्चात मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी या घटनेतील आरोपीला ताबडतोब फाशीची शिक्षा देणयात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी पिलीव पोलीस स्टेशनचे हवालदार अमित जाधव व सतीश धुमाळ यांनी निवेदन स्विकारले.






## मेहता शाळेची हत्तरसंग कुडलला क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

कै. वि. मो. मेहता माध्यमिक शाळेतील इ. ७ वी चे विद्यार्थी व शिक्षक क्षेत्रभेटीसाठी हत्तरसंग कुडल याठिकाणी गेले होते. हत्तरसंग कुडल हे ठिकाण भीमा आणी सीना नद्यांच्या संगमावर महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यात आहे. हे ठिकाण धार्मिक आणि निसर्ग पर्यटनासाठी प्रसिद्ध आहे.

या ठिकाणी श्री संगमेश्वर मंदिर आणि हरिहरेश्वर मंदिर हि दोन प्राचीन तसेच हेमाडपंथी मंदिरे आहेत. याशिवाय बहुमुखी शिवलिंग, मराठीतील आद्य शिलालेख, अद्वितीय स्थापत्य, शिल्प आणि मूर्ती तसेच उत्खननामध्ये कृष्णाचे मंदिर या ठिकाणी सापडले. त्यामध्ये कृष्णाच्या वेगवेगळ्या लिला लेण्यांमध्ये कोरलेल्या दिसून येतात. एक चेहरा व पाच शरीरे असलेले कृष्णाचे दुर्मिळ शिल्पही येथे आहे. त्याच्या दोन्ही बाजूला छतावर श्रीकृष्ण आणि गोपिका यांचे शिल्प कोरलेले आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रुती बागेवाडी यांच्या मार्गदर्शनाखाली ही क्षेत्रभेट पार पडली.

## नू. म. वि. शाळेत श्रावण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

नू. म. वि. शाळेत श्रावण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या डॉ. नयना व्यवहारे व सेवा ज्येष्ठ शिक्षिका स्मिता माळवदकर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. रोहिणी चौधरी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी श्रावणातल्या विविध सणावर आधारित गीतांवर नृत्य सादर केले. त्यांना सीमा कोळी, हेमलता बिराजदार, सविता नवगिरे, शिवशंकर बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यानंतर शिवस्मारक आयोजित देशभक्तीपर गीत गायन या स्पर्धेत शाळेचा प्रथम क्रमांक आल्या बद्दल सर्व सहभागी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या संगीत शिक्षिका श्रीमती मीनाक्षी कुलकर्णी तसेच नर्मदा कनकी व दीपा कुलकर्णी यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. याचे यादी वाचन आशा गायकवाड यांनी केले. यावेळी शाळेच्या माता पालिकांनी मंगळागौरीच्या विविध खेळातून सामाजिक संदेशही दिला. वृक्षवल्ली आम्हा सोयरे... याची जाण ठेऊन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाडांना राखी बांधण्यात आली.आपल्या मनोगतातून प्रमुख पाहुण्यांनी श्रावणातल्या प्रत्येक सणाचे धार्मिक व वैज्ञानिक महत्व सांगितले. सूत्रसंचालन रेणुका हिरेमठ व आभार रोहिणी चौधरी यांनी मानले.



## खा. प्रणिती शिंदे यांनी घेतली नदीकाठच्या गावकऱ्यांची भेट

### जिल्हा प्रशासनालाही दिल्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

पावसाचा जोर आणि उजनीचा विसर्ग वाढल्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील नदीकाठच्या गावातील नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन करून जिल्हा प्रशासनाने आपत्कालीन व्यवस्था तयार ठेवून गावकऱ्यांना आवश्यक त्या सुविधा पुरवून सहकार्य करावे, अशा सुचना खासदार प्रणिती शिंदे यांनी दिल्या.

पुरामुळे मतदारसंघातील नागरिकांना येणाऱ्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन खा. शिंदे यांनी गावभेट दौरा आयोजित केला असून, मंगळवेढा व पंढरपूर तालुक्यातील माचनूर, पुळूज या गावांतील नदीकाठच्या लोकांची त्यांनी घेतली आणि समस्या जाणून घेतल्या.

माचणुर, बेगमपुर येथील जुना पुल, आंबेचिंचोली बंधारा, पंढरपूर येथील जुना दगडी पूल येथे भेट देऊन भीमा नदी पात्राची पाहणी केली. उजनीतून पाणी सोडल्यामुळे सोलापूर जिल्ह्यात नदीकाठच्या गावात पूर परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे गावातील नागरिकांनी सतर्कता बाळगावी, काहीही अडचण असल्यास संपर्क साधावा, असे आवाहन केले. तसेच प्रशासनाने आपत्कालीन व्यवस्था करावी आणि नागरीकांना आवश्यक ते सुविधा पुरवून सहकार्य करावे असे आवाहन केले. यावेळी प्रांताधिकारी, तहसिलदार, पंढरपूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी, व इतर खात्याचे शासकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी खासदारांकडून आपल्या समस्या तत्काळ मार्गी लागल्याने व प्रश्नांचे निराकरण होत असल्याने उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. यावेळी मान्यवर नेते मंडळी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## आचेगाव तंटामुक्त अध्यक्षपदी शावरसिद्ध पाटील यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**आचेगांव दि. २७ ऑगस्ट-**

आचेगांव तालुका दक्षिण सोलापूर येथील महात्मा गांधी तंटामुक्त अध्यक्षपदी शावरसिद्ध नागनाथ पाटील यांची बिनविरोध निवड ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली.

मावळते तंटामुक्त अध्यक्ष भगवान गोतसुर्वे यांची सुद्धा सलग दोन वेळा अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आलेली होती. सरपंच विश्रांती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व ग्रामविकास अधिकारी एल.म.नदाफ यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या या ग्रामसभेत विविध विषयावर चर्चा करण्यात आली. तंटामुक्त अध्यक्ष निवडीच्या वेळी शावरसिद्ध नागनाथ पाटील हे एकमेव इच्छुक असल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे ग्रामविकास अधिकारी नदाफ यांनी घोषित केले. यावेळी त्यांचा सत्कार विकास गोतसुर्वे व हरून बिराजदार यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पोलीस पाटील प्यारन मुल्ला, विठ्ठल माने, उपसरपंच रफिक मुल्ला, माजी सरपंच बलवान गोतसुर्वे, शिलीसिद्ध उर्फ सागर कोळी,मलिक पटेल, महिबूब पटेल, ताजोद्दीन बिराजदार, चंदू शिलेणी, ग्रामपंचायत सदस्य श्रीमती मंगल गोतसुर्वे, जयश्री खांडेकर, शांताबाई शिलेणी, नागप्पा कांबळे मलकारी कोरे,जिप प्राथ मुख्याध्यापक राजशेखर कोळी, कृषी सहाय्यक जयश्री ताकतोडे, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, पोलीस स्टेशन व ग्रामपंचायत सर्व कर्मचारी यासह इरफान पटेल, प्रदीप पाटील, शिवाजी पाटील, दिनेश गोतसुर्वे, कुलदीप पाटील, श्रीकांत वाघमोडे, प्रमोद कुंभारे, महानंतेश धुते, मल्लू शिलेणी, शरद गोतसुर्वे, बिजली बिराजदार, राहुल शिंदे उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



पंढरपूर : येथील श्री विठ्ठल मंदिरात भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी आणि कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती श्री संत शिरोमणी ज्ञानोबाराय अवतार दिनाच्या निमित्ताने सोमवारी विठुरायास पारंपारिक असा दीडशे हात पागोटे, रेशमी कुंची, बासरी आणि चांदीची काठी असा पोशाख परिधान करण्यात आलेला होता. त्यामुळे राजससुकुमार मदनाचा पुतळा असे वर्णन असलेल्या पंढरीरायाचे रूप या वैशिष्ट्यपूर्ण पारंपारीक पोशाखामुळे अधिकच लोभस दिसत होते.





सांगोला : उत्कर्ष बालक मंदिरमध्ये दहीहंडी कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी विद्यार्थी राधा-कृष्ण, गोप-गोपीच्या पोशाखात आले होते.

# डॉ. आंबेडकर संकुल इमारतीचा जीर्ण भाग कोसळला

## नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**

अक्कलकोट शहरातील जुना अडत बाजार परिसरात असणाऱ्या लक्ष्मी भाजी मंडई समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुलचा जीर्ण इमारतीचा काही भाग रविवारी सकाळी दहाच्या सुमारास कोसळल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. यामुळे नगरपालिकेच्या आदर्श कारभाराबाबत नागरिकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. नागरीकांच्या जुन्या इमारतींचे व नगरपालिकेच्या मालकीच्या इमरतीचा सर्व्हे नगरपालिकेने केलेले आहेत का? असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.



अक्कलकोट शहरातील जुना अडत बाजार परिसरात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटर हे नगरपालिकेच्या मालकीचे आहे. या शॉपिंग सेंटरच्या वर हत्तीरोग ऑफिस कार्यान्वित होते. पण इमारत जिर्ण झाल्याने ते कार्यालय इतरत्र हलविण्यात आले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटरचा जीर्ण झालेला वरचा भाग हा रविवार दिनांक २५ ऑगस्ट रोजी सकाळी दहाच्या सुमारास कोसळला. यावेळी रहदारीचा परिसर असल्याने सुदैवाने कोणीही जखमी किंवा जीवितहानी झाली नाही. हा इमारतीचा भाग कोसळल्याने नागरिकात खळबळ उडाली. हा इमारतीचा भाग पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शॉपिंग सेंटरची ही इमारत गेल्या अनेक दिवसापासून जीर्ण झालेले आहे. नगरपालिका प्रशासनाकडून या इमारतीकडे दुर्लक्ष झालेले आहे. वास्तविक पाहता ही धोकादायक इमारत नगरपालिकेच्या बांधकाम विभागाने पाडणे गरजेचे आहे. असे असताना नगरपालिका प्रशासन हे नागरिकांच्या जीवाशी नाहक खेळत असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. नगरपालिकेच्या एकूणच आदर्शकारभाराबाबत नागरिकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. अक्कलकोट शहरातील एवन चौकातील श्री स्वामी समर्थ उद्यानाच्या परिसरातील शॉपिंग सेंटर ही जीर्ण झाले असून हा शॉपिंग सेंटरचा भाग कोसळल्याची शक्यता नागरिकांतून व्यक्त केली जात आहे. नगरपालिका प्रशासनाने शहरातील शॉपिंग सेंटरच्या बांधकामांचे ऑडिट करणे गरजेचे असून याकडे मुख्याधिकारी रमाकांत डाके यांनी लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांतून जोर धरली आहे.



# उत्तरेश्वर मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## डॉ. बोधले महाराज, आ. राजेंद्र राऊत यांच्या हस्ते पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी दि. २८ ऑगस्ट-**

शहरातील मंगळवार पेठ येथील श्री संत विसोबा खेचर महाराज यांच्या पंचदशाधिक सप्तशतम् (७१५) व्या समाधी सोहळ्यानिमित्त श्री उत्तरेश्वर देवस्थान ट्रस्ट व एस.एम.एम.ग्रुप यांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताह व श्री संत विसोबा खेचर महाराज व दुर्वासऋषी चरित्र निरुपण सोहळ्याची सुरुवात डॉ. हभप जयवंत बोधले महाराज व बार्शी तालुक्याचे आमदार राजेंद्र राऊत यांच्या शुभहस्ते कलश, ज्ञानेश्वरी, ध्वज, प्रतिमा, गाथा, टाळ, मृदंग, वीणा पूजन, भजन व हरी नामस्मरण करुन झाली.

यावेळी श्री उत्तरेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिनेशसिंह परदेशी, विलास रेणके, बप्पा जगताप, केदार महाराज शिंदे, डॉ. राहुल मांजरे, भैय्या बारंगुळे, गणेश भोळे, उमेश पंडीत, राजेंद्र भोळे, मंगेश पंडीत, बालाजी गायकवाड, सागर म्हातेकर, किशोर पंडित, धिरज जिरे, अभिजीत बारंगुळे, महेश चोबे, गणेश घोलप, रविंद्र सांगोळे, दिनेश जिरे,श्री म्हातेकर, मयुर बारंगुळे, राजेंद्र ठोंबरे, जितू भगत, अभिजीत गंगणे, शुभम बोधले, अमोल ठोंगे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### अन्नछत्र मंडळात दहीहंडी उत्सव

**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंडळात दही हंडी उत्सव मोठ्या उत्सवात संपन्न झाला. दरम्यान मंडळाच्या महाप्रसादालयात गोकुळ अष्टमी निमित्य पाळणा व गुलाल व आरती आदि धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. पाळण्यास विविध फुलाने सजविण्यात आलेले होते. शहरातील दही हंडी फोडण्याचा मान संस्थानकालीन, श्रीमंत विजयसिंहराजे भोसले चौकातील वडार समाजातील युवकांना असून, सदरजणांनी प्रमुख मार्गावरून ढोल ताश्याच्या गजरात युवक मिरवणूकीने अन्नछत्र मंडळात येऊन क्रेनच्या सहाय्याने उभारण्यात आलेली दही हंडी फोडण्यात आली. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, मल्लिकार्जुन बिराजदार, शहाजीबापू यादव, निखील पाटील, गोटू माने, अतिश पवार, प्रवीण घाडगे, पिट्टू साठे, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्वनाथ कलशेट्टी, खंडेराव होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# अन्नछत्र मंडळातर्फे आ. पंकजा मुंडे यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून उत्तम व्यवस्था, स्वच्छता आणि सेवा हे स्वामींच्या भक्तांसाठी दिलासा असल्याचे मनोगत राज्याचे माजी मंत्री आ. पंकजा मुंडे यांनी व्यक्त केल्या. त्या मातोश्री प्रज्ञा मुंडे यांच्यासह श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते



श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. त्यांच्या समवेत आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, माजी जि.प. पक्ष नेता आनंदराव तानवडे, माजी पंचायत समितीचे सदस्य बाळासाहेब मोरे, नन्नू कोरबू, दत्ता शिंदे, नागेश कलशेट्टी, कार्तिक पाटील, भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, पो.ना. चिदानंद उपाध्याय आदिजन उपस्थित होते. यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, पुरोहित संजय कुलकर्णी, मल्लिकार्जुन बिराजदार, शहाजीबापू यादव, निखील पाटील, प्रवीण घाडगे, आतिश पवार, गोटू माने, पिट्टू साठे, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्वनाथ कलशेट्टी, खंडेराव होटकर यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



# पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडून एमके फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. २७ ऑगस्ट-**

एमके फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष तथा जनसेवक महादेव कोगनुरे यांनी सोलापूरचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी महादेव कोगनुरे यांच्या सामाजिक कार्याचा अहवाल पुस्तिका भेट म्हणून देण्यात आले. यावेळी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी महादेव कोगनुरे यांच्या कार्याचे कौतुक करीत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी एमके फाउंडेशन चे पदाधिकारी उपस्थित होते.



### नू. म. वि. शिशु शाळेत दहीहंडी

**सोलापूर, दि. २७ ऑगस्ट-**

नू.म.वि.शिशु शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीचा व दहीहंडीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व बालमंडळी श्रीकृष्ण व राधेच्या वेशात छान तयार होऊन आली होती. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून छोटा गट चाफा मधील पालक आदित्य पवार व प्रियांका पवार या पालकांना आमंत्रित करण्यात आले होते. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी व प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे व प्रतिकृती तयार करण्यात आलेल्या गोवर्धन पर्वताचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापिका यांनी जन्माष्टमी व दहीहंडीचे महत्व सांगितले त्यानंतर मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी मनोरा तयार करून दहीहंडी फोडण्यात आली. विद्यार्थ्यांना काला देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन व आभार अंकिता कुलकर्णी यांनी केले.

# गरीब, वंचितांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सरकार कटिबद्ध

**आ. शहाजीबापू पाटील; मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ घ्यावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२७ ऑगस्ट-**

सध्या महिलांमध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची प्रचंड चर्चा आहे. या योजनेला भरघोस प्रतिसाद मिळत आहे. तर दुसरीकडे राज्य सरकारने ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेचीही घोषणा केली आहे. या योजनेंतर्गत ६० वर्षांवरील नागरिकांना देशभरातील ७३ आणि राज्यातील ६६ अशी एकूण १३९ तीर्थक्षेत्रे निर्धारित करण्यात आली आहेत. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेअंतर्गत राज्य सरकार जेष्ठ नागरिकांना देवदर्शन घडवणार असून पात्र व्यक्तींचा प्रवासाचा, राहण्याचा आणि भोजनाचा खर्च सरकार उचलणार आहे. केवळ राज्यातीलच नव्हे तर परराज्यातील तीर्थस्थळांनाही भेट देता येईल अशी माहिती आ.शहाजीबापू पाटील यांनी दिली. या योजनेचा लाभ घेणाऱ्या प्रवाशांना ३० हजारांपर्यंत अनुदानही मिळणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याला ऑनलाईन अर्ज, आधारकार्ड, रेशनकार्ड, जन्म दाखला, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचं प्रमाणपत्र, अडीच लाखांपर्यंत उत्पन्न असलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला किंवा पिवळे,केशरी रेशनकार्ड सादर करावे लागणार आहे.

# विठ्ठल कारखान्यास शासनाकडून २२० कोटींची थकहमी

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर


**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ ऑगस्ट-**

आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून महायुती सरकारने राज्यातील पाच सहकारी साखर कारखान्यांना ५४८ कोटी रुपयांची थकहमी दिली आहे. यामध्ये पंढरपूर तालुक्यातील गुरसाळे येथील विठ्ठल सहकारी साखर कारखान्यास २२० कोटी रुपयाची थकहमी देण्यात आली आहे. शासनाच्या या सहकार्याच्या भूमीकेमुळे विठ्ठल कारखान्याचा पुढील गाळप हंगाम सुलभरीत्या पार पडणार आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या उमेदवारास सहकार्य केले होते. यामुळे महायुती शासनाने आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राज्यातील पाच साखर कारखान्यांना ५४८ कोटी रुपयाची थकहामी दिली आहे. यामुळे आता या पाचही साखर कारखान्याचा पुढील गाळप हंगाम चांगल्या प्रकारे पार पडणार आहे. राज्यातील अनेक साखर कारखाने आर्थिक अडचणीत सापडले आहेत. यामुळे कारखान्यांना मदत करावी अशी मागणी चेअरमन अभिजीत पाटील यांनी महायुती शासनाकडे केली होती. याची दखल घेऊन माहिती शासनाने आगामी विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राज्यातील पाच साखर कारखान्यांना ५४८ कोटी रुपयाची थकहामी दिली आहे. यामुळे आता या पाचही साखर कारखान्याचा पुढील गाळप हंगाम चांगल्या प्रकारे पार पडणार आहे.

### विधानसभा लढविण्यावर अभिजीत पाटील ठाम

दरम्यान विठ्ठल कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी माढा आणि पंढरपूर मंगळवेढा या दोन्ही विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची मोर्चे बांधणी सुरू केली आहे. सध्या या दोन्ही मतदार संघावर त्यांनी आपले लक्ष केंद्रीत करुन या दोन्ही मतदार संघातील विविध गावांमधून वेगवेगळे कार्यक्रम घेण्याचा त्यांनी सपाटाच लावलेला आहे. पाटील यांनी कोणत्या पक्षाकडून निवडणूक लढविणार हे अद्याप पर्यंत जाहीर केलेले नाही. मात्र यावेळची निवडणूक लढविण्यावर ते ठाम आहेत. जर वेळ पडली तर अभिजीत पाटील हे अपक्ष म्हणून देखील निवडणूक लढवतील असे खात्रीपूर्वक त्यांच्या निकटवर्तीयांकडून सांगितले जात आहे.



| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | सहकारी साखर कारखाना लि., नागनाथअण्णा ... तालुका वाळवा, जिल्हा सांगली. | १४८.९० | २७.५६ | १२१.३४ |
| ३ | अशोक सहकारी साखर कारखाना लि., अशोकनगर, श्रीरामपूर, जिल्हा अहमदनगर. | ९०.३० | १६.२५ | ७४.०५ |
| ४ | श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि., वेणूनगर गुरसाळे, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर. | २६७.५९ | ४८.०५ | २१९.५४ |
| ५ | शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. किल्लारी, तालुका औसा, जिल्हा लातूर. | २२.९७ | ४.१३ | १८.८[illegible] |
| | एकूण | ५९४.८६ | १०७.६९ | ४८७.०७ |

२. सदर मान्यता ... संदर्भ क्र.९ येथील पत्रात नमूद खालील अटी व शर्ती, तसेच शासनाच्या संदर्भ क्र.२ येथील दि.०४.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयात नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-

विधानसभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विठ्ठल कारखान्यास २२० कोटी रुपयाची थकहामी दिली



### भिमनगर जि. प. शाळेत आरोग्य तपासणी

**सांगोला, दि.२७ ऑगस्ट-**

जि.प.प्रा.शाळा, भिमनगर, सांगोला येथे मातोश्री रमाई नागरी सहकारी पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त आरोग्य तपासणीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन बापूसाहेब ठोकळे,चेअरमन विजया बनसोडे यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांची दातांची तपासणी डॉ.सचिन बनसोडे (दंत चिकित्सक) यांनी करून दातांची काळजी कशी घ्यावी,निगा राखावी याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक अविनाश चंदनशिवे, अंगणवाडी सेविका जयंती बनसोडे, लक्ष्मीबाई बनसोडे, सहशिक्षिका मैना गायकवाड, पालक उपस्थित होते. मुख्याध्यापिका शेळके यांनी आभार मानले.

# कै. गुरुवर्य बापूसाहेब झपके यांच्या स्मृतीसमारोहानिमित्त विविध कार्यक्रम

## संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २७ ऑगस्ट-**

सां.ता.शि.प्र.मंडळाचे संस्थापक अध्यक्ष,थोर स्वातंत्र्यसेनानी, सांगोला तालुक्यात माध्यमिक शिक्षणाची सुविधा सर्वप्रथम प्रदान करणारे शिक्षणमहर्षि कै. गुरुवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके ४३ वा स्मृतीसमारोह २०२४ विविध कार्यक्रमांनी संपन्न होणार असल्याची माहिती सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी संस्था सचिव मल्लिकार्जुन घोंगडे, खजिनदार शंकरराव सावंत,




प्राचार्य अमोल गायकवाड उपस्थित होते.

यामध्ये दि.३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर रोजी पुरूषांच्या निमंत्रित राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धा संपन्न होणार आहेत.या स्पर्धेचे उद्घाटन माढा लोकसभा खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते,जिल्हा पोलीस प्रमुख अतुल कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली व उपसंचालक क्रीडा व युवक सेवा युवराज नाईक,जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार,तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे यांचे प्रमुख उपस्थितीत शुक्रवार दि.३० ऑगस्ट रोजी सकाळी १० वा. सांगोला विद्यामंदिर येथे संपन्न होणार आहे.तसेच या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि.१ सप्टेंबर रोजी सायं.५ वा.रायफल शूटिंग ऑलिंपिक पद विजेते स्वप्नील कुसाळे यांचे शुभहस्ते,प्रांताधिकारी मंगळवेढा बी.आर. माळी यांचे अध्यक्षतेखाली,उपविभागीय पोलिस अधिकारी मंगळवेढा विक्रांत गायकवाड,तहसीलदार संतोष कणसे, पोलिस निरीक्षक भिमराव खणदाळे, उद्योगपती सिद्धार्थ झपके, विलास क्षीरसागर, सुहास होनराव, ज्ञानेश्वर तेली, नागेश तेली, मंगेश म्हमाणे, रत्नाकर ठोंबरे यांची उपस्थितीत होणार आहे.

रविवार दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा.कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोह सांगता समारंभ प्रमुख पाहुणे डॉ. विठ्ठल लहाने प्लास्टिक सर्जन, लातूर यांच्या हस्ते व संस्थाध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांचे अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.या समारंभामध्ये कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण होणार आहे. सोमवार दि. १६ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वा.समाधी दर्शन व ८ वा. सांगोला विद्यामंदिर येथे कै.बापूसाहेब झपके यांचे तैलचित्रास पुष्पहार समर्पित करण्यात येणार आहे.

कै.गुरुवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके यांच्या स्मृतीसमारोह निमित्त दि.९ सप्टेंबर रोजी ८ वी ते १० वी व ११ वी १२ वी गट जिल्ह्यास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व दि.१० सप्टेंबर रोजी ५ वी ते ७ वी गट तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न होणार आहेत.तसेच दरवर्षीप्रमाणे कै.गुरुवर्य बापूसाहेब झपके जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देण्यात येणार आहे.त्या संदर्भात जिल्ह्यातील शाळांना निमंत्रण पत्रिका पोस्टाने पाठवली आहे.अधिक माहितीसाठी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला या संस्थेच्या www.stspm.org या वेबसाईटला भेट द्यावी व जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## आ. राणादादांकडून संतोष चव्हाण यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२७ ऑगस्ट -**

संत सेवालाल महाराज बंजारा-लमाण तांडा समृध्दी योजनेच्या सदस्यपदी आलियाबाद येथील संतोष चव्हाण यांची निवड झाल्याबद्दल आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी सत्कार केला.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य, नितीन काळे, इंद्रजित देवकते, गुलचंद व्यवहारे, लक्ष्मण चव्हाण, अतुल राठोड, हंगरगा नळचे उपसरपंच मोहन चव्हाण, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते समाज बांधव उपस्थित होते.



## आ. राणादादांच्या प्रयत्नांना यश; ६ एकर जागेत उभारणार 'बसवसृष्टी'

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ ऑगस्ट -**

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रयत्नातुन ऐतिहासिक नळदुर्ग शहरा जवळील राष्ट्रीय महामार्गालगत उभारण्यात येणाऱ्या भव्य बसवसृष्टीसाठी शासनाकडुन जमीन व ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. धाराशिव जिल्ह्यातील पहिला महात्मा बसवेश्वर महाराजांचा पुर्णाकृती पुतळा ऐतिहासिक नळदुर्ग येथे उभारण्यात येत असल्याने वीरशैव लिंगायत समजमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. वीरशैव लिंगायत समाजबांधवानी याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले आहेत.

गेल्या अनेक वर्षांपासुन वीरशैव लिंगायत समाजाची महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभरावा ही मागणी होती. आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडे वीरशैव लिंगायत समाजाच्या शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन पुतळा उभारण्याची मागणी केली होती. त्यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी त्यावेळी नळदुर्ग परीसरात महात्मा बसवेश्वर महाराजांचा पुतळा उभारण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनाची पुर्तता करण्याचे काम आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.



शासन दरबारी प्रयत्न करून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी नळदुर्ग जवळील अणदुर शिवारातील वन विभागाची ६ एकर जागा बसवसृष्टी उभारण्यासाठी उपलब्ध करून घेतली आहे.

त्याचबरोबर या जमिनीसोबतच या कामाची सुरुवात करण्यासाठी ३ कोटी रुपयांचा शासन निधीही उपलब्ध करून दिला आहे. लवकरच या कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण होऊन या कामास सुरुवात होणार आहे. याठिकाणी महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात येणार आहे.

त्याचबरोबर महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाला साजेसा पुतळा, ध्यानकेंद्र, सुंदर बगीचा, सुशोभिकारण, लाईट अँड साऊंड शो व भव्य अशी बसवसृष्टी उभारण्यात येणार आहे. त्यामुळे ऐतिहासिक नळदुर्ग-अणदुर शहराच्या सौंदर्यात मोठी भर पडणार आहे.

त्याचबरोबर हे ठिकाण एक चांगले पर्यटन स्थळ म्हणुन विकसित करण्यात येणार आहे. हे काम लवकर पुर्ण व्हावे यासाठी आणखी ३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या या कार्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील वीरशैव लिंगायत समाजामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

वीरशैव लिंगायत समाज बांधवानी याबद्दल आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे आभार मानले आहेत.

## श्री तुळजाभवानी मंदिर अपहार प्रकरणी गुन्हा दाखल करा

### हिंदू जनजागरण समितीची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ ऑगस्ट -**

महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी मंदिरातील साडेआठ कोठी रुपये अपहार प्रकरणी सोळा जणांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी हिंदू जनजागरण समितीने नुतन पोलिस अधीक्षक संजय जाधव यांना दिले.

उच्च न्यायालयाचा निकाल दि.९ मे २०२४ रोजीच्या आदेशानुसार व गुन्हे अन्वेषण विभाग, जिल्हा पोलीस प्रमुख शंकर केंगार यांचा अहवाल दि.२२ सप्टेंबर २०१७ नुसार साडे आठ कोटीचा अपहार करणाऱ्या १६ व्यक्तीविरुद्ध फौजदारी गुन्हे नोंदवावा. हा भ्रष्टाचार वर्षे १९९१-२००९ चा आहे. उच्च न्यायालयाने तसे स्पष्ट आदेश दिले आहेत. कृपया अधिक वेळ न दवडता फौजदारी गुन्हे नोंदवा व उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन त्वरित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.



निवेदनावर किशोर जगताप, राजन बुणगे, किशोर गंगणे, विनोद रसाळ, अमित कदम, ॲड, शिरीष कुलकर्णी, अजय सांळुके यांच्या स्वाक्षरी आहेत.



## लोटस पोदार लर्न स्कूल येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

### चिमुकल्यांनी जिंकली उपस्थितांची मने...



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ ऑगस्ट -**

शिवछत्रपती बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लोटस पोदार लर्न स्कूल, उमरगा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात आली.

यावेळी संस्थेच्या विश्वस्त संजीवनी अरगडे व सुषमा कोकरे ह्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. त्याच बरोबर प्रशालेचे प्राचार्य श्रीकांत वारुडे, उपप्राचार्य अतुल फावडे, समन्वय विभावरी थिटे व पोदार जम्बो किड्सच्या प्रमुख मंजिरी सुर्यवंशी आदी उपस्थित होते. प्रथमतः प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व कार्यक्रमास सुरुवात झाली. यात इयत्ता तिसरी व चौथी वर्गातील विद्यार्थ्यांनी नृत्य आणि नाटके सादर केले व उपस्थितांची आपल्या कलेच्या माध्यमातून मने जिंकली. श्रीकृष्ण व राधा यांच्या वेशभूषेत आनंदाने नाचत, मनोरे करुन इयत्ता नर्सरी ते दहावी वर्गातील मुलांनी दहीहंडी फोडली.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अमृता अहंकारी व साईशा दहीफळे या विद्यार्थीनींनी केले तर आभार मानसी पाटील हीने मानले.

## कळंब येथील श्री विठ्ठल भगवंत मंदिरात गोकुळाष्टमी उत्सव संपन्न

### श्रीमद् भागवत कथा, ज्ञानेश्वरी पारायण, किर्तन, श्रीकृष्ण जन्मोत्सव, पालखी मिरवणुकीचे आयोजन...

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ ऑगस्ट -**

श्री विठ्ठल श्री भगवंत मंदिर येथे श्रीकृष्ण जन्मोत्सव गोकुळाष्टमी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



यानिमित्त आयोजित सप्ताहात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे प्रसिद्ध भागवत कथाकार हभप. भालचंद्र महाराज देव यांनी आपल्या अमृत वाणीतून श्रीमद् भागवत कथा सांगितली. त्यांना तबला साथ पद्मनाभदेव, हार्मोनियम गंगाधर देव हे करीत आहेत. त्यांनी दि.२६ ऑगस्ट रोजी श्रीकृष्ण-रुक्मिणी विवाह सोहळा प्रसंग सांगितला चिमुकल्या बालकांनी श्रीकृष्ण-रुक्मिणी वेश परिधान केला होता. याप्रसंगी अक्षदा म्हणून पुष्पवृष्टी करण्यात आली.

श्री चा जन्मउत्सव रात्री बारा वाजता मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाला. दि.२७ ऑगस्ट रोजी श्री भगवंत पालखी नगरप्रदक्षिणा सकाळी १० ते १२ या वेळेत संपन्न झाली. मिरवणुकीत मंगल कलश डोक्यावर घेऊन महिला सहभागी झाल्या होत्या. दि.२८ ऑगस्ट रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत हभप. नारायण महाराज उत्तरेश्वर पिंप्रीकर यांचे काल्याचे किर्तन होईल व श्रीकांत हुलसुलकर यांच्या वतीने महाप्रसाद पंगत होईल.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजक जीवन महाराज रत्नपारखी, वंशपरंपरागत निवासी पुजारी जयंतराव कुलकर्णी, सुरेश कल्याणकर, श्रीकांत हुलसुलकर, विलास मिटकरी, प्रकाश मोरे, डी.के. कुलकर्णी, श्रीकांत लोहटेकर, विष्णुपंत ठोंबरे, विजय मोहिते, पांडुरंग माळवदे, काका चोंदे, चंद्रशेखर बारटक्के, ज्ञानेश्वर बारटक्के, भाग्येश रत्नपारखी, परिमाळा घुले, नंदाबाई पांचाळ हे परिश्रम घेत आहेत.

## जिल्हाध्यक्षपदी महादेव पाटील यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ ऑगस्ट -**

देशभरातील लघू व मध्यम वृत्तपत्रांच्या संपादक, प्रकाशक, पत्रकार, मुद्रक यांच्या दैनंदिन, शासकीय अडचणी सोडविण्याच्या प्रमुख उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या असोसिएशन ऑफ स्मॉल ॲन्ड मिडीयम न्युजपेपर्स ॲन्ड एडीटर्स या संघटनेच्या राष्ट्रीय व राज्य कार्यकार्यकारिणीचे पुनर्गठण करण्यासाठी सदर बैठकीचे आयोजन परळी येथे सोमवारी करण्यात आले होते. या बैठकीत धाराशिव जिल्हाध्यक्षपदी महादेव पाटील यांची निवडीची घोषणा करण्यात आली.



या बैठकीत लघु संवर्गाच्या वृत्तपत्रांना येणार्या अडचणींवर विस्ताराने चर्चा करण्यात आली. तसेच या प्रश्नांकडे आणि आंदोलनाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनाची दिशा ठरविण्याबाबतही ठराव संमत करण्यात आला. या बैठकीत राष्ट्रीय अध्यक्ष उत्तमराव वाडकर, नागेश तुरेराव, संतोष धरमकर, अनिल शिराळकर यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. बैठकीचे संयोजन आणि स्वागत संघटनेचे नवीन राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य दिलीप जोशी (परळी) यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सोलापूर जिल्हाध्यक्ष महादेव जंबगी यांनी केले तर आभार प्रदर्शन भगवान परळीकर यांनी केले. सदर बैठकीस देशभरातून ५० हून अधिक प्रतिनिधींची उपस्थिती होती.

### अखिल भारतीय शिव उद्योग सहकार सेना महासंघ धाराशिव जिल्हा कार्यकारिणीची निवड...

## महिला आघाडी जिल्हाप्रमुखपदी सुवर्णा पाटील, उपाध्यक्ष शिंदे, तालुकाध्यक्षपदी बनसोडे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ ऑगस्ट -**

अखिल भारतीय शिव उद्योग सहकार सेना महासंघाच्या धाराशिव जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुखपदी सुवर्णा पाटील यांची निवड करण्यात आली. तर जिल्हा उपाध्यक्षपदी कैलास प्रल्हाद शिंदे, धाराशिव तालुका उपाध्यक्षपदी महेश गणपत बनसोडे (माळी) यांची निवड करण्यात आली.



धाराशिव येथील शिवसेना संपर्क कार्यालयात शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सुरज साळुंके, शिवउद्योग सहकार सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरखाने, मागासवर्गीय विभागचे जिल्हाध्यक्ष अमित बनसोडे यांच्या हस्ते निवडीचे पत्र नूतन पदाधिकाऱ्यांना देण्यात आले.

नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन शिवसेना पक्षाची ध्येयधोरणे, विचार सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचवून पक्ष संघटन वाढवावे खअसे यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

कार्यक्रमाला धाराशिव शहरातील शिंदे गटाचे शिवसैनिक उपस्थित होते.

## बार मॅनेजरच्या डोक्यात दगड घालून चोरी करणारा आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ ऑगस्ट -**

येथील बिअरबार व लॉजवरील एका कामगाराने झोपेत असताना मॅनेजरच्या डोक्यात दगड मारून गल्लूयातील बारा ते तेरा हजार रुपये चोरून नेल्याची घटना (ता.१८) जुलै रोजी घडली होती. सदरील घटनेतील आरोपीस येरमाळा पोलिसांनी अटक केली असुन आरोपीस न्यायालयासमोर हजर केले असता चार दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, येरमाळा येथील दत्ता बारकूल यांचे महामार्गालगत बिअर बार, लॉजमध्ये अकलूज येथील जालिंदर गोरख साळुंखे (वय २३) नविन कामगारला कामावर ठेवले होते.त्याच रात्री दोन ते अडीच वाजेच्या सुमारास लॉज मध्ये झोपलेल्या बारचा मॅनेजर सुनील धावारे (रा.बावी ता.वाशी) हा झोपेत असताना आरोपी जालिंदर साळुंखे यांनी त्याचा डोक्यात दगड मारुन जखमी करून बारच्या गल्यातील बारा तेरा हजार रुपये घेऊन पळून गेला होता. सुनिल धावारे याने दिलेल्या जबाबावरुन जालिंदर साळुंखे (वय २३, रा. शिरपूर, अकलूज जि.सोलापूर) याच्याविरुद्ध जीवे मारण्याचा प्रयत्न करून चोरी केल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला होता. यामध्ये येरमाळा पोलीस तपासात तो खडकी (ता.दौंड) येथे असल्याची माहिती मिळाली. सपोनि. महेश क्षिरसागर, पोलीस उपनिरीक्षक पवन निंबाळकर यांच्या मार्गदर्शकाखाली पोलिस उपनिरीक्षक देविदास आवारे, पोकॉ. प्रशांत जवळगावकर यांनी त्याचे लाईव्ह लोकेशन घेत खडकी (ता.दौंडग येथुन अटक केली आहे.



आरोपी जालिंदर गोरख साळुंखे यास कळंब न्यायालयासमोर हजर केले असता चार दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास आवारे हे करीत आहेत.

## 'त्या' अपघातातील टेम्पो अखेर पोलिसांच्या ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**शिराढोण, दि.२७ ऑगस्ट -**

कळंब तालुक्यातील शिराढोण येथील रामकृष्ण जालींदर गिरी (वय ६८) हे दि.१५ ऑगस्ट रोजी नेहमीप्रमाणे सकाळी ६ वाजेच्या सुमारास व्यायम करण्यासाठी कळंब-लातूर रोडवर चालत असताना त्यांना आयशर टेम्पोने जोरधार धडक दिली होती. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या गिरी यांचा जागीच मृत्यू झाला होता. सदरील वाहन हे अपघात झाल्यानंतर तेथून पसार झाले होते.

या प्रकरणी रामकृष्ण गिरी यांचे चिरंजीव मदन गिरी यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार शिराढोण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता.

या प्रकरणात शिराढोण येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्यान नेहरकर, पोलीस कर्मचारी दयानंद गादेकर, देशमाने, निळकंठ गवळी यांनी तपासचक्रे फिरवत या वाहनाचा तपास सुरु केला.

गोपनिय माहिती, विविध ठिकाणचे सिसिटिव्ही फूटेच अशी तपास यंत्रना फिरवत दि.२५ ऑगस्ट रोजी शिराढोण पोलीसांनी सदरील वाहनास ताब्यात घेतले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### हिप्परगा रवा जि.प. शाळेत दहीहंडी कार्यक्रम संपन्न

**लोहारा, दि.२७ ऑगस्ट -**

लोहारा तालुक्यातील हिप्परगा रवा येथील जि.प.प्रा. शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी शाळेतील मुलांनी दहीहंडी फोडून दहीहंडीच्या गीतावर नृत्य करण्यात आले. यावेळी शिक्षक हरिदास साळुंखे, नागेश बंगले, नरेंद्र आवटे, संभाजी परीट, सुधीर घोडके, मनिषा भोजने, उषा मोरे आदी उपस्थित होते.



### सामाजिक न्याय विभागाच्या पदाधिकाऱ्यांकडून मोटे यांचा सत्कार

**परंडा, दि.२७ ऑगस्ट -**

परंडा-भूम-वाशी मतदारसंघाचे जननायक माजी आमदार राहुल मोटेयांना वाढदिवसाच्या निमित्ताने सत्कार सामजिक शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी न्याय्य विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे जिल्हा सरचिटणीस घनश्याम शिंदे, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे जिल्हा कार्याध्यक्ष डॉ. नवनाथ वाघमोडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक शहराध्यक्ष खय्युंम तुटके यांच्यासह आदी उपस्थित होते.



### तेर येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव उत्साहात साजरी

**तेर, दि.२७ ऑगस्ट -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथील पुरातन त्रिविक्रम मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सव साजरा उत्साहाने करण्यात आला. यावेळी हभप. ज्ञानेश्वर महाराज सोनवणे यांचे किर्तन झाले. यावेळी तेर येथील ग्रामस्थ, भाविक, भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### शंभो महादेव मंदिर जीर्णोद्धारासाठी २५ हजार रुपयांची देणगी

**इटकळ, दि.२७ ऑगस्ट -**

तुळजापुर तालुक्यांतील पिंपळा खुर्द येथील ग्रामदैवत शंभो महादेव मंदीर जीर्णोद्धारसाठी शिरगापुर येथील शामराव रामराव पाटील व त्यांच्या आशा पाटील यांनी २५ हजार रुपये देणगी मंदीर समितीचे विश्वस्त यांच्याकडे जमा केली. ग्रामदैवत शंभो महादेव मंदीर जीर्णोद्धार लोकवाट्यातून सुरू असुन यासाठी दानशूराकडून मोठया प्रमाणात मदतीचा ओघ सुरू आहे. आतापर्यंत जवळपास चार कोटी रुपयांच्या लोक वर्गणीतून या शंभो महादेव मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात येत आहे. शिरगापुर या छोट्याशा गावातील शामराव पाटील यांनी ही देणगीच्या स्वरूपात २५ हजार रुपये मदत केल्याने मंदीर ट्रस्टच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.



### सिंदगावला काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांची सदिच्छा भेट

**जळकोट, दि.२७ ऑगस्ट -**

येथून जवळ असलेल्या सिंदगाव गावाला जिल्हा परिषद माजी अध्यक्ष, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धीरज पाटील यांनी भेट देऊन जलसंवाद यात्रा माध्यमातून गावकऱ्याशी संवाद साधला. कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या गाठीभेटी घेतल्या. याप्रसंगी गावकऱ्यांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या तसेच विकास कामांबाबत त्यांचे मत जाणून घेतले. समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आश्वासन दिले. यावेळी धनाजी पाटील, प्रताप पाटील, गुरुनाथ परशेट्टी, कुमार चव्हाण, आप्पा भोसले, अशोक पाटील, धनाप्पा बणू, अशोक बणजगोळे, गंगाधर पेठसांगवी, काशिनाथ इंगोले, शिवाजी ताडकर, दत्ता बिराजदार आदि पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव

**कदेर, दि.२७ ऑगस्ट -**
जि.प.प्रा.शाळा औराद येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दहीहंडी उत्सव आयोजित करण्यात आला होता. या उत्सवाचे निमित्त साधून लहान बालगोपाळांनी श्रीकृष्ण आणि राधाची वेशभूषा परिधान केली होती. शाळेतील विद्यार्थ्यांनी गोपाळकाला निमित्त उत्कृष्ट नृत्य सादरीकरण केले. विद्यार्थ्यांबरोबर गावातील माता पालकांनीही दांडिया खेळण्याचा आनंद घेतला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक मुळे, मंडले, राठोड, चव्हाण, जावळे, जवळगेकर, पतंगे, पाटील यांनी परिश्रम घेतले. त्याचबरोबर औराद येथील ग्रामस्थ, मातापालक या सर्वांनी शाळेतील दहीहंडी कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते.

### अवैध गुटखा वाहतुक करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**धाराशिव, दि.२७ ऑगस्ट -**
महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटख्याची वाहतुक होत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून औराद पाटी चौरस्ता उमरगा येथे रस्त्यावर पथकाने महिंद्रा जितु वाहनामधून एकुण २ तंबाखुचे सुतळी पोते, २५ सुतळी पोते विमल पान मसाला असा एकुण ६ लाख २४ हजार रुपये किंमतीचा गुटखा व तंबाखू पान मसाला वाहनासह ८ लाख ८६ हजार ४०० रुपये किंमतीचा महाराष्ट्र शासन प्रतिबंधीत अन्न पदार्थ वाहून नेत असल्याचे आढळले. यावर पथकाने नमूद गुटखा व वाहतुकीस वापरलेली महिंद्रा जितु वाहन असे जप्त करुन नमूद गुटखा हा महाराष्ट्र शासन प्रतिबंधीत असल्याची खात्री झाल्यामुळे आरोपी इफतेकार सय्यद तांबोळी, वय ५० रा.नारंगवाडी ता.उमरगा जि.धाराशिव यांच्याविरुध्द भा.न्या.सं. कलम १२३, २७४, २७५, २२३ पो.ठा.कळंब येथे गुन्हा नोंदवला आहे.



### सरस्वती बिगर शेती ग्रामीण पतसंस्थेची सर्वसाधारण सभा उत्साहात

**आलुर, दि.२७ ऑगस्ट -**
उमरगा तालुक्यातील आलूर येथील सरस्वती बिगर शेती ग्रामीण पतसंस्थेची ८ वी सर्वसाधारण सभा २५ ऑगस्ट रोजी संपन्न झाली. या सभेच्या अध्यक्षपदी कल्याणप्पा वाकडे, प्रमुख पाहुणे उपसरपंच जितेंद्र पोतदार, राजकुमार माने, संतोष भाकरे संगपा ब्याळीकुळे, डॉ.दत्तात्रय पाटील, नागन्ना ब्याळीकुळे, मुकिंद क्षीरसागर, मल्लेशप्पा ज्योती गुलाब राठोड, सत्तार सय्यदली, अन्वर जेवळे, शमशोद्दीन इनामदार, शंकर बिराडे, बसप्पा मासुडे, शंकर जाधव, कोंडिबा गुरवे उपस्थित होते. सरस्वती पूजा करून सभेला सुरवात करण्यात आले. यावेळी अहवाल वाचन करण्यात आले. वार्षिक पत्रकांना मंजुरी देण्यात आली. यानंतर शंकर व्हट्टे गुरुजी, जितेंद्र पोतदार, राजकुमार माने, पत्रकार हणमंत शंके, संतोष भाकरे यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेचे चेअरमन सोमेश पाटील, उपाध्यक्ष सतीश तोळणुरे यांनी प्रमुख पाहुण्यांचे पुष्पगुच्छ, शाल, हार देऊन सत्कार केले. यावेळी सभासद खूप मोठया संख्येने उपस्थित होते. सभेचे सूत्रसंचालन शिवराज भालके तर आभार सतीश तोळनुरे यांनी केले. ही सभा यशस्वी करण्यासाठी व्यवस्थापक सोमीनाथ सोमीनाथ म्हेत्रे, पिग्मी एजंट गुंडप्पा बिराडे, संचालक आनंद ब्याळीकुळे, नागेश गुडगे, रेवणसिद्ध भाकरे, सोमेश्वर ब्याळीकुळे, अमृत गुरव, सिधाराम वाकडे यांनी प्रयत्न केले.

### क्रीडा दिनानिमित्त विविध क्रीडा स्पर्धा सहभाग नोंदविण्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांचे आवाहन

**धाराशिव, दि.२७ ऑगस्ट -**



मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.या स्पर्धा २६ ऑगस्ट ते २९ ऑगस्टपर्यंत श्री.तुळजाभवानी स्टेडीयम येथे संपन्न होणार आहेत. २६ ऑगस्ट रोजी १४ वर्षाखालील वयोगटासाठी दोरी उडया मारणे,लिंबू चमचा स्पर्धा,.२७ ऑगस्ट रोजी १८ ते ४० वयोगटासाठी चालणे,५० मी -१०० मी धावणे व ६० वर्ष वयोगटासाठी ३०० मीटर जलद चालणे, २८ ऑगस्ट रोजी १८ ते ४० वयोगटासाठी कॅरम स्पर्धा,योगासन, १७ वर्ष वयोगटासाठी तायक्वांदो,२९ ऑगस्ट रोजी १९ वर्ष वयोगटासाठी ज्युदो स्पर्धा तर १७ वर्ष वयोगटासाठी हॉकी (पेनल्टी शुटआऊट) या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.तरी जिल्हयातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा.असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.

# तामलवाडी एमआयडीसी शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन होणार : आ.राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२६ ऑगस्ट-**
तामलवाडी येथे ३६७ एकर क्षेत्रावर एमआयडीसी मंजूर झाली असून शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन, त्यांना जमीनीचा योग्य मोबदला देऊन त्यांच्या सहमतीनेच भूसंपादन करण्यात येणार असल्याचा विश्वास आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी शेतकऱ्यांना दिला. काल दि.२६ ऑगस्ट रोजी तामलवाडी येथील शेतकऱ्यांनी आ.राणाजगजितसिंह पाटील यांची भेट घेऊन एमआयडीसी संदर्भातील त्यांच्या अडचणी व शंका मांडल्या होत्या. या सर्व बाबींचे निरसन आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.



शेतकऱ्यांशी संवाद साधताना आ.राणाजगजितसिंह पाटील म्हणाले की, आपण पूर्णतः शेतकऱ्यांच्या बाजूने आहोत. कुठल्याही परिस्थितीत शेतकऱ्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही.

ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी यामध्ये जाणार आहेत, त्यांना त्याचा योग्य मोबदला मिळवून देण्यात येईल. येथे एमआयडीसी झाल्यास मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मितीसह स्थानिकांना मोठा फायदा होईल. या ठिकाणी औद्योगिक हब उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील असून येथे टेक्स्टाईल व गारमेंट उद्योग उभारण्यास अनेक उद्योजक इच्छुक आहेत. प्रस्तावित जागेच्या शेजारी आणखी जमीन असून ती देखील संपादित करावी अशी मागणी उपस्थित शेतकऱ्यांनी केली. त्याअनुषंगाने आ.राणाजगजितसिंह पाटील यांनी एमआयडीसीचे क्षेत्रीय अधिकारी श्री.भांबरे यांच्याशी चर्चा केली असून ते उद्या दि.२८/०८/२०२४ रोजी जागेची पाहणी करण्यासाठी तामलवाडी येथे येणार आहेत. महसुल विभागाने सदरील जमीनीचा दर रु.९ लक्ष निर्धारीत केला असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांनी सांगितले. हा दर जरी गृहीत धरला तरी प्रचलित नियमाप्रमाणे चार पटीने एकरी रु.३६ लक्ष मोबदला शेतकऱ्यांना मिळणार आहे. यावेळी सचिन शिंदे, ज्ञानेश्वर जगताप, पोपट बेगड, बादशहा बेगडे, मारुती घोटकर ,दत्तात्रय घोटकर, महादेव घोटकर, नागनाथ भाकरे, बादशहा बेगडे, इस्माईल बेगडे, सचिन भोसले, निखिल सावंत, जोशी, चंद्रकांत सगर या शेतकऱ्यांसह माजी पंचायत समिती उपसभापती दत्ता शिंदे उपस्थित होते.

## काटगावची चोरीस गेलेली म्हैस सापडली सांगोल्याच्या बाजारात

### नातेवाईकांची सर्तकता माहिती मिळताच म्हैस मालक महाजन यांनी सांगोला गाठत म्हैस घेतली ताब्यात

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२६ ऑगस्ट-**
तालुक्यातील काटगाव येथील राजेंद्र प्रकाश महाजन यांची मुरा जातीची एक लाख रुपये किमतीची म्हैस शनिवारी रात्री शेतातून दहा ते दोनच्या दरम्यान चोरीस गेली होती सदरील म्हैस रविवारी सांगोला येथील बाजार असल्याची माहिती नातेवाईकांकडुन कळताच महाजन यांनी तिथे जावुन म्हैस ताब्यात घेतली.



या बाबतीत अधिक माहीती अशी की, काटगाव, येथील राजेंद्र प्रकाश महाजन यांची मुरा जातीची एक लाख रुपये किमतीची म्हैस शनिवारी रात्री शेतातून दहा ते दोनच्या दरम्यान चोरीस गेली होती सदरील म्हैस रविवारी सांगोला येथील बाजार असल्याची माहीती नातेवाईका कडुन मिळताच त्यांनी तेथे असणारे नातेवाईकांना महाजन यांनी फोटो पाठवले.

त्या बाजारात पाहुणे मंडळींनी बाजारात म्हैस बघून गावाकडे फोन केले असता गावातील सर्व महाजन कंपनी व गावकरी बाजारात येऊन प्रत्यक्ष पाहणी करून म्हैस ओळखले त्यावेळेस गावातील युवक सदरील म्हैस वाहनातुन येथे घेवुन आला.

त्यांनी बाजारात म्हैस चाळीस हजार रुपये किमतीने विकत देऊन एक हजार रुपये विसारा पण घेतला होता राहिलेले निमी पैसे आता द्या आणि पुढच्या रविवारी मी पुन्हा एक म्हैस घेऊन येतो. त्यावेळेस निम्मी पैसे द्या असे म्हणून तेथून पळ काढण्याच्या मार्गावर होता.

तेवढ्यात गावातील मंडळी व म्हैस मालक ईटकळ पोलिसांना घेऊन बाजारात पोचले त्यानंतर त्याच्याकडे चौकशी करत असता त्याने गावातील ऐकाने मला म्हैस आणून दिले आहे, असे सांगितले.

काटगाव येथे म्हैस पाणबुडी मोटारी चोरींच्या प्रकरणात मोठी वाढ झाली असुन या चोऱ्या मागे मोठी टोळी असल्याचासंशय असल्याने त्यामुळे पोलिसांनी चोरट्यांची टोळी पकडून यांचा बंदोबस्त करावा व यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकरी वर्गातुन केली जात आहे, अन्यथा आंदोलन करावे लागेल अशा संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्गातुन येत आहेत.

## जि.प. हायस्कूल उमरगा येथे सायकल बँकेची स्थापना

### मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांचे मदतीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ ऑगस्ट-**
उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूल मध्ये मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या प्रयत्नातून गरीब विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी सायकल बँक स्थापन करण्यात आली. या सायकल बँकेत उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींनी गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शाळेत येण्या-जाण्यासाठी मोफत सायकली उपलब्ध करून दिलेले आहेत. या सायकली विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समिती शिक्षणतज्ञ सदानंद शिवदे पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आल्या. यावेळी उमरगा शहरातील प्लाट व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते अनिल सगर उमरगा तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस सरचिटणीस धीरज बेळंबकर उमरगा केंद्राच्या केंद्रप्रमुख शिला मुदगडे मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. मुलींना सायकली उपलब्ध करून दिल्याबद्दल सर्व मुलींच्या पालकांनी उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींचे आभार मानले यामुळे आमच्या मुलींचे शिक्षण पूर्ण होईल अशी आशा व्यक्त केली.



अनिल सगर मुख्याध्यापक पद्माकर मोरे, राजेंद्र चव्हाण, धीरज बेळंबकर, आदर्श शिक्षिका पुष्पलता पांढरे यांनी सायकल बँकेसाठी सायकली मोफत दिलेले आहेत. विद्यार्थ्यांना शहराच्या कानाकोपऱ्यातून शाळेत येण्यासाठी असंख्य अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यावर उपाय म्हणून प्रशालेचे मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी उमरगा शहरातील दानशूर व्यक्तींना आपल्याजवळ उपलब्ध असलेली जुनी सायकल किंवा नवीन सायकल शाळेला भेट म्हणून देण्याची आव्हान केले. त्या आव्हानाला प्रतिसाद म्हणून आतापर्यंत सायकल बँकेमध्ये दहा सायकली जमा झालेल्या आहेत यापुढे उमरगा शहरातील इच्छुक दानशूर व्यक्तींना सायकल बँकेसाठी मदत करण्याचे आव्हान मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी केलेले आहे. यावेळी प्रशालेतील सरिता उपासे सोनाली मुसळे, ममता गायकवाड, शिल्पा चंदनशिवे, धनराज तेलंग बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, सदानंद कुंभार, संजय रूपाजी यांची उपस्थिती होती.

## खामसवाडी येथील शाळेत दहिहंडी साजरा

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२७ ऑगस्ट-**
कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील शिवपुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये गोकुळ अष्टमी निमित्त विविध कार्यक्रम घेऊन दहीहंडी फोडण्यात आली. गोकुळ अष्टमी निमित्त विद्यार्थ्यांना मित्रत्वाबाबत श्रीकृष्ण सुदामाची कथा, तसेच नेहमी सत्य वागावे असे मुख्याध्यापक प्रकाश नरसिंगे यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मडके व्ही.एम, तर आभार प्रदर्शन आंधळे ए.एन यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री गणेश मिसाळ, उपाध्याक्ष सायमा बेग, अंकिता चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी, पालक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना शाळेतर्फे चॉकलेट आणि बिस्कीट वाटप करण्यात आले.

## महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना : पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करावे

### जिल्हाधिकारी व जिल्हा उपनिबंधक यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ ऑगस्ट-**
महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजनेच्या लाभार्थ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी १२ ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे.या योजनेतील ज्या पात्र लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले नाही त्यांनी ते करुन घेवून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओम्बासे आणि सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक बालाजी काळे यांनी केले आहे.

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ अंतर्गत अल्पमुदत पीककर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयापर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याच्या योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

जिल्हयात ४८ हजार ५०० लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिध्द झाल्या आहेत.योजनेचा लाभ मिळणेकरीता शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण करणे अनिवार्य आहे.आधार प्रमाणीकरण केल्यानंतर लाभाची रक्कम शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर वर्ग करण्यात येत आहे.

४५ हजार ९८४ शेतकरी लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले असून, त्यापैकी ४४ हजार ६६४ शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर १३० कोटी ५८ लाख रुपये रक्कम वर्ग करण्यात आली आहे.

अजुनही २ हजार ५०८ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले नाही. आधार प्रमाणीकरण न केलेल्या शेतकऱ्यांनी महा-आयटी यांनी ७ सप्टेंबरपर्यंत आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे.महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०१९ योजनेचा लाभ घ्यावा.

## आसु येथील युवकांचा शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ ऑगस्ट-**
प्रा.डॉ.तानाजीराव सावंत यांच्या नेतृत्वावर व कामावर विश्वास ठेवून व जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना (शिंदे गटात) आसु येथील युवकांचा जाहीर प्रवेश करण्यात आला.

विधानसभेच्या अनुषंगाने परंडा विधानसभा मतदारसंघात सध्या चांगलेच राजकीय वातावरण तापत असताना परंडा तालुक्यात शिवसेना शिंदे गटात मंत्री तानाजी सावंत यांच्या कार्यावर विश्वास ठेवून अनेक युवक व कार्यकर्ते पक्ष प्रवेश करत असल्याने शिवसेना शिंदे गटाची ताकत वाढताना दिसत आहे. आज दि.२७ रोजीआसु गावातील सचिन पवार, पंकज जाधव, रणजित इथापे, समाधान इथापे, नितीन वाघे, निखिल कोल्हे, अनिल पवार, चैतन्य पवार, राज काकडे, ऋषिकेश चव्हाण, कानिफ मासाळ, हरी लोखंडे, विनायक नेटके, शाम परदेशी, निखिल खुने, अनिकेत परदेशी, विनोद इथापे, संतोष पवार, युवराज पवार, माऊली गोफने, सारंग जाधव, सूरज वाघमोडे, तुषार गायकवाड आदींनी धनंजय सावंत यांच्या नेतृत्वात हा प्रवेश भैरवनाथ शुगर वर्क्स सोनारी येथे केला.



प्रवेश केलेल्या युवकांचा शिवसेनचा गमजा देऊन सन्मान करण्यात आला.

माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष धनंजय सावंत, गौतम लटके, माजी जिल्हा परिषद सदस्य दत्ता मोहिते, निलेश चव्हाण यांच्या उपस्थितीमध्ये हा जाहीर प्रवेश झाला.

## शासकीय जिम्नॅस्टिक क्रीडा प्रशिक्षण केंद्र सुरु

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ ऑगस्ट-**
जिम्नॅस्टिक खेळात शालेय व इतर क्रीडा स्पर्धेत जास्तीत जास्त खेळाडूंना सहभागी होता यावे,यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या वतीने जिल्हयात जिम्नॅस्टिक खेळाचे शासकीय जिम्नॅस्टिक्स क्रीडा प्रशिक्षण केंद्र,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम,धाराशिव येथे सुरु केले आहे.

धाराशिव जिल्हयाकरिता डिम्पल ठाकरे यांची जिम्नॅस्टिक क्रीडा मार्गदर्शक म्हणून नियुक्ती केलेली आहे. शहरातील इच्छुक खेळाडूंनी या जिम्नॅस्टिक प्रशिक्षण केंद्रात सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी डिम्पल ठाकरे,क्रीडा मार्गदर्शक ८७६६४२६८८४ यांच्याशी संपर्क साधावा.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना : ४ हजार ५५२ युवकांना विविध विभागात नियुक्त्या

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ ऑगस्ट-**
युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देवून त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी राज्य सरकारची महत्वाकांक्षी योजना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना चालू आर्थिक वर्षापासून सुरु करण्यात आली आहे.शिक्षण पूर्ण करुन नोकरीसाठी अनुभवाच्या शोधात असलेल्या युवक वर्गाला विद्यावेतनासह शिक्षणाच्या बळावर अनुभवाची जोड देता यावी या उददेशाने राज्य शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली आहे. या योजनेतंर्गत जिल्हयातील ४ हजार ५५२ युवकांना आतापर्यंत विविध विभागात नियुक्त्या देण्यात आल्या आहे.

या योजने अंतर्गत खाजगी क्षेत्रातील उद्योजकांना एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. तर शासकीय,निमशासकीय आस्थापना उद्योग,महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या ५ टक्के किंवा कमीत कमी एक याप्रमाणे उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येणार होते. शासकीय व निमशासकीय कार्यालयासाठी ३ हजार ३८० जागांसाठी ऑनलाईन तर २ हजार २७८ जागा ऑफलाईन अशा ५ हजार ७५८ जागांसाठी मागणी आली होती. जिल्हयातील उद्योग क्षेत्रातून ६०३ जागासाठी मागणी आली होती.तर सेवा क्षेत्रातून १३६ जागांची मागणी आली होती. अशा तिन्ही क्षेत्रातून ऑफलाईनच्या माध्यमातून भरण्यासाठी २ हजार ५१९ तर ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी ३ हजार ९७८ अशा दोन्ही माध्यमातून ६ हजार ४९७ जागा भरण्यासाठी मनुष्यबळाच्या मागणी कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडे नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

### ६ हजार ४९७ जागा भरण्यासाठी मनुष्यबळाच्या मागणी

शासकीय/निमशासकीय कार्यालयाच्या १४९ आस्थापनांनी ऑनलाईन आणि ऑफलाईन,उद्योग/संस्थांच्या २० आस्थापनांनी तर सेवा क्षेत्रातील ०६ आस्थापनांनी मनुष्यबळाची मागणी केली आहे. जिल्हयातील विविध विभागात शासकीय कामाचा अनुभव घेण्यासाठी आतापर्यंत ७ हजार ७८७ युवकांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाकडे नोंदणी केली आहे.त्यामध्ये ऑनलाईन पध्दतीने ५ हजार ४०९ व ऑफलाईन पध्दतीने २ हजार ३७८ जणांनी नोंदणी केली आहे.१ ऑगस्टपासून आजपर्यंत ४ हजार ५५२ उमेदवारांना विविध विभागात नियुक्तया देण्यात आल्या आहेत.यामध्ये शासकीय/निमशासकीय विभागात ऑफलाईन २५७ आणि ऑफलाईन ४ हजार ९१ जणांना तर खाजगी क्षेत्रात ६४ ऑनलाईन आणि १३५ ऑफलाईन, तसेच सेवा क्षेत्रात ०५ जणांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून युवा वर्गाला शासकीय कामाचा अनुभव मिळत आहे. त्यासोबत विद्यावेतन मिळत असल्याने युवावर्गात आनंदाचे वातावरण आहे.

## जाहीरनामा

**उमरगा येथील श्रीमती जी.पी. बनकर सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, उमरगा**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३०४/२०२४** **नि.क्रं**
**सुनिता भ्र. युवराज पाटील, वय-४५ वर्षे, धंदा-घरकाम, रा.एकुरगा, ता. उमरगा, जि. धाराशिव, हा. मु. योगीराज अर्पाटमेंट, सिंहगड रोड, घायरी, पुणे**

ज्याअर्थी मयत कै युवराज विठठलराव पाटील हे दिनांक ३०/०९/२०२३ रोजी मृत्यू समयी ठिकाण मौजे पुना हॉस्पीटल, पुणे येथे मयत झाले आहेत अर्जदार सुनिता भ्र. युवराज पाटील, वय-४५ वर्षे, धंदा-घरकाम, रा.एकुरगा, ता.उमरगा, जि. धाराशिव, हा. मु. योगीराज अर्पाटमेंट, सिंहगड रोड, धायरी, पुणे हया मयत यांच्या पत्नी ओम युवराज पाटील, वय-२१ वर्षे, धंदा शिक्षण, व साहिल युवराज पाटील, वय-१६ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. एकुरगा, ता.उमरगा, जि. धाराशिव, हा. मु. योगीराज अर्पाटमेंट, सिंहगड रोड, धायरी, पुणे हे मयत यांचे मुले, असे वारस असलेबाबत सदरील अर्जात नमूद केलेले असून अर्जदार यांनी वरील मयताचे वारस असल्याच्या नात्याने त्यांचे पश्चात शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यकता आहे, म्हणुन वारसा प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार मयताचे वारसदार असल्याबाबत आक्षेप असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यांत येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य त्या हरकती दाखल न केल्यास अर्जदाराच्या वारसा प्रमाणपत्र मिळाल्याच्या मागणीबददल पुरावा घेवुन त्याची कै युवराज विठठलराव पाटील यांचे वारस असल्याबददलचे वारस प्रमाणपत्र हे न्यायालय वरील अर्जदारांना देईल.

**आज दिनांक ०१/०८/२०२४ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**
**पुढील तारीख ०२/०९/२०२४**

**स्वाक्षरित/-**
**कनिष्ठ लिपीक**

**स्वाक्षरित/-**
**सहा.अधिक्षक**

# खासदार वसंत चव्हाण यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव ,२७ ऑगस्ट -**

खासदार वंसतराव चव्हाण यांना नायगांव येथे शासकीय इतमात अंत्यसंस्कार करून त्यांना शोकाकुल वातावरणात चिरंजीव प्रा.रविंद्र चव्हाण व रणजीत चव्हाण यांनी हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत त्यांच्या पार्थिवास मुखअग्नी देऊन आखेरचा निरोप दिला. महाराष्ट्रसह इतर राज्यातील अनेक मान्यवरांची अंत्यसंस्कारांच्या वेळी उपस्थिती होती.

नांदेड जिल्हयाचे कॉग्रेस चे खासदार वसंतराव चव्हाण यांचे २६ ऑगस्ट रोजी उपचारादरम्यान निधन झाले. संयमी व सर्वसामान्याच नेतृत्व म्हणून महाराष्ट्रात त्यांची ओळख होती. नायगांव येथील हनुमान मंदीरांच्या शेजारी त्यांचे वडील कै. बळवंतराव चव्हाण यांच्या समाधिस्थळाच्या बाजुला खासदार वसंतराव चव्हाण यांच्यावर २७ ऑगस्ट रोजी हाजोरो जनसमुदायाच्या उपस्थितीत शासकीय इतमामात त्यांचा शोकाकुल वातावरणात सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आला. यावेळी शासकीय सलामी देण्यात आली. अनेकांच्या वतीने पुष्पचक्र आर्पण करण्यात आले.



या वेळी अनेका मान्यवरांनी खासदार वसंतराव यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी श्रद्धाजंली वाहीली. कॉग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांचा शोक संदेश खासदार रजणीताई पाटील यांनी व्यक्त केला तर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचा शोक संदेश माजी खासदार सुभाष वानखेडे यानी वाचुन दाखवला. त्याबरोबर पालकमंत्री गिरिश महाजन, माजी मुख्यमंत्री आशोक चव्हाण, माजी मंत्री भास्करराव खतगावकर, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी खासदार प्रताराव चिखलीकर, माजी मंत्री कमलकीशोर कदम, शिवसेना परभणी चे खासदार संजय जाधव, कॉग्रेसचे प्रभारी संपतकुमार, आमदार अमित देशमुख, आमदार विक्रम काळे, आमदार मेघनाताई बोर्डीकर, आमदार शामसुंदर शिंदे, आमदार राजेश पवार, बाळासाहेब रावणगावकर आर्दीनी शोक संदेश व्यक केला.

खासदार वंसतराव चव्हाण यांच्या अंत्यसंस्कारासाठी महाराष्ट्रासह इतर राज्यातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. माणिकराव ठाकरे, लातुरचे खासदार शिवाजी काळगे, खासदार शोभा बच्छाव, खासदार अजित गोपछेडे, माजी मत्री सुर्यकांता पाटील, माजीमंत्री शिवाजीराव मोघे. माजी आमदार आरनाथ राजुरकर, आमदार जितेश आंतापुरकर, शिवसेनेचे एकनाथ पवार, कॉग्रेसचे एकनाथ मोरे , आमदार प्रज्ञाताई सातव, आमदार मोहन हंबर्डे, आमदार माधवराव जवळगावकर, आमदार तुषार राठोड, आमदार सुरेश जेथेलिया, आमदार धीरज देशमुख, आमदार राजेश पवार, रामप्रसाद बोर्डीकर, माजी आमदार हणमंतराव बेटमोगरेकर, दिलीप बेटमोगरेकर, बळवंतराव बेटमोगरेकर, जिल्हाप्रमुख दता कोकाटे, बबन बारसे, माधव पावडे, विठ्ठल पावडे, माजी आमदार डी .पी .सावंत, यदुबन महाराज, नराशाम महाराज येवतीकर, प्रा.मनोहर धोंडे, प्रा.पुरोषतम धोंडगे, माजी आमदार रोहीदास चव्हाण, माजी महापौर आब्दुल सत्तार, प्रिती जयस्वाल, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शाहजी उमाप , जिल्हापरिषदच्या मुख्यकार्यकारी अधिकारी मिनल करणवाल, महानगरपालिकेचे अयुक्त महेशकुमार डोईफोडे, छावाचे नानासाहेब जावळे, श्रावण पाटील भिलवंडे, बालाजी बच्चेवार, माणिकराव लोहगावे, वंचचितचे शिवा नरंगले, देविदास राठोड, भुजंग पाटील, माजी उपमहापौर विनय गिरडे, भास्कर भिलवंडे, रविद भिलवंडे, संजय घोगरे, आदी उपस्थितीत होते.

तसेच चव्हाण कुंटुबातील केशवराव चव्हाण, हानमतराव चव्हाण, आनंद चव्हाण,श्रीनिवास चव्हाण, विजय चव्हाण,प्रा.रविंद्र चव्हाण, डॉ.विश्वास चव्हाण, धनजय चव्हाण, पंकज चव्हाण, माधवराव बेळगे . त्याचे सर्व नातेवाईक मोठ्यात प्रमाणात उपस्थितीत होते. नायगांव येथे शोकाकुल वातावरणात शेवटचा निरोप खासदार वसंतराव चव्हाण यांना देताना आनेकांना अश्रू अनावर झाले होते.

## चोरीस गेलेल्या मारुती कारसह आरोपीला दोन तासात अटक



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,२७ ऑगस्ट -**

आयुर्वेदिक औषधी विक्री करणाऱ्या एका खाजगी व्यापाऱ्याकडील मारुती कार चाकूचा धाक दाखवून लंपास करणाऱ्या आरोपीला अवघ्या दोनच तासात सोनखेड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांनी आणि त्यांच्या टीमने ही कारवाई केली.

अमरावती जिल्ह्यातील बानखेडा येथील जोगिंदरसिंग सुलतानसिंग चितोडिया हा ३३ वर्षे व्यवसायिक आयुर्वेदिक औषधीची विक्री करून आपला व कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतो. यासाठी तो आपली एम एच ०२ एनए ३१०९ क्रमांकाची मारुती सुझुकी कंपनीची कार वापरतो. या कारमधून आयुर्वेदिक औषधी विकून आपला उदरनिर्वाह करणाऱ्या जोगिंदरसिंग चितोडिया याला लोहा तालुक्यातील सोनखेड येथील गजानन रमेश पवार याने चाकूचा धाक दाखवून त्याची मारुती कार पळवली. सदरील घटना घडल्यानंतर फिर्यादीने सोनखेड पोलीस ठाण्यात येऊन तक्रार नोंदवली. सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेता तातडीने आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांना तपास कामी लावले. शिवाय त्यांनी स्वतःही तपासाची चक्र फिरवली. अवघ्या दोनच तासात पांडुरंग माने यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शी यांच्या सांगण्यावरून आरोपी गजानन पवार यास चोरीतील करसह कलंबर रोड टेळकी शिवारातून ताब्यात घेतले. आरोपीला बेड्या ठोकण्यात आल्या असून पुढील कारवाई सुरू आहे. ही कारवाई सपोनी पांडुरंग माने यांच्यासह पोलीस हेड कॉन्स्टेबल विश्वनाथ हंबर्डे, पोलीस कॉन्स्टेबल रमेश वाघमारे, चालक देवकते आणि सोनखेड पोलिसांनी केली आहे. या तपासात कामात सोनखेड पोलीस ठाण्याच्या ग्रामरक्षक दलाच्या सदस्यांनीही महत्त्वाची भूमिका निभावली आहे.

### भारतीय जनता पार्टीच्या वतीने आज दहीहंडी महोत्सव
## भाजपा नेत्या माधवी लता प्रमुख आकर्षण

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,२७ ऑगस्ट -**



भारतीय जनता पार्टी उत्तर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने दि. २८ ऑगस्ट रोजी दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण तेलंगणा येथील हिंदू शेरनी, भाजपा नेत्या माधवी लता हे राहणार असून त्यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

नांदेड शहरातील बी. के. हॉल समोरील श्रीनगर परिसरात दि. २८ ऑगस्ट रोजी हा दहीहंडी महोत्सव होणार आहे. या महोत्सवास माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार अजित गोपछडे, माजी खासदार तथा लोकनेते प्रताप पाटील चिखलीकर आदींची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या दहीहंडी महोत्सवात गोविंदा पथकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन उत्तर विधानसभा निवडणूक प्रमुख मिलिंद देशमुख, भाजपा जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड, मंडळ अध्यक्ष आशिष नेरलकर, सुनील राणे, बंडू पावडे , आनंदा पावडे, शिवा नागरगोजे यांनी केले आहे.

### डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त पाव्हणं
## जेवला काय? फेम राधा खुडे यांचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**उमरी ,२७ ऑगस्ट -**

उमरी शहरात साहीत्यरत्न आण्णभाऊ साठे यांची १०४ वी सार्वजनिक जयंती ३० ऑगस्ट रोजी साजरी करण्यात येणार असुन या कार्यक्रमा निनित १ सप्टेंबर रोजी सुर नवा ध्यास नवा, पाटलांचा बैलगाडा, पाव्हणं जेवला काय ... फेम सुर महाराष्ट्र सुपस्टर गायीका राधा खुडे - तरटे यांच्या सुपरहिट गायनाचा कार्यक्रमही आयोजित केला आहे.



उमरी शहरात दर वर्षी साहित्य सम्राट लोकशाहीर डॉ अण्णाभाऊ साठे यांची सार्वजनिक जयंती मोठ्या थाटात साजरी करण्यात येते यंदा ही ३० ऑगस्ट रोजी डॉ अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात येत आहे . द ३० ऑगस्ट रोजी शुक्रवारी सकाळी १०: १० वाजता लाल ध्वजाचे ध्वजारोहन मध्यवर्ती जिल्हा बँक संचालक कैलासभाऊ देशमुख गोरठेकर यांच्या शुभहस्ते होणार आहे या नंतर व्दितीय सत्रात दुपारी चार वाजता डॉ आण्णाभाऊ साठे यांच्या तैल चित्राची भव्य मिरवणूक शहरातील प्रमुख रसत्याने निघून नियोजीत जागी विसर्जीत होईल.

दि १ सप्टेंबर रोजी रविवारी सांयकाळी मोंढा मैदान येथे जाहीर सभा व त्यानंतर पाव्हण जेवला काय फेम सुपरस्टार राधा खुडे - तरटे यांचा गायनाचा कार्यक्रम होणार आहे . या कार्यक्रमाचे अध्यक्ष शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, कार्यक्रमाचे उदघाटक उद्योजक मारोतराव पा कवळे गुरुजी तर कार्यक्रमाचे अतिथिती - प्रा. रविंद्र पा चव्हाण, राजेश देशमुख कुंटुरकर, पांडूरग देशमुख गोरठेकर, डॉ. माधवराव बसवंते, मिनलताई खतगावकर, बालाजी बच्चेवार, शिवराज पा. होटाळकर, डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर, श्रावण पाटील भिलवंडे, प्रमुख उपस्थिती भाऊसाहेब गोरठेकर, तहसीलदार प्रशांत थोरात, पोलिस निरीक्षक अंकुश माने, मुख्यधिकारी निलम कांबळे, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, माजी नगराधक्ष प्रविणभाऊ सारडा, संजीव विठ्ठलराव सवई ( शासकीय गुतेदार ) भाजप जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर देशमुख धानोरकर, बापुसाहेब पा कौडगावककर ' सुभाष पेरेवार, डॉ माधव विभूते, साहेबराव शिंदे, बालाजी पा. सावंत गोरठेकर, विष्णू पंडीत, माजी नगराध्यक्ष रफीक सेठ, नगराधक्षा सौ. अनुराधा खांडरे, सर्व नगरसेवक आदी मान्यवर उपस्थितीत राहणार आहेत.

या कार्यक्रमाचे मुख्य स्वागताध्यक्ष ईश्वर विठ्ठलराव सवई ( बांधकाम सभापती न .पा उमरी ) या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात येणार आहे .

या कार्यक्रचे आयोजक नगरसेवक इरबा शेळके असून जयंती मंडळाचे अध्यक्ष अभीजीत गायकवाड ' उपाधक्ष शंकर शेळके यांनी जास्ती जास्त संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा जंयती उत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व : डॉ. विद्यासागर



**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड ,२७ ऑगस्ट -**

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी आता देशभर सुरू आहे. या धोरणाबद्दल बरेवाईट बोलले जात असले तरी कोणत्याही धोरणाचे यशापयश हे त्या धोरणाच्या अंमलबजावणीवर अवलंबून असते. सध्याच्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला महत्त्व देण्यात आले आहे. त्यामुळे शिक्षकांच्या मानसिकतेतही बदल व्हायला हवा', असे प्रतिपादन जेष्ठ शिक्षणतज्ञ आणि माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन व अभ्यास केंद्राच्या वतीने आयोजित केलेल्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि राष्ट्रीय संस्थात्मक रँकिंग फ्रेमवर्क' या विशेष व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. व्याख्यान सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे होते. यावेळी कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, डॉ. संतराम मुंडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. डी.एम. खंदारे, अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. पी. विठ्ठल, अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर यांची विशेष उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. विद्यासागर म्हणाले की, 'या पुढच्या काळात कौशल्य विकासाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. केवळ लिहिणे वाचणे किंवा पदवी मिळवणे एवढेच शिक्षणाचे उद्दिष्ट नाही, तर विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास करणे महत्त्वाचे आहे. यासाठी आपल्याला अध्ययन आणि अध्यापन पद्धतीत आमुलाग्र बदल करावा लागेल. विद्यार्थ्यांना नवीन पद्धतीने शिकवावे लागेल. शिवाय विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरे देण्याची क्षमता शिक्षकात असायला हवी.'

कुलगुरू डॉ. चासकर यांनी अध्यक्षीय समारोप करताना 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या' संदर्भात भाष्य केले. प्रारंभी मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेला अभिवादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे यांनी केले. यावेळी विद्यापीठातील विविध संकुलाचे संचालक, अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पी. विठ्ठल यांनी तर आभार डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संदीप एडके, रशीद शेख, प्रदीप बिडला यांनी प्रयत्न केले.

## शिवधारा महिला नागरी पतसंस्थेची सभा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,२७ ऑगस्ट -**

शिवधारा महिला नागरी पतसंस्थेने मागील आर्थिक वर्षात सहकार कायद्यांच्या सर्व आदर्श निकषांचे पालन करुन कार्य केल्याबद्दल आडीट 'अ' श्रेणीचा दर्जा मिळाला आहे.तसेच तालुकास्तरावरून जिल्हास्तरावर कार्य विस्तार करण्याची संस्थेला सहकार खात्याकडून परवानगी मिळाल्याबद्दल संस्थेच्या अध्यक्ष राजश्री पाटील यांनी सर्व संचालक,सभासद,ठेवीदार व कर्मचाऱ्यांचे संस्थेच्या १३ व्या वार्षिक सर्व साधारण सभेत अभिनंदन केले.

## मुदखेड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड ,२७ ऑगस्ट -**

मुदखेड शहरातील साठे नगर येथील समाज मंदिर येथे दि.२५ ऑगस्ट २०२४ रोजी प्रथमता मुदखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मारोतराव जगताप यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून लाल ध्वजारोहण करण्यात आले व शहरातील प्रमुख मार्गाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकत आपले मनोगत व्यक्त केले.याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मण देवदे तर प्रमुख पाहुणे म्हणून मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांची उपस्थिती होती.



यावेळी प्रमुख व्याख्याते प्रा.सदाशिव भुयारे सर,भिसे सर,राज सुर्यवंशी,शिवराज कदम सर,अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष आकाश सोनटक्के, महिला उपाध्यक्ष द्रोपती ताई कांबळे, तालुकाध्यक्ष भुजंगराव गायकवाड, साहेबराव गोरखवाड, शिवाजी गायकवाड, जयंती मंडळाचे अध्यक्ष धोंडू बोकेफोड, उपाध्यक्ष चांदु बोकेफोड, सचिव संतोष सोनटक्के, सहकोषअध्यक्ष साहेबराव रनखांबे, पोलीस उपनिरीक्षक बि.आर.कांबळे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रतापराव देशमुख,माजी नगरसेवक कैलास गोडसे,भाजपा जिल्हा महामंत्री प्रवीण गायकवाड,माधव पाटील कदम, नारायण चौदंते, माजी नगरसेवक संजय आऊलवार, भाजप शहराध्यक्ष पप्पू सोनटक्के,युवक शहर अध्यक्ष मुजीब पठाण, ऋषी पारवेकर, प्रा.कदम सर, शिवसेना शहर प्रमुख सचिन चंद्रे, मोहम्मद लतीफ, अण्णाभाऊ क्रांती सेनेचे तालुकाध्यक्ष भुजंग गायकवाड,किशन बोकेफोड, कृष्णा बोकेफोड, काशिराम बोकेफोड, संजय बोकेफोड, यशवंत रणखांबे, नारायण बोकेफोड, सखाराम बोकेफोड, लक्ष्मण बोकेफोड, काशीराम बोकेफोड, मारुती कंधारे, गौरव गायकवाड, बालाजी बोकेफोड, पद्माकर बोकेफोड, पुंडलिक सूर्यवंशी, काशिनाथ हातागळे, रमेश हातागळे, गणेश बोकेफोड, सुभाष सोनटक्के, साहेबराव बोकेफोड, भीमराव खंडागळे, सखाराम बोकेफोड, वसंत बोकेफोड, अजय बोकेफोड, शिवाजी खंदारे, भगवान बोकेफोड, अनिल बोकेफोड, माधव बोकेफोड यासह विविध पक्षातील पदाधिकारी,सामाजिक कार्यकर्ते, साठे नगर येथील महिला, बालक, नवयुवक यांची उपस्थिती होती.

## हदगांव नगरपरिषद शहर पथविक्रेता समितीची निवडणुक बिनविरोध



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,२७ ऑगस्ट -**

नांदेड जिल्हातील शहर पथविक्रेता समिती सार्वत्रीक निवडणुक २०२४ कार्यक्रम दि. ११ ऑगस्ट रोजीच्या दै.तरुण भारत वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आल होता. सदर कार्यक्रमा नुसार आज दि.२७ ऑगस्ट २०२४ रोजी हदगांव नगरपरिषद शहर पथविक्रेता समितीच्या सदस्य पदाकरीता अंतीम निकाल निवडणुक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगरपरिषद, हदगांव नितीन लुंगे यांनी निकाल जाहीर केला असुन या मध्ये शेख रफिक शेख रहीम (सर्वसाधारण प्रवर्ग), बालाजी सुभाष सुर्यवंशी (सर्वसाधारण प्रवर्ग), सुनंदा विलास भोळे (सर्वसाधारण महिला प्रवर्ग), बालाजी मल्हारी सुर्यवंशी (अनुसूचित जाती सर्वसाधारण प्रवर्ग), कोंडाबाई माणीकराव खुडे (अनुसूचित जमाती सर्वसाधारण प्रवर्ग), संदीप गोदाजीराव उंचेवार ( इतर मागास वर्ग सर्वसाधारण प्रवर्ग ) हे उमेदवार बिनविरोध निवडुन आल्याचे सर्व उपस्थिरतां समक्ष जाहीर केले.

नगरपरिषद हदगांव शहर पथविक्रेता समिती सार्वत्रीक निवडणुक २०२४ निवडुन आलेल्या उमेदवारास सहाय्यक पथविक्रेता निवडणूक निर्णय अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक नगरपरिषद, हदगांव सतिश देशमुख यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. सदरील शहर पथविक्रेता समिती सार्वत्रीक निवडणुक २०२४ बिनविरोध पार पाडल्या बदल व सर्व पथविक्रेते मतदार यांनी सहकार्य केल्या बदल सहाय्यक प्रकल्प अधिकारी सखाराम बोरकर यांनी आभार मानले.

## शेळगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव ,२७ ऑगस्ट -**

नायगाव तालुक्यातील आदर्श गाव सुंदर गाव म्हणून जिल्ह्यात ओळखल्या जाणाऱ्या शेळगाव (गौरी) येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०४ वी जयंती थाटामाटात साजरी करण्यात आली असून सप्तखंजिरी वादक समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे कीर्तन आयोजित केले होते. त्यास परीसरातील नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

प्रारंभी डॉ. अण्णाभाऊ साठे प्रशिक्षण संस्था महाराष्ट्र सरकारने मातंग समाजासाठी स्वतंत्र आरटी ची स्थापना करून मातंग समाजाला खऱ्या अर्थाने न्याय दिला याबद्दल राज्य सरकारचा जाहीर सत्कार करण्यात आला या सत्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी आमदार राजेश पवार हे होते तर सत्कारमूर्ती म्हणून उमरखेड विधानसभा मतदारसंघाचे आमदार नामदेवराव ससाने व विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांची प्रमुख उपस्थिती होती.

ावेळी आमदार राजेश पवार, माजी जिल्हा परिषद सदस्या पूनमताई, सरपंच मनोहर तोटरे, यांनी आपले विचार मांडले. यावेळी नारायण गायकवाड, कैलास भालेराव आर्दीची विचार मंचावर उपस्थिती होती. यानंतर जयंती मंडळाच्या वतीने उपस्थीत मान्यवरांचा सन्मान करण्यात आला .

याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करीत असतांना आमदार राजेश पवार म्हणाले की, मी आपल्या भागाचा आमदार म्हणून काम करीत असताना सर्व समाज घटकांसाठी मी भाजपा सरकारच्या माध्यमातून कार्य करीत आहे. आणि या पुढे देखील विकास कामे करण्याचा माझा प्रयत्न राहील असे सांगून आगामी काळात महिला सक्षमिकरणासाठी बचत गटाच्या माध्यमातून काम करु मतदारसंघातील विकास कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असे म्हणाले.



या कार्यक्रमाचे प्रास्तावीक सरपंच मनोहर तोटरे यांनी मांडताना म्हणाले की, मी अनावधानाने का होईना मी आदर्श गाव सुंदर गाव शेळगाव (गौरी) चा सरपंच झालो. मागील पन्नास वर्षानंतर माझ्या सारख्या मागासवर्गीय व्यक्तीच्या हाती गावक-यांनी सत्ता दिली या संधीचं सोनं करीत सर्व लोकांना सोबत घेऊन विकास कामाला प्राधान्य देईन असे आश्वासीत केले. यावेळी नायगाव तालुक्यातील नागरिक, महीला भगिनी, पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लातूर
# दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## थोर महापुरुषांचे विचार प्रत्येकाच्याच मनात रुजले पाहिजेत : ऋषिकेश कराड

**तभा वृत्तसेवा**
**रेणापूर दि. २७. ऑगस्ट -**

साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्यासह अनेक मान्यवर थोर पुरुषांनी समाजाला दिशा देण्याचे मोठे कार्य केले आहे एक दिवसापुरती त्यांची जयंती साजरी करून चालणार नाही खऱ्या अर्थाने थोर पुरुषांचे विचार प्रत्येकाच्या घराघरात आणि मनामनात रुजले पाहिजेत, असे प्रतिपादन भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी केले.

रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथे लोकशाहीर साहित्यसम्राट डॉ अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहाच्या वातावरणात रविवारी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून युवा नेते ऋषिकेशदादा कराड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच धनंजय देशमुख हे होते तर याप्रसंगी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, भाजपा पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव, रेणा कारखान्याचे उपाध्यक्ष अनंतराव देशमुख, माजी सभापती शिवराज सप्ताळ, विश्वासराव देशमुख, राष्ट्रवादीचे बालाजी कदम, विलास भोसले सुनील सौदागर महादू रसाळ, राजकुमार मानमोडे, गजू अण्णा राऊतराव, बाबनसाब शेख, सुरेश जाधव, धर्मराज करमुडे, विश्वनाथ कागले, राहुल कांबळे, जगन्नाथ ढवळे, जगन्नाथ धबडगे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

सरपंच धनंजय देशमुख यांनी प्रास्ताविक केले. जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव यांनी अण्णाभाऊंच्या कार्यावर प्रकाश टाकला. प्रारंभी उत्सव समितीच्यावतीने युवराज धबडगे, नारायण कदम, गोविंद कदम, देविदास गायकवाड, पुंडलिक धबडगे, राजू कांबळे, भरत कदम उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त



### 'श्रवणदोषाच्या निदानासाठी बालकाची आरोग्य तपासणी करून घ्यावी'

**लातूर, दि. २७ ऑगस्ट-**

जिल्ह्यातील शून्य ते सहा वर्षे वयोगटातील श्रवणदोष असलेल्या बालकांचा शोध घेवून, त्यांच्यावर वेळीच आवश्यक उपचार करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 'मिशन साद' हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत प्रत्येक बालकाची आरोग्य तपासणी करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले. जिल्हा प्रशासन, उमंग इन्स्टिट्यूट आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन साद' अंतर्गत आज प्रबोधनकार ठाकरे चौक येथील अंगणवाडीमध्ये तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन झाले. लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी जावेद शेख, नायब तहसीलदार गणेश सरोदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. शिबिराच्या आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या अंगणवाडी सेविका, आशा सेविका यांचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते यावेळी सत्कार करण्यात आला. उमंग इन्स्टिट्युटच्या आरोग्य तपासणी मोबाईल युनिटची त्यांनी पाहणी केली. लातूर शहर महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकर भारती, बालविकास प्रकल्प अधिकारी प्रिया तारु, उमंग इन्स्टिट्यूटचे प्रकल्प संयोजक किरण उटगे , व्यवस्थापक, श्रीहरी गोरे, रामेश्वर जाधव, स्पीच न्ड ऑडिओलॉजीस्ट तज्ज्ञ डॉ. श्रीशैलम तलारी, डॉ. विरेश मायनाळे, डॉ. वैभव उटगे, डॉ. प्रगती रामटेके, मानसशास्त्रज्ञ गणेश डोंगरे, ऑक्युपेशनल थेरपीस्टडॉ. अर्जुन राठोड, डॉ. अदिती सोळंके, फिजिओथेरपीस्ट डॉ. शिवानी पाटील यावेळी उपस्थित होते.



### थेरगावात विकास कामाला आली गती

**शिरुर अनंतपाळ, दि. २७ ऑगस्ट-**

थेरगाव ग्रामपंचायत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथील गेल्या अनेक दिवसांपासून म्हणजे ग्रामसेवक परमेश्वर शिरुरे हे गेल्या पासून विकास कामे थंडावली होती परंतु थेरगावचे उपसरपंच सुनील शिंदे यांनी मा.गटविकास अधिकारी बि.टी. चव्हाण यांच्याकडे अशी मागणी केली की, परमेश्वर शिरुरे यांच्या सारखाच ग्रामसेवक द्या आमच्या गावचा विकास शिरुरे गेल्या पासून थांबल्यामुळे आमच्या गावाला कर्तव्यदक्ष ग्रामसेवक देण्याची मागणी केल्यामुळे गटविकास अधिकारी चव्हाण, के.एस. विभुते यांची निवड करुन थेरगावच्या विकास कामाला गती दिली आहे. यावर्षी सरासरी पेक्षा पाऊस जास्त झाल्याने गटारीत गाळ साचला होता गेले अनेक दिवसांपासून गटारी साफ करण्याचे काम रखडले होते नुतन ग्रामसेवक के.एस.विभुते यांना उपसरपंच सुनील शिंदे तसेच ग्रामपंचायत सदस्य अविनाश शिंदे यांनी गटारी भरल्यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढला असून त्यामुळे रोगराई वाढण्याची शक्यता आहे ही अडचण त्यांना कथन केली त्यामुळे गटारी काढण्यासाठी ग्रामसेवक विभुते यांनी लागलीच ग्राम निधीतून खर्च करून या कामाला सुरुवात केली गावातील नागरिकांचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी केलेल्या कामाबद्दल गावातील नागरिकांनी ग्रामसेवक के.एस.विभुते, उपसरपंच सुनील शिंदे, सदस्य अविनाश शिंदे यांच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करून ग्रामसेवक विभुते हे पि.एस.शिरुरे यांच्या सारखे नागरिकांमध्ये मिसळून काम करतील, अशी अपेक्षा करत आहेत

### क्रीडा दिनानिमित्त उद्या विविध स्पर्धा

**लातूर, दि. २७ ऑगस्ट-**

महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व जनतेमध्ये क्रीडा वातावरण निर्मिती करण्याच्या दृष्टीने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी मेजर ध्यानचंद (हॉकीचे खेळाडू) यांचा दिनांक २९ ऑगस्ट हा जन्मदिन क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. राज्यामध्ये क्रीडा व खेळाचा प्रचार व प्रचार व्हावा, शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत क्रीडा व खेळांचे महत्व पोहोचविणे, निरोगी राहण्याचा संदेश जावा, युवक - युवतीमध्ये क्रीडा विषयक वातावरण निर्माण व्हावे, क्रीडा संस्कृतीचे संवर्धन व जतन व्हावे यासाठी विविध उपक्रम राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणार आहेत. या निमित्ताने २९ ऑगस्ट रोजी १८ वर्षे ते ४० वर्षे वयोगटासाठी १०० मीटर धावणे, योगासन, कॅरम, बुध्दीबळ, आर्मरिसलींग, फन गेम. ४० वर्षे ते ६० वर्षे वयोगटासाठी ५० मीटर धावणे, ३०० मी. धावणे, १ कि.मी. चालणे, खो-खो, योगासन, बुध्दीबळ, पुशअप इ. ६० वर्षेवरील वयोगटासाठी ३०० मीटर जलद चालणे, योगासन, १ कि.मी. चालणे बुध्दीबळ इ. इयत्ता पहिली ते पाचवीसाठी ५० मी. धावणे , योगासन, लांबउडी, फनीगेम्स , इयत्ता सहावी ते आठवीसाठी ५० मी. धावणे, रिले , ३०० मी. धावणे, फुटबॉल, खो-खो, फनी गेम्स , इयत्ता नववी ते बारावी ५० मी. धावणे , रिले, ६०० मी. धावणे, फुटबॉल, खो-खो, पुशअप, सिटअप, फनी गेम्स आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# लातूर पॅटर्नला भ्रष्टाचाराचे ग्रहण

## शिव छत्रपती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बेदखल

## पदाधिकाऱ्यावर अनागोंदी कारभारासह भ्रष्टाचारांचा अध्यक्ष गोपाळराव पाटील यांचा आरोप

### संस्थाध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांच्या दाव्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ



पत्र परिषदेत अचानक संस्थेच्या सचिवांची एन्ट्री संस्थेचे अध्यक्ष पत्रकार परिषद घेणार असल्याचे समजताच सकाळी महाविद्यालयाचे गेट बंद करण्यात आले होते. संस्थाध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील पत्रकार परिषदेत माहिती देण्यासाठी आले असता अचानक संस्थेचे सचिव अनिरुद्ध जाधव पत्रकार परिषदेत आले आणि आत मध्ये चला संस्थेत भ्रष्टाचार झाला नाही चर्चेतून मार्ग काढू असे म्हणाले. परंतु संस्था अध्यक्षांनी गेटच्या बाहेरच पत्रकारांना भ्रष्टाचाराची माहिती दिली.

**तभा वृत्तसेवा**
**लातूर दि. २७. ऑगस्ट -**

शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असणारी संस्था शिव छत्रपती शिक्षण संस्थेत कोट्यावधींचा भ्रष्टाचार झाला असल्याची माहिती चक्क संस्थेच्या अध्यक्षांनीच पत्रकार परिषदे घेऊन दिली आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे शहरातील शाहू महाविद्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र संस्थेने चक्क गेटचे कुलूप लावल्याने गोपाळराव पाटील यांना बंद गेट पुढेच पत्रकार परिषद घेत संस्थेत होत असलेल्या भ्रष्टाचाराचे पितळ उघडे केले.

याप्रकरणी अधिक माहिती अशी की दि. (२४) शनिवार रोजी संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांनी संस्थेचा भ्रष्टाचार बाहेर काढण्यासाठी पत्रकार परिषद आयोजित करण्याचे सांगितले होते. त्याप्रमाणेच काल दि. (२५) रविवार रोजी दुपारी एक वाजता पत्रकार परिषद घेऊन संस्थेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याची माहिती पत्रकारांना दिली. शिवछत्रपती शिक्षण संस्था ही १९६८ ला स्थापन झाली. संस्था स्थापन करताना डोळ्यासमोर अनेक उदात्त हेतू ठेवले होते. गरीब, वंचित, शोषित विद्यार्थ्यांना शिक्षण देणे द्यावे, त्या माध्यमातून रोजगार उपलब्ध करून द्यावा, अशाप्रकारची कामे करत असताना तत्त्व आणि मूल्यांची तडजोड न करता प्रामाणिकपणा व पारदर्शकपणे संस्थेचा कारभार व्हावा अपेक्षित होते.

जो उद्देश ठेवून या संस्थेची स्थापना झाली होती त्या उद्देशाला तीलांजी दिली असून, या संस्थेत कोट्यावधीचा भ्रष्टाचार केला जात आहे हे मला जड अंतकरणाने सांगावे लागत आहे असेही ते बोलताना म्हणाले. सन २०१७ पर्यंत संस्थेत एक रुपया ही गैरव्यवहार होत नव्हता व संस्थेचा कारभारही सुरळीत चालू होता, परंतु २०१७ साली सचिव बदलला आणि माझा विश्वासघात करायला सुरुवात केली असा गंभीर आरोपही त्यांनी यावेळी केला.मी सीए कडून संस्थेच्या कारभाराचे मी सीए कडून संस्थेच्या कारभाराचे ऑडिट करून घेतले असून, त्यात प्रचंड मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे आढळले, त्याचवेळी मी आवाज उठवून सचिवांच्या राजीनाम्याची मागणी केली होती, परंतु माझी मागणी सर्वांनी फेटाळून लावली आणि गैर व्यवहार सुरूच ठेवले. संस्थेच्या सदस्या श्रीमती विजयाताई भुदेव पाटील यांनी सप्टेंबर-ऑक्टोबर २०२३ मध्ये याबाबत कार्यकारणीच्या विरोधात धर्मदाय आयुक्त मध्ये तक्रारही दाखल केली आहे. तसेच यशवंत विद्यालयातील लॅब असिस्टंट पद भरण्यासाठी जाहिरात देऊन बनावट ठरावाच्या आधारे नेमणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हा ही दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे आर्थिक गैरव्यवहार प्रकरणे आता न्यायप्रविष्ठ असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेतल्या काही सदस्यांनी माझे सर्व अधिकार काढून घेतले असून, उपाध्यक्ष यांना ते अधिकार बहाल केले आहेत. त्यांच्याच आदेशानुसार बैठका घेऊन वेगवेगळे ठराव घेऊन निर्णय घेतले जातात. उपाध्यक्ष व सचिव यांनी संस्थेचे पूर्वीचे बँकेतील खाते गोठवून नवीन खांती काढली आहेत. आणि त्या खात्याच्या माध्यमातन राजरोसपणे कोट्यावधींचे गैरव्यवहार चालू आहेत. अशा बेकायदेशीर घटनेमुळे मी व्यथीत झालो, वेळोवेळी मी पत्राद्वारे त्यांना जाब ही विचारला परंतु त्यांच्याकडून समाधानकारक उत्तर मिळाले नाही. या संस्थेची शैक्षणिक परंपरा अत्यंत उज्वल असून, मोठ्या कष्टाने ही संस्था उभी केली आहे. ही संस्था वाचली पाहिजे यासाठी आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या संस्थेच्या सदस्यांनी राजीनामे द्यावेत. तसे न झाल्यास धर्मादाय आयुक्तांनी यांना बरखास्त करावे अशी आमची मागणी असून, संस्था वाचली पाहिजे हीच आमची अपेक्षा असल्याचे मत संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव पाटील यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.

## अत्याचार करून वृध्देचा खून

### भेटा येथे मानवतेला काळीमा फासणारी घटना

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २७ ऑगस्ट-**

बदलापूर येथील घटनेनंतर संपूर्ण राज्य हादरुन गेले. या घटनेची शाई वाळण्याच्या आत लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील भेटा येथे ३५ वर्षीय तरुणाने ७० वर्षीय वृध्द महिलेवर अत्याचार करुन तिचा गळा आवळून खून केल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. याबाबत ३५ वर्षीय नराधमास अटक केली असून, भादा ठाण्यात रात्री उशीराने गुन्हा नोंद करण्यात आला आहे. मात्र या या घटनेने गावात काही काळ तणावाचे वातावरण होते.

औसा तालुक्यातील बोरगाव नकुलेश्वर येथे ७० वर्षीय वयोवृध्द महिला पतीच्या निधानानंतर २५ वर्षापासून माहेरीच मुलासोबत राहत होती. लोकांच्या घरात घरकाम करून उदरनिर्वाह चालवित होती. स्वभावाने भोळसर असल्याने भेटा येथील सासरच्या नातेवाईकांना भेटायला कधीतरी जात होती. अशा मानसिक अवस्थेतच २३ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता ती घरातून बाहेर पडली. संध्याकाळी घरी परतलीच नाही. यामुळे भाऊ व मुलाने सर्वत्र शोधाशोध सुरु केली. या दरम्यान वयोवृद्ध महिला भेटा येथे आली असता, मन्सूर सादिक होगाडे वय ३५ याने आमिष दाखवून महिलेला घरात बोलावून घेतले व वयोवृद्ध महिलेचे हातपाय बांधून अत्याचार केला. त्यानंतर महिलेच्याच साडीने गळा आवळून खुन केला. आणि मृतदेह खोलीतील लोखंडी रॉडला साडीने बांधून ठेवला. यानंतरही मृत वृद्धात्म्यावर अत्याचार केले. या घटनेनंतर एकटाच आरोपी खोलीच्या पत्र्यावर झोपत होता.

सोमवार, दि.२६ रोजी सकाळी पुण्यावरून आरोपीची आई घरी आली. घराचा दरवाजा उघडला. यामुळे घटना उघडकीस आली. आरोपी मन्सूर होगाडे गुन्हेगार प्रवृत्तीचा असून अनेक गुन्हे दाखल असल्याची चर्चा सुरु आहे. या प्रकरणी पोलिस अधिक तपास करीत आहेत. आरोपीच्या अशा वागण्याने आई, पत्नी त्याच्याजवळ राहत नाहीत, भाऊ दुसऱ्या गावी राहतो. एकटाच राहणारा आरोपी एकटाच राहत होता.शोधाशोध घेणाऱ्या भाऊ व मुलाला या घटनेची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह आईचा असल्याची मुलाला ओळख पटली. भादा पोलिसांनी तात्काळ आरोपीला अटक केली.

याप्रकरणी मुलाच्या फिर्यादीनंतर भादा पोलिस ठाण्यात रात्री उशीराने गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच जिल्हा पोलिस अधिक्षक सोमाय मुंडे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील गोसावी औसा, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरिक्षक संजीवन मिरकले यांनी भेट देऊन पाहणी केली. घटनेनंतर गावात तणाव वाढला.

घटना उघडकीस आल्यानंतर दोन्ही गावांतील लोकांमध्ये तणाव वाढला. आरोपीला फाशी द्या, अन्यथा आमच्या ताब्यात द्या, अशी भूमिका संतप्त नागरिकांनी घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून अप्पर पोलिस अधिक्षक डॉ. अजय देवरे यांनी गावकऱ्यांची समजूत काढली. व या प्रकरणी कठोर कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

## जलदगती न्यायालयात खटला चालवून आरोपीस फाशी द्या

### संभाजी सेनेची मुख्यमंत्र्याकडे मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**औसा दि.२७ ऑगस्ट-**

७० वर्षीय वयोवृध्द महिलेवर बलात्कार करुन क्रुर पध्दतीने हत्या करीत प्रेताबरोबर चार दिवस लैंगिक अत्याचार करणाऱ्या प्रकरणाचा खटला जलदगती न्यायालयात चालवून तात्काळ आरोपीस फाशी द्या, अशी मागणी संभाजी सेनेच्या वतीने मुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे .

लातूर जिल्ह्यातील पोलिस प्रशासनावर जनतेचा विश्वास राहिला नाही. शटलमेंट करुन आरोपीना पाठिशी घालण्याचे अनेक प्रकार घडले असल्याचे या निवेदनात म्हटले आहे या घटनेमुळे दोन्ही समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकरता येत नाही. या घटनेमध्ये इतर आरोपीचा समावेश असण्याची शक्यता आहे. या प्रकरणातील महिला हिंदू धर्माची असून तिच्यावर या कारणाने अत्याचार करुन तिची हत्या केली असल्याचा आरोप या निवेदनात करण्यात आला आहे. या प्रकरणी तपासात गुन्हाचे स्वरुप समोर आणले नाही. तर संभाजी सेनेच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा संभाजी सेनेने निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदनावर धर्मराज पवार, विलास लंगर, संभाजी सेना नेता राजशतावर राजेंद्र तोहर, जिल्हा स. प्रमुख योगेश गिरी, मनोज गरड, असलमखान पठाण, जयराज शिवाप्पा डावकरे यांच्या सह्या आहेत.

## विद्यासाई इंग्लिश स्कूलमध्ये दहीहंडी

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी , दि. २७ ऑगस्ट-**

येथील विद्यासाई इंग्लिश स्कूलमध्ये दहीहंडी उत्सवात साजरी करण्यात आली.

राधा कृष्णासह, सुदामा,गोपी,गोपिका विविध वेशभूषा विद्यार्थ्यांनी केल्या होत्या. गोविंदा आला रे, मच गया शोर इत्यादी विविध गाण्यावर विद्यार्थ्यांनी नृत्य केले.

दहीहंडी निमित्त उपस्थित पालक व ग्रामस्थ दहीहंडी फोडताना झालेली धमाल पाहून उपस्थितानी टाळ्यांच्या गजरात दात दिली. या कार्यक्रमासाठी निळकंठ बिरादार, संजीवनी बिरादार, भाग्यश्री भोसले, शुभांगी जोशी, संगीता बाके यांनी पुढाकार घेतला.



# रस्त्यांच्या कामाला गती द्या : जिल्हाधिकारी

## प्रशासन व स्थानिक नागरिकांची कोअर कमिटी स्थापन होणार

### आ. धिरज देशमुखांची जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक




**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २७ ऑगस्ट-**

लातूर ग्रामीणचे आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी पानगाव ते खरोळा पाटी, व बोरगाव काळे ते मुरुड अकोला रस्ता या रस्त्यांचा प्रश्न प्राधान्याने सोडवा, अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत केली. त्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी प्रशासन व स्थानिक नागरिकांची कोअर कमिटी स्थापन करून पानगाव ते खरोळा पाटी रस्त्याच्या कामाला गती द्या. शेतकऱ्यांची सहमती असलेल्या ठिकाणचे काम तात्काळ सुरू करा. बोरगाव - मुरुड अकोला रस्त्याच्या तांत्रिक अडचणी दूर करून रस्त्याचा प्रश्न निकाली काढा, अशा सूचना संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या उपस्थितीत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक सोमवारी, दि. २६ घेण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी सुनीता टकले, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, रेणापूरच्या तहसीलदार मंजूषा भगत यांच्यासह कृषी, परिवहन आदी विभागांचे अधिकारी, विमा कंपनीचे प्रतिनिधी व दूरदृश्य प्रणालीद्वारे राष्ट्रीय महामार्गाचे कार्यकारी अभियंता प्रवीण सुमंत उपस्थित होते.

### जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या तत्काळ सूचना

पानगाव ते खरोळा रस्ता पुर्ण करण्यासाठी प्रशासन व स्थानिक नागरिकांची कोअर कमिटी स्थापन करून कामाला गती देऊ. तसेच या रस्त्याला शेतकऱ्यांची सहमती असलेल्या ठिकाणचे काम तात्काळ सुरू करा. बोरगाव - मुरुड अकोला रस्त्याच्या तांत्रिक अडचणी दूर करून रस्त्याचा प्रश्न निकाली काढण्याच्याही सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. शेतकरी व प्रशासनाच्या चुकांमुळे विमा व दुष्काळी अनुदानापासून वंचित शेतकऱ्यांच्या नुकसान अर्जांची पुनर्तपासणी करून पात्र शेतकऱ्यांना लाभ द्या. ढगफुटीच्या कारणाने पीकविमा नाकारलेल्या शेतकऱ्यांचे वैयक्तिक पंचनामे करून त्यांना लाभ द्या. जेथे मागणी असेल तेथे बससेवा सुरू करण्याची कार्यवाही करावी, असेही जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या

### शेतकऱ्यांना विमा, दुष्काळ निधी द्या : आ. देशमुख

लातूर ग्रामीण मतदारसंघातील विमाधारक शेतकऱ्यांना विमा कंपनीने किरकोळ त्रुटी दाखवत विमा अनुदान नाकारले आहे. त्यामुळे कृषी विभाग व विमा कंपनीने त्या किरकोळ त्रुटी दूर करीत नुकसान भरपाईस पात्र विमाधारक शेतकऱ्यांना विमा अनुदान द्यावे. प्रशासन व विमा कंपनीद्वारे करण्यात येणारे पंचनामे व नोंदी यातील त्रुटीमुळे भविष्यात तणाव निर्माण होणार नाही, याची शासनाने दक्षता घ्यावी. तसेच, मागील वर्षी रेणापूर तालुका १०० टक्के दुष्काळी घोषित करण्यात आला असून येथील काही शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदानाचा लाभ मिळाला नाही. यातही तांत्रिक चुकांमुळे अनुदानापासून कोणीही वंचित राहणार नाही, याची काळजी घ्यावी, अशी मागणी आ. धिरज देशमुख यांनी केली.